5. Raina, Sita. 'A Note on the Play', Collected Essays, Vol.1. p. 449.
6. Quoted by Bina Agarwal. Mahesh Dattani's Plays, A New Horizon in Indian Theatre, Jaipur: Book Enclave, 2005. P.76

❖❖❖

# वर्तमान संदर्भात संत गाडगेबाबांच्या कीर्तनातील प्रबोधनक्षमता

**प्रा. डॉ. प्रमोद दामोदर देवके**
यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालय,
मंगरुळपीर, जि. वाशिम, महाराष्ट्र (India)
Email: pramoddevke66@gmail.com Mobile No.9604674723

"बुडती हे जन न देखवे डोळा । येतो कळवळा म्हणूनीया ॥"

ही संतवृत्ती होती. संतांनी कीर्तन, अभंग, ओवी, गवळण, भारुडे, पदे, स्त्रोत्रे, आरत्या इत्यादी साहित्यप्रकारांत लेखन केलेले आहे. समाजाची अवनत स्थिती दूर व्हावी, त्यांचा विकास व्हावा, जातीभेद विसरून समाज एक व्हावा, अशा अनेक प्रेरणांमधून संत साहित्याची निर्मिती झाली.

आधुनिक भारताचे महान संत आणि समाजसुधारक डेबुजी झिंगराजी जानोरकर हे होत. त्यांना गाडगे बाबा किंवा संत गाडगे महाराज या नावाने देखील ओळखले जाते. गाडगे बाबा महाराष्ट्रातील एक कीर्तनकार,संत आणि समाजसुधारक होते. आपल्या समाजातील अज्ञान, भोळया समजुती, अनिष्ठ रुढी,परंपरा इत्यादी दोषावर संत गाडगेबाबांनी कठोर प्रहार केले. त्यासाठी त्यांनी कीर्तनाद्वारे लोकजागृतीचा मार्ग अवलंबला व अनेक गावात संचार केला. माणसाने लबाडी करू नये, व्यसन करु नये, देवाचे नावाने पशुपक्षी यांचे बळी देऊ नये, जातपात मानू नये, कुणी आजारी पडले तर अंगारे धुपारे न करता डॉक्टरांकडे जावे, नेहमी शरीर कष्ट करावेत, चोरी करू नये असा उपदेश कीर्तनातून अतिशय सोप्या पद्धतीने देऊन समाजामध्ये जनजागृती निर्माण केली. त्यांनी अखेरच्या कीर्तनातून जो महान संदेश दिला, त्याची समाजाला आजसुद्धा गरज आहे.

संत गाडगेबाबांनी आपल्या भजन, कीर्तन प्रवचनातून सर्वसामान्य् जनतेला अनेक थोर साधू संताच्या अभंगातील दाखले देऊन वाईट चालीरीती दुर करुन सर्वसामान्य् जनतेची अंधश्रद्धा दूर करण्याचा प्रयत्न केला. जातीभेद नष्ट् करुन अंधश्रद्धा, दुष्ट रूढी, अनिष्ट चालीरीती आणि व्यक्तीहित व समाजहितविरोधी भ्रामक कल्पना व भावना यावर कठोर, तर्कशुद्ध आणि औपरोधिक प्रहार करून एकाजिनसी आणि सामार्थ्यसंपन्न् समाज निर्मीती करीत त्यांनी अथक प्रयत्न केले.

संत गाडगे बाबा हे एक अलौकीक व्य्क्तित्मत्व् होते. मानवतेच्या या महान पुजाऱ्याने जनसेवेचे अखंड व्रत स्वीकारले होते. त्यांचे अंधश्रध्दा निर्मुलनाचे कार्य त्यांच्या कीर्तनाच्या माध्यमातून चालत असे. दिवसा रस्त्यावरची घाण साफ करणे आणि रात्री लोकाच्या मनातील अंधश्रद्धारूपी घाण साफ करणे हा नित्याचा क्रम बाबांचा असे. बाबांनी अंधश्रद्धेवर कडाडून प्रहार केला. माणसाच्या मनावर हजारो वर्षापासून बसलेले हे अंधश्रद्धेचे भूत त्यांना उठवावयाचे होते. त्यासाठी त्यांनी सत्यनारायनाच्या कथेचा हिंमतीने उपहास केला. भोंदू बाबांचा भोंदूपणा काढला. धर्माधता, ढोंग, धुपारे, गंडे, धागेदोरे, अंगात येणे, जंतर- मंतर या सगळ्या गोष्टी खोट्या मानल्या. देवापुढील मुक्या प्राण्याच्या बळींना विरोध केला. बोकुळ कापल्याने दगडाचा देव प्रसन्न होतो ही खुळी अंधश्रद्धा घालवून लावली. बाबांनी समाजाला कर्मकांड,अंधश्रद्धा व्यसनाधिनता, देवधर्म, सोवळे-ओवाळे, साक्षात्कार, या सगळ्यातून मुक्त होण्याचा मूलमंत्र कीर्तनातून दिला.

गाडगेबाबांनी तत्कालीन समाजाचे मानसशास्त्र जाणले होते. ज्या समाजात सुधारणा घडवून आणायच्या आहेत, त्या समाजाच्या मानसाचा सूक्ष्म अभ्यास त्यांनी केला होता. म्हणूच त्यांच्यासमोर बसलेल्या अज्ञानी, निरक्षर जनेतेची नस पकडून त्यांच्या मनाचा वेध घेऊन त्यांनी लोकशिक्षणाचे कार्य केले. प्रबोधनासाठी, भाषणाऐवजी कीर्तन हे पारंपारिक माध्य्मच त्यांनी निवडले. त्यांचे कीर्तनही एकतर्फी नसायचे. श्रोत्यांना त्यात ते सामावून घेत. श्रोत्यांना एखादा प्रश्न विचारून त्यातूनच त्यांचे दोष व चुकीच्या समजुतीवर प्रहार करीत. ते प्रश्न विचारीत, "काय रे तुझ्या बाबाला कुणी जन्म दिला?"

लोक म्हणत, "देवाने."

ते विचारीत, “बकऱ्याला कुणी जन्माला घातले?”

पुन्हा लोक म्हणत, “देवाने.”

मग ते गर्जून विचारत, “आपल्याच एका लेकराचा बळी दिलेला देवाला चालतं का?”

लोक म्हणत, “नाही”

आणि मग ते बळी देण्याच्या प्रथेविरुद्ध बोलत. असेच कीर्तन चाले. कीर्तनाची भाषा साधी पण काळजाला भिडणारी होती.”[१] गाडगेबाबांची देवविषयक संकल्पना मोठी अद्भुत होती. बाबा एकेश्वरवादी होते. ते अंतिम सत्य एकच मानीत होते. देव देवळात नाही तर तो माणसात आहे. माणसाची सेवा करा “जनी जनार्दन् संत बोलती वचन” हा त्याचा करार होता हे त्यांचे खरे चिंतन होते. बाबांनी खरा देव जगासमोर आणला.

गाडगेबाबा नवससायाला कडाडून विरोध करतात देव कोणाला काही देत नाही आणि आपल्याकडे काही मागत नाही. असे असतानादेखील पोरं व्हावीत म्हणून नवस करणाऱ्या लोकांना बाबा म्हणत -

“नवसे कन्या पुत्र होती, मग का करणे लागे पती?” श्राद्ध, यज्ञ, अभिषेक अशा प्रकारच्या रुढींवर कीर्तनातून बाबा टीका करीत असत. बाबांनी आणि त्यांच्या अनुयायांनी यात्रांच्या ठिकाणी जाऊन लोकांना उपदेश करून वेळी मार खाऊन पशुहत्या बंद करायला लावली. त्यांच्या कीर्तनात सर्व धर्माचे, सर्व जातींचे लोक येत. मुसलमान, ख्रिश्चन, पारशीसुद्धा बाबांच्या कीर्तनाला येऊन बसत. कारण बाबांचं कीर्तन हा शुद्ध व्यवहार असे. कसं जगल पाहिजे आणि कशाचा त्याग केला पाहिजे याचं सडेतोड विवेचन ते करत. संसार सोडा, देव-देव करा हे बाबांनी कधीच सांगितले नाही.”[२]

स्वच्छता हे गाडगेबाबांच्या जीवनाचे अविभाज्य अंग होय. बाबांनी स्वच्छतेवर अतिशय भर दिला. मग ती वैद्यकीय असो वा सार्वजनिक असो. जातीने परीट असल्यामुळे स्वच्छतेचे बाळकडू त्यांना जन्मसिद्ध लाभले होते. माणसाचे आरोग्य नीट व निकोप राहावे म्हणून त्यांनी अनेक उपक्रम नव्याने सुरू केले. त्यातील महत्त्वाचा उपक्रम म्हणजे ‘सफाई यज्ञ’ होय. जनमानसात रुजलेला स्वच्छता मंत्र होय. मंदिराच्या सभोवताली पडलेला सुकलेल्या फुलांचा ढीग, नारळाचे पाणी टरफले, केळीचे पाने, असा कचरा पडलेला असतो. भाविक त्याकडे दुर्लक्ष करून पुढे जात असत. मात्र गाडगेबाबांनी अशी अनेक मंदिरे स्वच्छ केली. बाबांनी जनमनाच्या गाभाऱ्यात स्वच्छतेचा नंदादीप तेवत ठेवला. ज्या गावात बाबा कीर्तनाला जात, ते गाव पहिले स्वच्छ करायचे व त्याच गावात रात्री कीर्तन करायचे. त्यांच्या खराट्याने गावागावातील घाण साफ केली, तशी वाणीने माणसाच्या मनातील घाण साफ करण्याचा प्रयत्न केला.

गाडगे बाबांनी शिक्षणाचे महत्त्वसुद्धा लोकांना पटवून दिले. अज्ञानी समाजाचा शिक्षणा शिवाय उद्धार नाही हे त्यांनी जाणून शिक्षणावर भर दिला. “तुमच्या घरात दारिद्र्य असण्याचे कारण तुम्हाले नाही शिक्षण” शिक्षणाने माणसामध्ये कसे परिवर्तन होऊ शकते, या संदर्भात ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे उदाहरण देतात.

“डॉ.बाबासाहेब आंबेडकर सायबाच्या पिढीन पिढीत झाडू मारायच काम केल त्यांच्या वडिलांना सुबुद्धी सुचली आणि आंबेडकरसाहेबाले शाळेत घातलं, आंबेडकरसाहेबानं काही लहान सहान कमाई नाही केली. हिंदुस्थानची घटना केली घटना. अन तेच जर शाळेत जाते ना, अन शिकते ना, तर झाडू मारनच त्याच्या कर्मात होत”[3]. यावरून गाडगेबाबांना शिक्षणाविषयी असलेला कळवळा दिसून येतो. पुढे ते म्हणतात- “एक वेळ उपाशी राहा, बायकोला कमी भावाचे लुगडे घ्या, जेवनाचं ताट मोडा पण मुलांना शिकवा” शिक्षण नसेल तर माणसाच जगणं व्यर्थ आहे. लोक अडाण्याचं ऐकत नाहीत, माणसाला शिक्षणा-खेरीज शहाणपण येत नाही असे त्यांना वाटे.

गाडगेबाबांनी समाजाचा संसार सुखी करण्यासाठी मानवी मनामनात मानवतेची पेरणी केली. मानवतेच्या या महान पुजाऱ्याने जनसेवेचे अखंड व्रत स्वीकारले होते. “बाबांचे कीर्तन हे अज्ञानांसाठी आहे, गरिबांसाठी आहे, दलितांसाठी आहे, दु:खितांसाठी आहे, त्यात योग नाही, अध्यात्म नाही, पोथी नाही, पुराण नाही, देवांची वर्णने नाहीत, पूजा, यात्रा यांचा उपदेश नाही त्यात शुद्ध जीवन आहे. हजारो वर्ष समाजाच्या आर्थिक सत्तेखाली आणि धार्मिक रूढींखाली भरडून निघाल्यामूळे दुधखुळ्या, देवभोळ्या अन आंधळ्यापांगळ्या झालेल्या हीनदीन समाजाच्या उद्धाराचा प्रकाशझोत म्हणजे गाडगे बाबांचे कीर्तन”[४] होय.

समाज व्यसनमुक्त झाला पाहिजे त्याशिवाय समाजाची प्रगती होणार नाही, हेसुद्धा बाबा ओळखून होते. कारण गाडगेबाबांच्या काळात दारू, गांजा, भांग, अफीम, चरस इत्यादी व्यसने प्रचलित होती. पैकी दारू हे

सर्वाधिक लोकप्रिय व्यसन होते. या व्यसनाने अनेक कुटुंबाची हलाखीची परिस्थिती निर्माण झाली होती. त्यांचे वडीलसुद्धा दारू व्यसनाने ग्रासीत होते. हा स्वानुभव त्यांना बेचैन करता झाला, त्यातून त्यांनी दारूबंदी मोहीम सुरू केली. त्यासाठी बाबांनी अनेक उदाहारणे देऊन सांगितले-

दारू ही विषासमान बिघडवी हृदयस्थान
म्हणोनी हे व्यसन घातक सर्वाशी
सर्पदंश एकदा मरण मद्य विषाचा हा परिणाम
ते अधोगतीशी कारण

गाडगेबाबा लोकांना उपदेश करीत. दारू ही विषासमान आहे. ज्याप्रमाणे माणूस विष पिल्यास मरण पावतो, त्याचप्रमाणे दारूही माणसाला कणाकणाने झिजवते व मनुष्याच्या अद्योगतीस कारणीभूत होते. दारुड्याला दारूच्या व्यसनापासून मुक्त करुन त्याचे दारूपासून जीवन बदलवून त्याला पुन्हा माणसाप्रमाणे जगण्यासाठी दारूबंदी झाली पाहिजे. ही दारूबंदी शासनाद्वारे होईल तेव्हा होईल, पण समाजातील सभ्य लोकांनी एकत्र येऊन ती घडवून आणली पाहिजे. त्याच प्रयत्नात गाडगे बाबा अविरत जीवनभर कार्य करीत राहिले.

गाडगेबाबांनी दिलेली दशसुत्री म्हणजे मानव मुक्तीचा जाहीरनामाच होय.

भुकेल्यांना ---------------------------- अन्न्
ताहाणलेल्यांना-------------------------- पाणी
उघडयानागड्यांना-----------------------वस्त्र
गरीब मुलामुलींना ----------------------- शिक्षण
बेघरांना -------------------------------- आसरा
अंध, पंगू, रोग्यांना ------------------------ औषधोपचार
पशू, पक्षी, मुक्या प्राण्यांना ----------------- अभय
गरीब तरुण तरुणींचे - -------------------लग्न्
दु:खी व निराशांना ------------------------ हिमंत

या दशसुत्रातील प्रत्येक सूत्र हे माणूसकीचा गहिवर होय. गाडगे बाबांच्या दशसूत्रातील सेवेपेक्षा जगातील कुठलाही देव मोठा नाही.

अशा प्रकारे स्वच्छतेचा मूलमंत्र देणारे, दगडातील नव्हे तर मानसातील देव शोधणारे, गरिबांची सेवा करणारे, बहुजनांच्या, सर्वसामान्यांच्या जीवनाला आणि जगण्याला बळ पुरविणारी एक विधायक शक्ती म्हणजे गाडगेबाबा होत.

## निष्कर्ष :-

१) संत गाडगेबाबा यांचे ध्येय कीर्तनाच्या माध्यमातून जनजागृती करणे हे होते.
२) संत गाडगेबाबांनी आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा , कर्मकांड, जातीव्यवस्था, अनिष्ट बाबी नष्ट करण्याचे मोलाचे कार्य केले.
३) शिक्षणाचे महत्त्व त्यांनी समाजाला पटवून दिल्याचे दिसून येते.
४) गाडगेबाबांनी दिलेली दशसुत्री म्हणजे मानवमुक्तीचा जाहीरनामाच होय.

## संदर्भ :

१) कामत मंगला :- महाराष्ट्रातील समाजसुधारक, दास्ताने रामचंद्र आणि कं., 830 सदाशिव पेठ, पुणे-411030, पृ.क्र. 67
२) किर गीरीजा :- मानवतावादी युगपुरुष संतगाडगे बाबा, मधुराज पब्लीकेशन्स् प्रा.लि., 251 क, शनिवार पेठ पुणे-411030 पृ. क्र. 15
३) संत गाडगे बाबा, 'अखेरचे कीर्तन', पुर्णामाय भाग -१, अमरावती विद्यापीठ , पृ.क्र. 22
४) संपा. भगत प्राचार्य रा.तु. : संत गाडगे महाराज स्मारक ग्रंथ , चैतन्य प्रकाशन 1758 ए. अनिरुध्द् अर्पाटमेंट साकोली कॉर्नर, कोल्हापूर -416 012 पृ क्र. 63

❖❖❖

# मराठवाड्यातील स्त्रियांची ओवीगीते

प्रा.डॉ. रमेश बलभीम जाधवर
शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये महाविद्यालय कळंबोली ४१०२१८, महाराष्ट्र (India)
Email: ramesh.paliraigad@gmail.com Mobile No. 9028389675

लोकसंस्कृतीची क्षितिजे मानवी जीवनाला संपूर्णपणे व्यापून उरलेली आहेत. आदिमकाळापासून लोकसाहित्य हा एक प्रवाही घटना आहे. अबोध समूहमनाच्या (Collective unconscious) प्रेरणेतून लोकसाहित्य विविध जाणिवा घेऊन आकाराला येत असते. समाजामधील सर्वसामान्य माणसाच्या भावविश्वाला सतत चेतना देणाऱ्या अनेक गोष्टी, संकल्पना, भाव, श्रद्धा, रूढी, दैवतकल्पना, विधी, भाषा, उपासनापद्धती यांसारख्या बाबी माणसाच्या जगण्याचा अविभाज्य भाग असतात. त्यालाच आपण आपली लोकसंस्कृती असे म्हणतो. ती सामान्यपणे सांगता येत नाही. दाखविता येत नाही. अशी ही संस्कृती विधी, उत्सव, व्रते, सण, ओवीगीते, नृत्य, नसंगीतादी कला यांच्या माध्यमातून अविष्कारीत होत असते. आपल्या लोक संस्कृतीमधील मौखिक परंपरेने चालत आलेल्या ओवीगीतांना महत्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे.आपल्या समाजात स्त्री आणि ओवी यांचे अतुट नाते निर्माण झालेले आहे. प्रचलित समाजव्यवस्थेत स्त्रीच्या रूपाने ओवीगीतांनतील खजिना टिकवून ठेवला आहे. संसाररूपी स्त्री जेव्हा थकलेली भागलेली असते.तेव्हा ती आपल्या शरीरातील थकवा घालवण्यासाठी, मनात चैतन्य निर्माण करण्यासाठी आपल्या मुखातून ओवी गुणगुणत असते. पण खऱ्या अर्थाने स्त्री आपले मन मोकळे करते, ती जात्यावर बसून ओव्या गाते तेव्हा ! स्त्रीने आपल्या ओवीगीतातून आपल्या आयुष्याचे सार प्रगट केलेले असतात. मराठवाड्यात औरंगाबाद, उस्मानाबाद, बीड, लातूर, परभणी, हिंगोली, जालना या जिल्ह्यांचा समावेश होतो. या जिल्ह्यातील स्त्रीयांनी गायलेली ओवीगीते विपूल प्रमाणात मौखिक परंपरेने चालत आलेलीआहेत.

जात्यावर बसून दळण दळणारी स्त्री प्रामुख्याने निरक्षर, अडाणी असुन तिने कोणत्याही स्वरूपाच्या शाळेचे तोंडसुद्धा पाहिलेले नसतानाही आपल्या कुटुंबाच्या भावविश्वाचे तिने चित्रण आपल्या ओवीगीतातून प्रकट केले आहे. स्त्रीला आपल्या आयुष्यात अनेक प्रकारच्या भमिका साकाराव्या लागतात. आयुष्याचा ताळमेळ जुळवत आईवडिलांची अब्रु जपत ज्याच्या पदरी टाकले आहे, बांधले आहे त्या पतीशी, सासू.सासरे यांच्याशी जुळवून घेऊन आपल्या इच्छा आणि आकांक्षा बाजूला सारून कुळाचे नाव जपण्यासाठी आयुष्यात सातत्याने तडजोडी कराव्या लागतात. दैनंदिन जीवनातील काबाडकष्टाची कामे करताना स्त्रीया आपलं मन मोकळं करण्यासाठी ओवीगीते म्हणतात. दळणकांडणाच्या क्रियेशी ओवीगीतांचा हा परस्परसंबंध स्त्री जीवनातील या ओवीगीतांचे स्थान स्पष्ट करतो. आपल्या समाजवयवस्थेने संपूर्ण कुलाचार, विधी, सण,उत्सव साजरा करण्याची जबाबदारी स्त्रीवर सोपविली आहे. आपल्यावर सोपविलेली जबाबदारी पार पाडत तिच्या शरिराला बऱ्याच प्रमाणात कष्ट घडलेले असते. ते विसरण्यासाठी ओवीगीतांचा आधार घेते. प्रामुख्याने आपल्या समाजातील स्त्रीने आपल्या ओवीगीतातून माहेर, सासर यांचे वर्णन केलेले असते. कुमारी स्त्रीच्या तीन अवस्था महत्वाच्या मानल्या जातात. आठ वर्षांची कन्या 'गौरी' होते. दहाव्या वर्षी ती 'कन्यका' होते. तर बाराव्या वर्षी तिचे 'कुमारिकेत' रूपांतर होते. त्यावेळेपासूनच तिच्या जीवनाला सुरूवात झालेली असते.

कन्या साधारणपणे वयाच्या बाराव्या वर्षी ऋतुमती होते. 'संप्राप्तेद्वादशेवर्षे कुमारित्याभिधीयते' ते यामुळेच म्हटले आहे. हा आनंद ती 'संपूर्ण स्त्री' झाल्याचा असतो. तिच्यातील सुफलित होण्याची क्षमता पूर्णत्वाला पोहोचते. बीज धारण करून त्या अंकूरित करण्यासाठी लागणारी चेतसशक्ती म्हणजे सुफलित करण्याची शक्ती तिला प्राप्त झालेली असते. त्यावेळेपासूनच तिच्या संसाररूपी जीवनाला सुरूवात झालेली असते. आपल्या संसाररूपी जीवनातील चांगल्या, वाईट घटनांची तिला जाण आलेली असते. स्त्रीयांच्या उत्सवात गाण्यांना, ओवीगीतांना महत्व असते.

"आज सुदिन उगवला तिला ऋतु प्राप्त झाला, ऋतु प्राप्त झाला ।।
लजूनी उभी एककडे, शिंपी केशराचे सडे
पाट रांगोळ्या तबकी विडे, तिला बसविले ।।
मखरी सोनियाचे खांब आरसे लाविले रूदरूंद
काचेचे जडित भिंग, वरती राघू कोकिळा ।।

वरील ओवीगीतात स्त्रीजीवनाची तिच्या जीवनातील सुदिनाची प्रशंसा केली आहे. तिच्या जीवनात ऋतुप्राप्त झाला की तिला अनेक जबाबदाऱ्यांना सामोरे जावे लागते तिचे व्यक्तिमत्व फुललेले असते. तीला आपल्या फुललेल्या व्यक्तिमत्वाची लाज वाटत असते. पण दुसऱ्या बाजूला तिचे व्यक्तिमत्व केशराचे सडे शिंपीत असते. म्हणजे स्त्रीच्या जीवनातील महत्वाच्या संसाररूपी खुणा तिच्या अंगावर दिसू लागतात. त्याच स्त्रीदेहाचे चित्रही काही ओव्यांमधून मांडलेले असते. स्त्री आणि सौंदर्य यांचे समीकरण तयार झालेले असते.

“वेणीमध्ये हिरवाची मरवा
की आणू केवडा सांग सखे
तू बनलीस मृगनयनी ।।”

आपल्या समाजात पूर्वीच्या काळी मूलीचा विवाह आठव्या नवव्या वर्षी होत असे. आजही आपल्या समाजव्यवस्थ्रेत पहिल्यांदा नहाण येताच मुलीच्या लग्नाची घाई केली जाते. कुमारिकेच्या प्रथम न्हाणूलीला गायली जाणारी ओवीगीते परंपरेने चालत आलेली आहेत. ओवीगीतातून केवडा, मृग यांसारख्या विविध प्रतिमा स्त्री सौंदयाशी जोडलेल्या आहेत

“आधी ओवी गाते । बाप्पाजी रायाला ।
मगून हाळदीच्या येलाला मायबाईला
बाप्पाजी माझा वडाबया मालन पिंपरण।
दोगाच्या सावलीला । झोप घेते मी सुगरण ।।”

ओवी ही माहेररूपी पाझरातून निर्माण झालेली असते. समाजातील प्रत्येक स्त्रीला आपले माहेर प्रिय असते. आई वडिलांची मायेची सावली आपल्या प्रतिमेवरून कधीही बाजूला जावू नये हीच तिची इच्छा असते. आपले आईवडिल, भाऊ कितीही गरीब असले तरी स्त्रीला ते श्रीमंतच वाटत असतात. आईवडिलांच्या, भावाच्या वैभवाचे गोडवे गात ती आपल्या संसारात रमण्याचा प्रयत्न करीत असते.ओवीगीतात तिने आपल्या आईविषयीच्या भावना व्यक्त करताना वेलीसारखी नाजूक, हळदीसारखी पिवळी धमक अशा विविध गुण आणि प्रतिमांचा वापर करून आईचे गुणगान व्यक्त करते. तिने आपल्या ओवीगीतात पित्याला वडाची उपमा दिली आहे. कारण वडाच्या विस्ताराचा मोठेपणा आपल्या वडलांना लाभला आहे. तर दुसऱ्या बाजूला आपला पिता वडासारखा व्यापक मनाचा वाटत आहे. या वडाची सावली आपल्या कुटुंबावरची कधीच बाजूला होऊ नये हीच तिची इच्छा आहे.

स्त्रीच्या जीवनात आपल्या आईवडिलांइतकेच प्रेम आपल्या आप्त नातेवाईकांवर असते. त्यात भाऊ, मावशी, मामा, मामी, काका, काकी यांच्या आठवणीतून तिच्या मनात मायेचा पाझर निर्माण झालेला असतो. 'मयमरावी, पण मावशी उरावी' ही म्हणत त्यातूनच निर्माण झालेली असावी.

“नदीच्या पल्याड गं । काडी हालती लव्हाळ्याची ।
तिथं माझी होती बाई । मायमावशी जिव्हाळ्याची ।।”

वरील ओवीगीतात मावशीला लव्हाळ्याच्या काडीची उपमा दिली आहे. या संसाररूपी जगात आईच्या नंतर आई इतके प्रेम देणारी कोण असेल ? तर ती मावशीच आहे. लव्हाळ्याच्या काडीचे एक वैशिष्ट्य आहे. ते म्हणजे लव्हाळ्याची काडी वाकेल पण मोडणार नाही. तशी तिला आपली मावशी वाटत असते. मावशीची माया लव्हाळ्याच्या पानासारखी हिरवीगार, तजेलदार, लुसलूशीत आहे. तिच्या ओवीगीतातून मावशीविषयी असणारी ओढ स्पष्ट होते.

“माझ्या बहिणीचा बाळा मला म्हणतो मावशी ।
देवदास हरी माझा फूल जाईचं सुवासी।। ”

जाईच्या फूलासारखा सुंदर दिसणारा बाळ मला बहिणीची बहिण म्हणून मावशी म्हणतो. त्याच्या मावशी या बोलामुळेच तिच्या मनात मायेचा पाझर निर्माण होतो. पावसाळा सुरू होऊन शेतात पेरणी होते. शेतीतील पिके जोमाने डौलत असतात. याच काळात कष्ट करून थकलेल्या भागलेल्या मनाला विश्रांतीची गरज असते. म्हणूनच ती नागपंचमीच्या सणाची ओढ लागते. म्हणजेच सासर सोडून सणासाठी माहेराला जावेसे वाटते. आपल्या संसाररूपी जीवनात सासु सासरे यांची मर्जी सांभाळून ती थकलेली असते.

“सासु आत्याबाई। तुम्ही तुळशीचं पान ।
तुमच्या हाताखाली । सून नांदते लहान ।।”

स्त्रीच्या मंगलमय जीवनात सासु आणि सासरे महत्त्वाचे असतात. आपली मुलगी माहेरी नांदायला जात असताना आई तिला आपल्या अनुभवातून परंपरेने सासू आणि सून यांचे नाते आपल्या आईइतकेच प्रेमाने राहावे. यासाठी ती आपल्या मुलीला गुरूमंत्र देत असते. तू सासूची सासऱ्याची मर्जी राख. दीरबाहे यांना आपलेच भाऊ समजून

त्यांच्याशी प्रेमाने वाग. मग आईने दिलेला संसाररूपी मंत्राचा अवलंब करून सासूबाईंना तुम्ही तुळशीचे पान आहात. सासू ही तुळशीच्या पानासारखी मंगल व पवित्र समजून ती तिच्या हाताखाली नांदत असते. ओवीगीतात अनेक प्रतिमांचा वापर करून त्यात सौंदर्य निर्माण केलेले असते.

## संदर्भग्रंथ :

१. लोकसाहित्याचे अंत:प्रवाह.: प्रभाकर मांडे
२. लोकसाहित्याचे स्वरूप.: प्रभाकर मांडे
३. लोकसाहित्याची रूपरेखा : दुर्गाबाई भागवत
४. भूमी आणि स्त्री: डॉ. शैला लोहिया
५. मौखिकता आणि लोकसाहित्य : मधुकर वाकोडे

❖❖❖

# मानवाच्या जीवनात समतोल आहाराचे महत्त्व

प्रा. रंजना अ. नक्षिणे
गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख
मा.सु.पा.कला, विज्ञान व कै.पां.ठा. वाणिज्य महाविद्यालय, मानोरा, महाराष्ट्र (India)
Mobile No. 9403474902

## प्रस्तावना :—

मानवी शरीराचा व्यापार हा प्रामुख्याने अन्नावर अवलंबून असतो. अन्न ही मानवी जीवनाचे अस्तित्व टिकविण्यास आवश्यक अशी प्राथमिक गरज आहे. शरीराची वाढ होणे, झिज भरुन काढणे, उष्णता निर्मिती, कार्यशक्ती हे सर्व अन्नामुळे घडून येते. त्यामुळे आहारात घेतलेले अन्न पोषणदृष्टया समतोल असायला पाहिजे.

समतोल आहार म्हणजे शरीराला आवश्यक असणारे पोषकतत्वे त्या व्यक्तीच्या वयानुसार शरीर स्थितीनुसार, कार्यानुसार तसेच प्राप्त भौगोलिक परिस्थितीत गरजेनुसार पाहिजे त्या—त्या आहारात कमी कालावधीकरिता शरीर पोषणाच्या भविष्याकरिता तरतूद असणे अशा आहाराला समतोल आहार म्हणता येईल.

मानवाला बऱ्याच जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. ती मग स्त्री असो किंवा पुरुष.

स्त्रियांच्या बाबतीत पाहिले असता आपण म्हणतो की, स्त्री म्हणजे खरे तर गृहकृतदक्ष महिला, स्त्री ही घरातच असणारी, घरकामे करणारी, करवून घेणारी, मुलांच्या शाळा, कॉलेजच्या वेळा सांभाळणारी, सगळयांचे जेवण, खाणे बनविणारी, पतीराज कामावरुन घरी आले की, त्याच हातात गरमागरम चहा, नास्ता देणारी फक्त घर, घर आणि घरातच असणारी परिस्थितीशी तडजोड करुन निमुटपणे जगणारी, जो काय संघर्ष असेल तो स्वत:शी करणारी तोही मनातच/प्रत्येकाच्या गरजा पुरवताना तिच्या नाकी नऊ येते आणि हे सर्व करीत असताना तिला प्रत्येकाची गर्जी सांभाळावी लागते. येते आणि हे सर्व करीत असताना तिला प्रत्येकाची मर्जी सांभाळावी लागते. त्यामध्ये तिची परिस्थिती अशी होऊन जाते की सोडल तर धावते आणि पकडलं तर चावते. सगळयांचे मन सांभाळताना ती नेहमीच स्वत:कडे दुर्लक्ष करीत असते. स्त्री हीच आरोग्याचा केंद्रबिंदु माणून तिची लहाणपणापासून अखेरपर्यंत जोपासना केली तरी समाजाचा काय तर देशाच्या आरोग्याची पातळी निश्‍चित उंचावेल. स्त्री ही कुटुंबाचा आहार टरते. तयार करणे, सर्वांना देते. अखेरपर्यंत संसाराचा गाढा ओढते. स्त्री हा समाजाचा आवश्यक घटक आहे. आजकाल त्यात नोकरी करणाऱ्या स्त्रियांचा आकडा वाढत चाललाय त्याचप्रमाणे पुरुषाची सुध्दा घर, नोकरी आणि इतरही बाबतीत फार ओढताण होते. आणि धावपळीमुळे त्यांनासुध्दा त्याच्या आहाराकडे लक्ष द्यायला वेळ नसतो. म्हणून त्यांच्या गरजा व आरोग्याच्या पातळीवर प्रकाश टाकणे आणि त्यात सुधारणा आणणे आवश्यकच आहे.

## उद्दिष्टे :—

१) मानवाचा आहार विषयक गैरसमज.
२) मानवाला आहार विषयक सवयी लावणे.
३) आरोग्य चांगले ठेवण्यासाठी आहार विषयक सल्ला.
४) समतोल आहाराच्या कमतरतेचे परिणाम
५) पोषक घटकविषयी विस्तृत माहिती

## मानवाचा आहार विषयक गैरसमज :—

मानवाला आपले जीवन सक्षमक करण्यासाठी आहाराच्या माध्यमातून आवश्यक घटक मिळत असताना चुकीच्या पध्दतीने आहार घेतल्यामुळे आजारही निर्माण होतात. आहार कशा पध्दतीने असावा किती प्रमाणात असावा, नेमके काय किती आणि केव्हा घ्यायला पाहिजे आणि आपल्या कामानुसार, शक्तीनुसार कसा आहार घ्यायला पाहिजे, हे त्यांना माहित असायला पाहिजे. शरीर अवयवच्या क्रिया सुरळीत राहण्यासाठी आहार अत्यंत महत्वाचा आहे.

या बाबतीत मानवच स्वत:चा शत्रू आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. बहुसंख्य लोकांचे खाणेपिणे अवेळी असते. आवडते ते खूप खायचे आणि जे आवश्यक आहे त्याकडे दुर्लक्ष करायचे. प्रत्येक वयात विशेषत:

तारुण्यात प्रवेश करताना, प्रौढावस्थेत आणि वृध्दावस्थेत आहाराबाबत मानवाने अतिशय जागरुक असले पाहिजे. त्यांचा आहार हा त्यांच्या वय, लिंग, कामाचे स्वरुप यावर अवलंबून असायला पाहिजे. परंतु सर्वसाधारण घरांमध्ये यावर विचारसुध्दा होत नाही. त्यामुळे मानवामध्ये विकार वाढत जातात. चुकीच्या आहारामुळे त्याच्या वजनावर परिणाम होत आहे. वनज वाढल्यामुळे ते डायटिंगकडे वळतात आणि त्यामुळे त्याचे वनज कमी होत नाही. उलट आहारातून मिळणाऱ्या पोषक मूल्यांना ते मुकतात आणि त्याचा परिणाम म्हणजे नवीन समस्या निर्माण होतात.

## मानवाला आहार विषयक सवयी लावणे :–

- रोज सकाळी एक ग्लास गाईचे कोमट दूध प्यावे.
- नाचणीचे सत्व, खजूर, गव्हाची गुळ घालून पातळ खीर यापैकी पदार्थाचा नाश्ता करावा.
- स्त्रीयांनी पाळीच्या आधी एक आठवडा जड अन्न, रात्री उशिरा जेवण हे कटाक्षाने टाळावे त्यापेक्षा भरपूर तूप घालून मुगाची खिचडी, आमटी, भात, पातळ सूप असा आहार घ्यावा त्यामुळे पाळीचा त्रास होत नाही.
- तुपामध्ये तळून लसणाच्या दोन पाकळया खावयात.
- बहुबीज, अधिक असणारी फळे जसे पेरु, डाळींब इत्यादी खावीत.
- कडधान्ये, तूप, ताक, पालेभाज्या व फळे आवर्जुन खावी.

## आरोग्य चांगले ठेवण्यासाठी आहार विषयक सल्ला :–

### आपल्या शरीराचे ऐका –

रात्रीच्या जागरणामुळे प्रवासामुळे एखाद्या वेळेस शरीर व्यायामाला विरोध कसा असेल तर त्याचे ऐका त्या दिवशी तुम्ही योगा व प्राणायाम करु शकता.

### भुकेच्या वेळेस नक्की खा :–

जेवण पुढे मागे ढकलून नको त्या वेळेस नको ते पदार्थ खाण्यापेक्षा जेवणाच्या वेळा पाळा. काहीच शक्य नसेल तर किमान डाळ, फुटाणे, शेंगदाणे यापैकी काहीही खावे, त्याबरोबरीने नोकरी करणाऱ्यांनी एखादी काकडी, गाजर बरोबर न्यावे.

### पोट भरल्यावर खाणं थांबवावं :–

कितीही आवडीचा पदार्थ असला तरी एका वाढव्यानंतर थांबावो. त्यामुळे जास्तीचे उष्मांक पोटात जाणार नाहीत. कॉफी, चहा, थंड पेय यातून मिळणाऱ्या पोषक उष्मांकापेक्षा ताक, पन्हे, कोकम, सरबत, मिल्कशेक इत्यादी पेये घ्यावीत.

### स्नायूंवर भर द्यावा :–

स्नायू वाढविण्यासाठी प्रथीनेयुक्त आहार व व्यायाम करावा. तरुणाईत वाढलेले स्नायू वृध्दपणा लांबविण्यासाठी उपयोगी पडतात.

### जास्त चरबीयुक्त पदार्थ टाळा :–

तळलेले पदार्थ, प्रक्रिया केलेले मटन इत्यादी पदार्थांवर निर्बंध घालावे. वाफवलेले, कमी तेलावर शिजवलेले ताजे पदार्थ आहारात जास्त असावे. व्यायाम शाळेत जाणे व त्याचप्रमाणे सायकल चालविणे, गड चढणे, पोहणे इत्यादी व्यायाम प्रकारांमध्ये तरुणाईने भाग घ्यावा.

- किमान दोन वेळा नास्ता व २ वेळा जेवण घ्या.
- जेवण गरम घ्यावे.
- वनज ससत तपासावे नवीन अन्न पदार्थाचा रोजच्या जेवणात वापर करावा.
- भाजीचे प्रमाण जास्त असावे. लाल, हिरव्या, पिवळयाा भाज्या आवर्जून खाव्यात.

समतोल आहाराच्या कमतरतेचे परिणाम :—

- डोळे, नखे, त्वचा, मूत्र, मल इत्यादींचा स्वाभाविक रंग बदलून त्यांना पिवळा, लाल किंवा किंचित हिरवा रंग येतो.
- शरीराचे तापमान वाढते किंवा आतून गरम वाटणे तोंडाची चव आंबट वा कडू होणे.
- चक्कर येणे, झोप कमी घेणे, डोळयासमोर अंधारी येणे, निस्तेजपणा येणे, त्वचा, डोळे, केस यांच्यावरची चकाकी कमी होणे, पचन मंदावणे योग्य पोषण न झाल्यामुळे मासिक पाळीचे विकार, डोळयाखालील वर्तुळे उमटणे.
- सौंदर्यविषयक समस्या
- सतत चहा घेतल्या गेल्यामुळे आम्लपित्ताची तक्रार, अल्सर, बध्दकोष्ठता, ॲनिनियासारखे विकार, पाठदुखी, सांधेदुखी

## निष्कर्ष :—

आपल्या राजेच्या कामात सुधारणा करायला हवी. त्यांनी सकाळी भरपूर नास्ता घ्यावा. त्यात अंकुरीत कडधान्य गव्हाची सोजी, अंडी, थालीपीठ, इडली, दोसा घ्यावा जोडीला एक ग्लास दुध किंवा ताक व फळ घ्यावी. पोळी करताना सोयाबीनयुक्त पोळया किंवा नाचणीच पीठ घालून पोळी करावी. कणिक दुधात भिजवावी तसेच टमाटर, काकडी, मेथी, मुळा, गाजर घ्यावे तसेच फळेसुध्दा घ्यावे.

जास्तीत जास्त मिश्र पध्दतीचा वापर करुन स्वयंपाक करावा. दाण्याचा कुट, तिळ कुट, खसखस हे पदार्थ वापरावे. तेल घाणीवरचे ताजे वापरने आवश्यक रिफाईन्ड तेल टाळावित. डाळ शिजवताना त्यात एक चमचा मेथी दाणे आवश्य घालावे. याप्रमाणे थोडेफार बदल केल्यास संतुलीत आहाराचे नियम पुष्कळ अंशी पाळले जातील. जास्तीत जास्त आहार घटक एका वेळी भोजनात असावे. कारण हे सर्व एका टिम प्रमाणे काम करतात. अशाप्रकारे मानवो आपल्या खाण्यापिण्याकडे लक्ष दिल्यास आरोग्य विषयक बऱ्याच समस्या कमी होतील आणि जीवन सुखकर होईल.

## संदर्भ ग्रंथ :—


मानव विकास — लिना कांडलकर

पोषण आणि आहारशास्त्र — त्रिवेणी फरकाडे

सकाळ वृत्तपत्र गुरुवार, १६ जुलै २००९

सकाळ फॅमिली डॉक्टर १३ ऑगस्ट, २००४


❖❖❖

# विदर्भातील मराठी गझल : आशय आणि अभिव्यक्तीच्या अंगाने स्वतंत्र वाटचाल करणारे निवडक गझलकार

**प्रा.डॉ. संजय पोहरे**
मराठी विभाग
श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला, महाराष्ट्र (India)
इ मेल : sspohare@gmail.com भ्रमणध्वनी ९८२२२९६१२७

## प्रस्तावना :

मराठी साहित्यातील प्रस्तापितांची मक्तेदारी सुरेश भटांनी मोडीत काढली. आमच्याकडे प्रतिभाशक्ती जी दैवी शक्ती आहे, ती फक्त आमच्याकडेच आहे. अशी सारस्वतांची मक्तेदारी दलित साहित्याने नाकारली त्याचप्रमाणे सुरेश भटांनी छंदीय कवितेचे कोठार फोडून सर्व बहुजन समाजाला खुले करून दिले. अनेक नवीन पिढीमध्ये तंत्रप्रधान कविता आम्हीसुद्धा लिहू शकतो हे आत्मभान जन्माला आले. अनुकरणातून पुढच्या तीन ते चार पिढ्या छंदात्मक कवितेचे मोठ्या दिमाखात लेखन करीत आहेत. ही त्यांची मोठी देण मराठी कवितेला आहे. मराठी कवितेचे साचलेपण बऱ्यापैकी दूर झाले. छंदीय कविता आता कुणीही चांगल्याप्रकारे लिहू शकते. याचे 'इस्लाह' म्हणजे वर्गच त्यांनी घेतले. असा प्रकार मराठी कवितेमध्ये नव्हता. शिक्षण आणि उच्चकुलीन लोकांपुरती कविता सिमित होती. मुक्तछंदाच्या कवितेला मुद्दाम त्यांनी दुय्यमत्व दिले होते. तेव्हा त्यांनी केलेले कार्य लाख मोलाचे वाटते. "कवीचे खरे यश म्हणजे ९० टक्के जनतेने त्याचा मनापासून स्वीकार करणे होय. म्हणूनच कवीचे "सर्वोच्च न्यायालय म्हणजे संत कबीर, संत रविदास, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम महाराज आदी काव्यसूर्यांना जन्म देणारा बहुजनसमाजच आहे, असे माझे ठाम मत आहे. कारण विश्वात्मकतेशिवाय खरा कवी घडूच शकत नाही." याच आशय आणि अभिव्यक्तीला समोर घेवून आपली स्वतंत्र वाटचाल केली आहे अशा काही गझलकारांचा विचार येथे करणे क्रमप्राप्त आहे.

## नीलकांत ढोले ( जन्म : १५ जाने. १ ९ ३ ९ ) :

नीलकांत ढोले, विदर्भातील मराठी गझलेतील पहिल्या पिढीतील सुरेश भटांचा ३० वर्षांपेक्षा जास्त काळ सहवास लाभलेले महत्त्वाचे गझलकार आहेत. त्यांचे 'अग्निबन' १९८०, 'कळा काळजाच्या' २००२ असे दोन कविता संग्रह प्रकाशित आहेत. त्यांच्या अनेक शेरांवर सुरेश भटांचा प्रभाव स्पष्ट जाणवतो. त्यासंबंधी राम शेवाळकर म्हणतात- "सुरेश भटांच्या आशय व अभिव्यक्तीचे वळण कवीने हक्काने गिरवले असल्याची साक्ष अनेक ठिकाणी पटते."[1]

अरे ! पोळले ओठ येथे दुधाने
कसा ध्यास घेऊ तुझ्या अमृताचा ?

नीलकांत ढोले यांनी सुरुवातीच्या काळात प्रभावातून, अनुकरणातून गझल लिहिली असली, तरी ती त्यांच्या गझलेची नक्कल नसून आपल्या अनुभवातून आलेला स्वत्व दर्शन मात्र स्पष्ट दिसते. त्यांचे संस्कारक्षम वय हे ग्रामीण जनजीवनामध्ये गेल्यामुळे तेथील सामाजिक भीषण परिस्थिती त्यांनी स्वतः अनुभवलेली आहे . स्वातंत्र्योत्तर कालखंडात सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या आयुष्यात फार बदल झालेला नाही. तीच दुःखे, तेच नैराश्य पसरलेले चेहरे, तेच फाटक्या आयुष्याला ढिगळं लावत जगण्याची पद्धत, यामध्ये काही एक बदल झालेला नाही.

"निर्भिड या समोर अश्राप कोकरांनो
बेमान लांडग्याची पळणार जात आहे !
आता परंपरेचा इतिहा संपलेला
जुलुमास सोसणारी गळणार कात आहे !"[२]

उपरोक्त 'झाली जिवंत प्रेते' या गझलेतील दोन शेरांवरून सामाजिक जाणिवेची गझल आहे. त्यामध्ये ज्यांनी कोणताही गुन्हा केला नाही, परंतु ते शिक्षा भोगताहेत त्यांच्यामध्ये हिम्मत देण्याचे काम कवी करताहेत. कारण समाजाच्या

ठेकेदारांनी निष्पाप लोकांना लुबाडलेले आहे आणि हाच इतिहास आहे. परंतु आता अशा परंपरा आपण संपवल्या पाहिजेत. कात टाकून नव्या दमाने निर्भिडपणे अशा प्रवृत्तीविरूद्ध लढण्याचे बळ त्यांच्यामध्ये जाणीव निर्माण करीत आहेत.

नीलकांत ढोले यांनी गझलेचा मंत्र, आशय, अभिव्यक्ती साधनेने मिळवलेली आहे. गझलेमध्ये तंत्रदृष्ट्या काही ठिकाणी धरसोड झालेली आहे. परंतु कविता म्हणून त्यांच्या काव्य वा गझलियतला तोड नाही. हे आवर्जून सांगावे लागेल.

## राम पंडित (जन्म : ५ एप्रिल १ ९५०) :

'राम पंडित हिंदी - उर्दू - मराठी गझलांचे अभ्यासक, संपादक म्हणून ख्यातनाम आहेत. मराठी गझलांच्या अनेक प्रातिनिधिक संग्रहांचे आणि विशेषांकांचे संपादन त्यांनी केले आहे. त्यांनी संपादित केलेला 'अन उदेला एक तारा वेगळा' २०१०, हा सुरेश भट गौरव ग्रंथ त्यांच्या चोखंदळ संपादनाचा उत्तम नमुना आहे. त्याचप्रमाणे 'गझल सुरेश भटांनंतर' २०११, 'विदर्भातील मराठी गझल' २००४, 'मराठी गजल अर्धशतकाचा प्रवास' २०१४ हे ग्रंथ प्रकाशित आहेत. 'गजलिका' २००४, या त्यांच्या संग्रहात काही रुबाया, द्विपद्यांसह गझलांचा समावेश आहे. फैज अहमद फैज, नासिर काजमी, मजरूह सुलतानपुरी, सआदत हसन मंटो इ. शायर लेखकांवरील समर्पणात्मक गझला हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. त्यांच्या गझलात आलेल्या 'मेघ - चित्र', 'विचार - कारवॉ , 'तर्क - चर्चा' , 'भावना - प्रवाह', 'रान - तन', 'जीवन - जुगार' अशा जोडशब्दांचा वृत्तानुरोधी आशयाच्यादृष्टीने त्यांनी केलेला उपयोग नव्या जुन्या गझलकारांना अनुकरणीय ठरावा .

## प्रमोद वाळके ( जन्म : ६ जुलै १ ९ ५३ ) :

प्रमोद वाळके 'युगंधर' यांचे १९९२, मध्ये 'स्पंदन निळ्या नभाचे' २००६, 'प्रश्नांची गझल' २०११, हे गझलसंग्रह आणि 'आंबेडकरी गझलवेध' २०१८, 'संग्रामपिटक भाग १' २०१८, 'वामनदादा कर्डक आंबेडकरवादी गझलेचा आकृतीबंध' २०१९ ही संपादने प्रसिद्ध आहेत. सुरेश भटांनंतरच्या पहिल्यापिढीतील ते महत्वाचे गझलकार आहेत. परंतु त्यांची गझलेची प्रेरणा सुरेश भट नसून, वामनदादा कर्डक हे आहेत.

प्रमोद वाळके यांची गझल ही सामाजिक जाणिवेची गझल आहे. ती विचार गझल आहे. ती 'निळ्या स्पंदनाची गझल आहे. म्हणजे दलित, शोषित, उपेक्षित, भटके, गरीब, दीन - दुबळे आदी समाजाच्या दुःखाचे प्रतिनिधित्व करणारी गझल आहे. ती प्रज्ञा, शील, करुणा या बुद्धाच्या मानवतावादाला प्रस्थापित करण्यासाठी लेखणी हातात घेऊन निघालेली गझल आहे. त्यांच्या गझलेविषयी डॉ . यशवंत मनोहर म्हणतात, ‘‘प्रमोद वाळके 'युगंधर' यांची गझल वृत्तीने अत्यंत गंभीर आहे. रंजनासाठी ती जन्माला येत नाही. जीर्णमूर्तीभंजन ही तिची प्रतिज्ञा आहे आणि नवजीवन सृजन हा तिचा ध्यास आहे. म्हणून कवी म्हणतो,

"अभंगासारखे जाऊनको तिमिरात प्रज्ञाना ...<br>
तुझे निर्माण नवतेचे असावे ज्ञात प्रज्ञाना "

आंबेडकरी गझलेने समस्त जनांच्या उत्थानासाठी क्रांतीचा सूर धरावा, आंबेडकरी गझलेने फक्त गीतात, गाण्यात न रमता हा समाज परिवर्तनाचा एक मार्ग आहे म्हणून जाणिवपूर्वक याकडे पाहावे. जागतिकीकरणातील अनेक भीषण प्रश्न समोर उभे आहेत. त्यांच्याविषयी सामाजिक न्यायासाठी याचा विचार गझलेतून करावा तेव्हाच समाजामध्ये बदल घडून येईल.

"तिमीर झाला तरी कुठेही नभांगणी पाखरु दिसेना<br>
चुकून काही अनर्थ होता थव्याथव्याने जमावयाचे "[४]

## श्रीकृष्ण राऊत ( जन्म : १ जुलै १ ९ ५५ ) :

मागील ४० वर्षांपासून मराठीतील नामवंत आणि दर्जेदार नियतकालिकांतून श्रीकृष्ण राऊत सातत्याने गझल लेखन करीत आहेत. त्यांचा 'गुलाल' हा गझलसंग्रह १९८९ मध्ये प्रकाशित झाला. या गझलसंग्रहातील केवळ ५० गझलांनी त्यांची मराठी गझलविश्वात स्वत:ची एक स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. २००३ मध्ये 'गुलाल' या संग्रहाची दुसरी आवृत्ती नवीन गझलांसह 'गुलाल आणि इतर गाला' या नावाने प्रकाशित झाली. वयाच्या २३ व्या वर्षी पहिली गझल लिहिणाऱ्या राऊतांचे गझल लेखन वयाच्या ६५ व्या वर्षीदेखील अविरत सुरू आहे. त्यांच्या 'गुलाल' (१९८९), 'गुलाल

आणि इतर गझला' (२००३), 'कारुण्य माणसाला संतत्व दान देते' (२०१९) या संग्रहातील एकूण गझल संख्या १५२ आहे . १९८९ ते २०१९ या ३० वर्षांच्या कालावधीत केवळ दोन गझलसंग्रह लिहून गझल निष्ठेचे उत्तम उदाहरण त्यांनी भटोत्तर गझलेसमोर ठेवले आहे. गझलेच्या संख्येपेक्षा गझलेतील काव्य (गझलियत) लाख मोलाची आहे. हाच वास्तुपाठ यातून निदर्शनास येतो.

श्रीकृष्ण राऊतांच्या गझलेला अनुभव संपन्नतेचे वरदान लाभलेले आहे. एखाद्या सिद्धिप्राप्त वैराग्याच्या शब्दामध्ये असणारे वजन त्यांच्या गझलेच्या शब्दा शब्दांतून प्रत्ययास येते. त्यांचा प्रत्येक शेर वाचणाऱ्याला आपलेसे करून घेतो, तद्वतच सामान्यांना अनुत्तरीत वाटणाऱ्या प्रश्नांना एक सकारात्मक पर्याय देऊन जातो .

"येथली जमीनही नीट ना कळे तुला ,
वाचतोस सारखा काय आसमंत तू."

राऊतांच्या गझलेचे वाचन वेळ, काळ बदलून केले असता, त्यातून वेगवेगळ्या अर्थछटा अनुभवास येतात. त्या अनुभवातून वाचकांस अंतर्मुख होण्याचा आनंद मिळतो.

"सांजवेळी संगतीला एक नाही पाखरू ,
तेरवीच्या पंगतीला खूप आली माणसे "

एका संवेदनशील व्यक्तीच्या मनाला जे - जे प्रश्न पडतात , ते सर्व प्रश्न राऊतांच्या गझलेचा विषय झालेले आहेत . कोणत्याही एका विशिष्ट आवर्तात त्यांच्या गझलेला बांधता येत नाही. एकाच गझलेमध्ये वेगवेगळे विषय येणे, हे गझलेचे वैशिष्ट्य, राऊतांच्या गझलेविषयी तंतोतंत लागू पडणारे आहेत. श्रीकृष्ण राऊतांच्या गझलेतील दुःख एकाचवेळी वैयक्तिक आणि समाजातील दुःखाचे प्रातिनिधीक प्रतीकम्हणून आलेले आहे. संत तुकारामांच्या अभंगातील दुःख जसे एकाचवेळेस तुकोबांचे होते आणि त्याकाळातील सामाजिक जीवनाचेही होते, त्याप्रमाणे अनुभवसदृश्यता या गझलेतून दिसून येते.

“आत्मकेंद्री फार झाले खानदानी आरसे
त्यात नाही स्पष्ट आता दुःख माझे फारसे '

मराठी गझलेला सुरेश भटांच्या पुढे मार्गक्रमण करण्यासाठी उर्दूच्या अद्यावत नियमांचे ज्ञान असणे फार महत्वाचे आहे . गझलेचा गंध मराठी आहे की उर्दू आहे यापेक्षा त्यातील आशय - विषय किती जीवनाचे शाश्वत ज्ञान अवगत करणारा आहे , अंतर्मुख करणारा आहे , विचारप्रवण , आनंद देणारा आहे , सुरेश भटांच्या गझलेवर उर्दू भाषेचा प्रभाव त्यांनी योजलेल्या शब्दावरून दिसतो तर श्रीकृष्ण राऊत यांच्या गझलेवर इंगजी भाषा व शब्दाचा प्रभाव असलेला जाणवतो, उदा. फ्लॅट, फोन, पॉलीश, स्टील, सेंटेड, फोटो, लॉन, नेकलेस, स्फोट, मोबाइल, फ्रीज, कॅरीबॅगा, पिझ्झा, बर्गर, मनिप्लॅट, डॉलर, शेकहॅन्ड, बॉम्ब, शॉवर, फाईल, शोकेस, कॅलेंडर आदी इंग्रजी शब्द येताना दिसतात.

## शिवाजी जवरे ( जन्म : २७ ऑक्टो . १ ९ ५६ ) :

शिवाजी सुखदेव जवरे यांचे 'नाद - निनाद' (१९९९), 'आवेग' (२००४), हे गझलसंग्रह प्रसिद्ध आहेत. विदर्भातील मराठी गझलकार, व्यंगचित्रकार, गझल आकृतीबंधाचे नियम आणि शिस्त यांचे भोक्ते आणि रोखठोकपणा असलेले समीक्षक म्हणून शिवाजी जवरे प्रसिद्ध आहेत. गझल लिहिण्यामागची भूमिका मांडताना ते म्हणतात, "गझल ही दुःख वेचणारी, विसंगतीमधील सुसंगतीची (Paradox) किंवा गंभीरच असावी, असा भाग नाही, पण तिच्या विनोदामागेही चीड असावी, वैषम्य आणि वेदना असावी. घटनाजन्य विनोद किंवा उपहास हा त्या घटनेशी संबंधित असला तरी तो त्या घटनेच्या आणि तत्कालीक व्यक्तीच्या वर्तन निमित्ताने एकूणच मानवाच्या विकृतीवर कालनिरपेक्ष प्रहार करीत असतो विनोद आणि पाणचटपणा यातील भेदरेखा ओळखूनच अशाप्रकारचे लेखन झाले पाहिजे. वृत्त 'चालवता' येतात आणि शब्दांचा सराव आला म्हणून सृजन होत नसते, ती केवळ सामग्री आहे. सामग्रीने सजावट भलेही होईल, त्यात भाव उतरणार नाही. पाच - सात शेरातून निदान दोन - तीन तरी शेर हे आशयाच्या आवश्यकतेतून उतरले आहेत असे वाचका रसिकाला जाणवले पाहिजे." "मुळातच जे अस्सल आहे, अशा लिखाणाला प्रस्तावना असली काय आणि नसली काय, तिचे महत्व कमी होणार नाही आणि मुळात लिखाणामध्ये सुमारपणाच अधिक असेल आणि कितीही मोठ्या व्यक्तीने प्रस्तावना दिली तरी त्याचे मोल काही वाढणार नाही. अर्थात अस्सलपणाच तेवढा महत्वाचा समजावा .

शिवाजी जवरे यांच्या गझलांमध्ये मनात कुठे तरी खेड्यातील शेतकरी कुटुंबांचे संस्कार त्या जीवनानुभवाचे चित्रण, मध्यमवर्गीय समाज जीवन दर्शन डोकावताना दिसते. त्यांच्या गझलांमध्ये ग्रामीण जीवनाचे चित्रण करणाऱ्या अनेक प्रतिमा आलेल्या आहेत . त्यातील संघर्ष आलेले आहेत .

"विकोपाला नका नेऊगड्यांनो आपसी तंटे
अशाने आगलाव्यांना कितीदा फावले रस्ते"

आपल्या आप-आपसातील वादांचे फायदे दुसऱ्यांनी घेतल्यामुळेच आपण देशोधडीला लागलो आहे. इतिहासातील संदर्भात मुस्लिम सत्ताधिशांना यातूनच सत्ता मिळू शकली. पुढे इंग्रजांनी आपल्यावर राज्य केले. आम्ही आमचे घरे, उद्ध्वस्त केली. हा सर्व इतिहास जवरेंच्या पुढे आहे. म्हणून गावातील भावकीच्या वादाला समजावताना ते वरील ओळी उच्चारताना दिसतात .

"रुढीवादी प्रतिगाम्यांचे वर्चस्वच उरले नव्हते
गावाच्या पाणवठ्याशी माझीच अदावत होती." [८]

जवरेंच्या संस्कारक्षम वयात जो जातीवाद त्यांनी पाहिलेला असेल . रूढी परंपरांचे लोक दास झालेली होती . माणसांपेक्षा चालीरिती , प्रथा त्यांना मोठ्या वाटत असतील त्या काळातही कवींनी अशा जुनाट गोष्टींना विरोध केलेला होता . आणिगावाच्या पाणवठयावर सर्वांचाच समान अधिकार आहे , असे विचार मांडले असतील . यातून सुधारणावादाचे पुरस्कर्ते म्हणून कवी आधीपासूनच आहेत, हे स्पष्ट होते .

"सांगून खुणा मी ज्यांना घर माझे पुसले होते ,
नागडी मुले मज त्यांची खिंडारच दावत होती"

गावातील सधन, गर्भ श्रीमंत वा पाटील मंडळी काही वादामुळे, शिक्षणासाठी, नोकरीसाठी वा काही कारणास्तव गावाबाहेर पडली. पण गावाचे आकर्षण त्यांना एक दिवस आपल्या बालपणातील गावाकडे घेवून जाते तेव्हा आपल्याच गावातील आपले घर आपल्याला दुसऱ्या नागड्या मुलांना विचारावे लागते. या वर्णनातून कवी ग्रेसांची गाव नावाची कविता आठवल्याशिवाय राहत नाही.

"आहे तसाच आहे , गावातला धुराळा ,
केलाय चेहऱ्यांनी सत्कार चेहऱ्यांचा.'

## सिद्धार्थ भगत ( जन्म : २ सप्टेंबर १ ९ ६५ ) :

सिद्धार्थ भगत त्यांचे 'युद्धयात्रा' २००६, 'अस्वस्थ मनाच्या नोंदी' २००७, 'यापुढे माझी लढाई' २००९, पुन्हा एकदा बुद्ध हसावा म्हणून' २००७, 'वर्तुळकंसातील अवतरण' २०१३, आणि 'शेवटचा कळ कोवळी उठू दे' २०१६ असे एकूण सहा गझलसंग्रह प्रसिद्ध आहेत .

विदर्भातील मराठी गझलेतील दुसऱ्या पिढीतील एक सिद्धहस्त गझलकार तथा आशय आणि अभिव्यक्तीच्या अंगाने मराठी गझल परंपरेत वेगळी ओळख निर्माण करणारे आंबेडकरी गझलकार म्हणूनही समीक्षक त्यांचा उल्लेख करतात. सिद्धार्थ भगत मनोरंजन वा छंद म्हणून गझलेचा छंद जोपासत नसून जाणीवपूर्वक लिहिणारे गझलकार आहेत. लोकांच्या सुख दुःखाचे त्यांच्या भावनांचे आकांक्षांचे स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही मूल्ये त्यांच्या अभ्युदयाच्या मार्गाचेपथदर्शन करणारे साहित्य आहे. असा आपल्या लेखनावर त्यांना विश्वास आहे. हे लोकांसाठी लिहिलेले साहित्य आहे. वाचतानाही माणसं भेदाभेद करतात, असेच संस्कार होताना दिसतात. आपल्या जाती - धर्मानुसार त्यांचे वाचनांचे ग्रंथ ठरलेली असतात. त्यामुळे सुसंस्कारित लोकांच्याही मानसीकतेमध्ये बदल होण्यासाठीच कधी वेद - पुराणे सोडून मानवतावादी, आंबेडकरवादी साहित्याचेही वाचन करावे, म्हणजे आपली दृष्टि आणि मानसिकता बदलेल, अशी आशा गझलकारांना वाटते .

"भाषेस पाजले पाणी अम्ही नवे
पोलाद आमुच्या शब्दांतुनी झरे"
काय बोलून फायदा आता
मौन माझीच वैखरी आहे" [१२]

"लाख माझ्या तू चुकांचा वाच पाढा
तू पिटावा मी असा डिंडीम नाही"[१३]
"जगायचे स्वतः अन् जागवायचे
ही नित्य जागवी जाणीव भाषणे" [14]
"वणव्यासम ह्या फुलती गझला
मज थंड अशी तव दाद नको"[१५]
"पद आणखी प्रतिष्ठा धनदौलतीपुढे ह्या
करणार म्यान नाही स्वर - वैखरी स्वतःची"[16]
"अजुनी न थंड झाले नजरेतले निखारे
तव एक फुकरीने फुलतील जाणतो मी"[१७]

वरील आपल्या काही शेरांमधून आपली लेखनविषयक जाणीव सिद्धार्थ भगत स्पष्ट करतात. त्यांना माहिती आहे, आपल्या लिहिण्याचे कौतुक होणार नाही. त्यामधील चुकाच तेवढ्या शोधल्या जातील. परंतु त्यांना माहिती आहे, ही पोलादाची भाषा आहे. धनदौलत देवून फितूर करणाऱ्या विचारांना भूलणारी नाही, अशा आशयाच्या शेरांमधून ते जाणवत राहते . सिद्धार्थ भगतांच्या झलेची भाषाचचळवळीच्या कार्यकर्त्याची आहे. मनापासून चळवळीचा कळवळा पदोपदी जाणवतो आहे. भारतीय शोषणाची परंपरा कवीला ज्ञात आहे. त्या शोषणाच्या दृष्ट चक्रातून बाहेर पडण्यासाठी सजग राहण्याची गरज आहे. हा संघर्ष वाईट प्रवृत्तीशी चांगल्या प्रवृत्तीचा आहे. मानवतावादी विचारांचा अमानवतावादी विचारांशी आहे. अभिजनवादी विचारांचा बहुजनवादी विचारांशी आहे.

## गौरवकुमार आठवले ( जन्म : ९ ऑगस्ट १ ९ ६८ ) :

गणेश उर्फ गौरवकुमार विश्राम आठवले त्यांचे 'सवाल' २०००, 'मांडतो फिर्याद मी' २०११ हे दोन गझलसंग्रह प्रसिद्ध आहेत. विदर्भातील मराठी गझ लिहिणाऱ्या दुसऱ्या पिढीतील महत्वाचे गझलकार म्हणून उल्लेख करावा लागतो. गौरवकुमार आठवले यांच्या गझालेतून विविधांगी विषयांची मांडणी त्यांनी केलेली आहे. सामाजिक व्यवस्था, संस्कृती, परंपरा, रूढी, वास्तव, संघर्ष, निसर्ग, प्रेम, मानवी मनाचे दर्शन, अनुभवाचे दर्शन, आत्मपरीक्षण इत्यादी. त्यांच्या गझलेला जशी सुरेश भटांची प्रेरणा आहे तशी डॉ . बाबासाहेब आंबेडकर, भगवान गौतम बुद्ध, महात्मा जोतिबा फुले, अण्णाभाऊ साठे या महापुरुषांच्या विचारांच्या मुशीतून तयार झालेल्या मानवतावादी तत्वज्ञानाचे ते पाईक आहेत. आई - वडिलांच्या अपार कष्टाच्या जीवनानुभवाचा आदर्श त्यांच्या समोर आहे. म्हणून त्यांची गझल प्रेम, निसर्ग वा शृंगारापेक्षा सामाजिक जाणिवेमध्ये फार रमते.

"इतकाच एक माझा त्यांना सवाल आहे
का रंग माणसाचा रक्तास लाल आहे."
"विझली न आग त्यांच्या मेंदूस लागलेली
होऊन प्रेम - वर्षा बरसून पाहिले मी"

जात - धर्म , भेदाभेद , उच्च निचता ही डोक्यात आहे. ती नैसर्गिक नसून, ती मानवनिर्मित आहे. ती द्वेषाची, आग शांत व्हावी सर्व मानवजात ही म्हणून आपण स्वतःप्रेमाने वागावे, कुणी कसेही वागो. इतिहासातील, पुराणातील गोष्टी विसरून नवीन नाते निर्माण करावे. बंधुभावाच्या भावनेने गुण्यागोविंदाने राहावे. परंतु त्यांच्या डोक्यातील विषमतेची आग, उच्चनिचतेची विकृत मानसीकता बदलताना दिसत नाही, हे वास्तव गौरवकुमार आठवले अनुभवाअंती मांडतात.

"वाघ होऊन जगणे आता शिकून घे तू
कुणाकुणाची कुठवर होते शिकार मित्र?"

गौरवकुमार आठवलेंची सामाजिक जाणिवेची गझल आंबेडकरी क्रांतिकारी विचारांची गझल आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले होते, 'शंभर दिवस शेळी होवून जगण्यापेक्षा एक दिवस वाघ होऊन जगा! 'कारण शिकार ही नेहमी शेळपटांची होत असते. वाघाची नाही. हा स्वाभिमानी जगण्याचा मंत्र गौरवकुमार आठवलेंनी आपल्या मनावर कोरून घेतलेला दिसतो .

"सदैव ताठराहिलो कुणापुढे न वाकलो
गुन्हा करीत राहिलो असाच जीवनात मी"

अभिजन समाजाला बहुजनांचे स्वाभिमानाने जगणे डोळयात खुपत होते. तो त्यांना गंभीर असा गुन्हाच वाटत होता.

## अनंत नांदूरकर ' खलीश ' ( जन्म : १३ डिसेंबर १ ९ ६८ ) :

विदर्भातील मराठी गझलकारांच्या पहिल्या पिढीमध्ये अनंत अनिरुद्ध नांदूरकर 'खलीश' यांचा सन्मानाने समावेश करावा लागेल. त्यांचा मराठी गझलेसोबत उर्दू, हिंदी गझलेचा अभ्यास वाखाणण्याजोगा आहे. 'आंतरसल' हा त्यांचा गझलसंग्रह २००७ मध्ये प्रकाशित झाला. 'आंतरसल' हा गझलसंग्रह भीमराव पांचाळे यांच्या गजलसागर प्रतिष्ठान, मुंबईने प्रकाशित केला आहे. ७४ गझला एकाच संग्रहात लिहून गझलेचे अधिकारपद त्यांच्याकडे आले आहे. संगीता जोशी यांनी पेज नंबर २९, ३१ वरील दोन गझला 'मी न केला जमाव शब्दांचा', 'कर्ज झाले फार, यंदाची दिवाळी' या दोन गझलेवरून नांदूरकरांना गझलेची नस सापडलेली आहे. अशी 'शितावरून भाताची परीक्षा' या म्हणीतून त्यांचे कौतुक केले आहे. स्वत:हून जाहिरात करून घेणे हा नांदूरकरांचा स्वभाव नाही, त्यामुळे त्यांच्यासाधेपणाचा फायदा इतरांकडून उचलला जातो, याची जाणिवसुद्धा त्यांना असते तरी,

“श्रेय त्यांनी सर्व का लाटून न्यावे
मान्य आहे , मी इथे घडलो जरासा
हे ही खरेच दुनिया खोट्याच माणसांची
ओठात शांत वार्ता डोळ्यात नीर नाही "[१९]

डोळयात पाणी येण्यासाठी भावनेचा ओलावा लागतो . खोट्या प्रतिष्ठेत जगणाऱ्या महाभागांनी तो नैसर्गिक जगण्याचा ओलावा घालवून बसले आहेत . अनंत नांदूरकरांच्या गझलेतून चेहरा दिसतो . त्यांचा स्वभावातील सोशिकवृत्ती दिसते . त्यांनी जे भोगले ते ओठांवर येऊदेत नाहीत .

"हे पुरे बेगडी हासणे
आतलेही करा मोकळे"
हासऱ्या चेहऱ्याआड मी
लपवितो आसवांचे तळे"[२०]

दाबलेला हुंदका फार काळ थांबवू शकत नाहीत आणि नियतीपुढे धैर्य पांगळे ठरते , अश्वत्थाम्याच्या भळभळत्या जखमेसारखी दुःखे बाहेर पडतात . सर्वसामान्य माणसाचे प्रतिनिधी म्हणून ते व्यक्त होतात , अशा वेदना , दुःख घेऊन आजूबाजूला माणसे फिरताहेत .

"जिंदगी किस्तीत सारी चालली
दीडदमडीचा पगारदार मी"[२१]

'तेरी दो टकिया दी नोकरी मे मेरा लाखो का सावन जाए' या 'रोटी कपडा और मकान' चित्रपटातील गीतकार मलिक वर्मा यांच्या गीताची आठवण करून देणारा हा शेर आहे. मध्यमवर्गीयांच्या आयुष्याची कथा या शेरातून व्यक्त झालेली आहे. माणसाला बऱ्याचदा त्यांच्या मनासारखे वागता येत नाही, आप्त स्वकियांच्या इच्छा, आकांक्षा, संस्कार, जबाबदाऱ्या अशा आदर्शवत शब्दांना भूलून तो जगत असतो.

"वेगळा हा सूर माझा , राग माझा
मांडतो मी आतला वैताग माझा"[२२]
"ओठ भाजून घेतले मी ही
मी न केला सराव शब्दांचा"[२३]

अनंत नांदूरकर 'खलीश' यांच्या गझलेतून सामाजिक जाणीव, सर्वसामान्यांचा कळवळा, साधी - सरळ विचार प्रणाली, कल्पकवृत्ती, चमत्कृतीप्रधान शब्दयोजना आदी गुणांनी त्यांची गझल बहरत आहे.

**समारोप :**

विदर्भातील मराठी गझल या संकल्पनेचा प्रस्तुत संशोधनातील अर्थ म्हणजे मराठी गझलेमध्ये सुरेश भटांनी जे नवप्रवर्तन घडून आणले आहे ते होय. वेगळ्या वाटा-वळणांची तंत्रशुद्ध गझल लेखनाची बाराखडी निर्माण केली, यातून एक नवे गझलेचे पर्व उदयास आले म्हणायला हरकत नाही. मराठी भाषिक विदर्भ प्रांतामध्ये सव्वाशेच्यावर गझलकार गझल लिहिताना दिसतात. विस्तारभयास्तव मोजक्या आणि स्वतंत्र अभिव्यक्तीने वाटचाल करणाऱ्या निवडक गझलकारांचा अभ्यास येथे केलेला आहे. गझलेच्या प्रातिनिधिक अभ्यासासाठी तो पुरेसा आहे, असे वाटते.

**संदर्भ ग्रंथ :**

1. ढोले नीलकांत, प्रस्तावना, 'कळा काळजाच्या', गौर प्रकाश, नागपूर, प्र. आ. २००२, पृ. सहा
2. तत्रैव, पृ .४
3. वाळके प्रमोद, 'प्रश्नांची गझल', युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, प्र. आ. २०११, पृ. १६-१७
4. वाळके प्रमोद, 'स्पंदन निळ्या नभाचे', वाङ्.मयसेवा प्रकाशन, नासिकरोड, प्र .आ .२००६, पृ. १
5. राऊत श्रीकृष्ण, 'गुलाल आणि इतर गझला', उनि. , पृ . ५८
7. राऊत श्रीकृष्ण , ' गुलाल आणि इतर गझला ' , उनि , पृ . २४
8. जवरे शिवाजी, 'गझलपर्व', कीर्ती प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. २००५, पृ. ७
9. जवरे शिवाजी, 'नाद - निनाद' , उनि., पृ . ५०
10. जवरे शिवाजी, 'नाद - निनाद' , उनि., पृ. ५०
11. जवरे शिवाजी, 'नाद - निनाद', उनि, पृ. ५२
12. भगत सिद्धार्थ, 'यापुढे माझी लढाई ', निनाद प्रकाशन, यवतमाळ, प्र. आ. २००६, पृ . ५
13. तत्रैव, पृ. १८
14. तत्रैव, पृ. ६९
15. तत्रैव, पृ. ४१
16. भगत सिद्धार्थ, 'आणि पुन्हा एकदा बुद्ध हसावा म्हणून', निनाद प्रकाशन, यवतमाळ, प्र.आ. २०१२, पृ .८१
17. तत्रैव, पृ. ४०
18. भगत सिद्धार्थ, 'युदयात्रा', उनि., पृ . ६३
19. नांदूरकर अनंत, 'खलीश', आंतरसल, गजलसागर प्रतिष्ठान, मुंबई, प्र. आ.२००७, पृ. ६२
20. तत्रैव, पृ. ६१
21. तत्रैव, पृ .८
22. तत्रैव, पृ. ३५
23. तत्रैव, पृ. ३१

❖❖❖

# संत एकनाथ व्यक्तित्व आणि कर्तृत्व

प्रा.डॉ. संतोष विष्णू चतुर
सहयोगी प्राध्यापक
मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा, जि. यवतमाळ, महाराष्ट्र, (India)
Santoshchatur78@gmail.com

## सारांश

एकनाथांचे चारित्र्य एकविध नसून त्यास अनेक बाजू आहेत. प्रपंच आणि परमार्थ यातील विरोध काढून टाकून त्यांचा समन्वय करणे हे त्यांचे महत्कार्य होय. एकनाथांशिवाय दुसऱ्या कोणासही ते साधलेली दिसत नाही. ज्ञानदेवांचा स्वतःचा असा संसार नव्हता व संत नामदेव, संत तुकाराम प्रापंचिक असले तरी त्यांचे मन प्रपंचात अगदी नव्हते. रामदासांनी राष्ट्राचा प्रपंच केला हे खरे पण म्हणून त्यांना कोणी प्रपंची म्हणणार नाही. तेव्हा आपला गृहस्थाश्रम आदर्शवत करून त्यातच पुन्हा मनाने संन्यस्त होऊन राहणारे एकनाथ हे खरोखर अद्‌वितीय होय प्रवृत्ती आणि निवृत्ती यांचा इतका सुंदर समन्वय अन्यत्र कोठेही आढळणार नाही. पांडित्याच्या कोंडीत तुंबून राहिलेल्या अध्यात्मजलाचे पाठ काढून ते समाजाच्या सर्व थरातून वळविणे हे नाथांचे कार्य होय. ज्ञानदेवांनी भागवतधर्माचा पाया रचला हे खरे असले तरी तत्वज्ञानाच्या उंच भूमिकेवरून बोलत असल्याने त्यांचे व्याख्यान सर्वस्पर्शी होऊ शकत नाही. त्यांची हाक दूरवर पोहोचत नाही. चरित्राप्रमाणे त्यांचा संदेशही काही अतिमाणूष किंवा दिव्य वाटतो. प्रतिभाकाशात स्वैरपणे विहार करणारे ते तत्वज्ञान प्रथम नाथांनी मानवाच्या सामान्य पातळीवर आणून ठेवले. त्यांचा स्वभाव मूळचाच समाजोन्मुख होता व त्यात भागवत धर्माची धुरिणत्व त्यांच्याकडे आल्यामुळे ते अधिकच लोकोन्मुख झाले. नाथांची भारुडे ही त्यांच्या सामाजिक मनाची एक जिवंत साक्षच आहे. त्यांच्या ग्रंथरचनेत अंतर्बाह्य वैचित्र्य आहे. रुक्मिणीस्वयंवरासारखी प्रतीककथा, भागवतासारखी लोकमान्य टीका, भावार्थ रामायणसारखे महाकाव्य, भारुडांसारखी लोकगीते याप्रमाणे विविध प्रकारची रचना करून त्यांनी साहित्याची सर्वांगे पोसली. त्यांच्या काव्याचे अंतरंगही वैचित्र्यपूर्ण असून भक्ती, करुण, वत्सल, वीर, शृंगार इत्यादी विविध रसांचा आस्वाद देण्यास ती समर्थ आहे. भागवतधर्माचा प्रसार करून महाराष्ट्राचे सांस्कृतिक पुनरूज्जीवन नाथांनी केलेले आहे.

## बीजशब्द

भागवतधर्म, प्रपंच, परमार्थ, संप्रदाय, व्यक्तित्व, कर्तृत्व, लोकवाङ्.मय

## प्रस्तावना

ज्ञानदेवांनी ज्याचा पाया रचला त्या धर्म मंदिराला एकनाथांनी 'भागवताचा खांब दिला' असे बहिणाबाईंनी एका अभंगात म्हटले आहे. या वचनातील 'भागवत' हे पद क्लिष्ट आहे. भागवतातील एकादशस्कंधावर टीका रचून नाथांनी भागवत धर्माची शास्त्रोक्त प्रतिष्ठापना केली, असा या वचनाचा साधा अर्थ आहे. पण याखेरीज भागवत म्हणजे भागवतधर्माचे अनुयायी, भक्त वैष्णव त्यांचा मेळावा जमवून त्याला बहुजन समाजाचा आधार भागवत धर्मास देणे, हे नाथांचे मुख्य कार्य होय. हाही अभिप्राय या वचनातून व्यक्त होतो. नाथांनी आपली भागवतधर्मविषयक चळवळ काही एक विशिष्ट दृष्टी ठेवून चालवलेली दिसून येते. जनताजनार्दनाचा पाठिंबा हा कोणत्याही संप्रदायाचा व धर्माचा आत्मा होय. हेच तत्त्व त्यांनी सदैव मनात बाळगले. 'ज्यायोगे संबंध समाजाची धारणा केली जाते, तो धर्म' अशी व्याख्या त्यांनी मनाशी बांधून ठेवली होती. एकनाथाची समाजोन्मुखता ही भागवत धर्माच्या इतिहासात तरी अपूर्व आहे. इतर साक्षात्कारी संताप्रमाणे त्यांच्याही ठिकाणी सर्वात्मप्रभाव हा आहेच. तो तपशीलवार मांडून

दाखविणे हे मात्र नाथांचे अनन्य साधारण असे वैशिष्ट्य असून त्यांचे सामाजिक भान जागृत असल्याची ती एक खूण होय. एकनाथाची ग्रंथरचना अतिप्रचंड असून शिवाय त्यात विविधताही आहे. 'चतु:श्लोकी भागवत', एकादशस्कंधावरील विस्तृत टीका 'भावार्थरामायण' आणि 'रुक्मिणी स्वयंवर' हे त्यांचे प्रमुख ग्रंथ होय. याशिवाय 'हस्तामलक', 'स्वात्मसुख', 'शुकाष्टक', 'आनंदलहरी', 'चिरंजीवपद' यासारखी स्फुट अध्यात्मिक प्रकरणे, काही पौराणिक आख्याने, वसंत चरित्रे आणि असंख्य अभंग, पदे व भारुडे अशी केवढी तरी रचना त्यांच्या नावावर आढळते. त्यांच्या ओवीबद्ध काव्यांची शब्द संख्या सुमारे 60 हजार असून, कविता पावून लाखाच्या घरात आहे. त्यांच्या ग्रंथरचनेचा उद्योग आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत चालू होता. आपले 'भावार्थ रामायण' हे महाकाव्य तसेच अर्धवट सोडून त्यांनी जीवनयात्रा संपवली. एकनाथांच्या लिखाणातून त्यांचे कर्तुत्व कसे सिद्ध होते याचा वेध घेणे, हा प्रस्तुत शोधनिबंधाचा उद्देश आहे.

## संत एकनाथ व्यक्तित्व आणि कर्तृत्व

१३५० ते १६५० या मराठी वाङ्मयाचा दुसऱ्या कालखंडातील सर्वात महत्त्वाचे कवी दोन आहेत. ते म्हणजे संत एकनाथ व संतश्रेष्ठ तुकाराम हे होत. एकनाथ हे वंशपरंपरेने वारकरी पंथाचे तर गुरु परंपरेने दत्त संप्रदायाचे होते. पण त्यांनी त्या दोन पंथाचा समन्वय साधला. त्यांचे गुरू जनार्दनस्वामी यांच्या शिकवणुकीचा या समन्वयात मोठाच वाटा होता. भागवतातील चार श्लोकांवर एकनाथांनी गुरूच्या आज्ञेवरून १०३६ ओव्यांची टीका 'चतु:श्लोकी भागवत' लिहिली. ही त्यांची पहिली रचना. त्यांच्या पुढील ग्रंथ कर्तुत्वाची चुणूक या पहिल्या रचनेतून दिसून आली. भागवताच्या एकादशस्कंधावर एकनाथ यांनी लिहिलेली व 'एकनाथी भागवत' या नावाने विख्यात झालेली टीका, हा त्यांच्या सर्वात महत्त्वाचा ग्रंथ. हा ग्रंथ काशीत पूर्ण केला व तेथील विद्वानांना तो मान्य झाल्याने त्याची पालखीतून मिरवणूक काढण्यात आली, अशी कथा सांगतात. या ग्रंथावर ज्ञानेश्वरांची मोठी छाप आहे. मराठी बद्दलचा अभिमान, गुरुविषयी आदर भाव, श्रीकृष्णविषयी नितांत प्रेम, अद्वैताचा पुरस्कार, भक्ती भावनेच्या विविध छटा, अध्यायाची सरस प्रास्ताविके व उपसंहार, सांगरुपके, उपमा दृष्टांताच्या मालिका अशा सर्व बाबतीत नाथांनी ज्ञानदेवांचे अनुकरण केले आहे हे जाणवते. ज्ञानदेवाचे ऋण त्यांनी पुढे आणखी एका मार्गाने फेडले. 'ज्ञानेश्वरी'च्या प्रतीमध्ये अनेक अपपाठ शिरले होते. एकनाथांनी तिची शुद्ध प्रत सिद्ध केली. मराठी भाषेतील संहिता शोधनाचा हा पहिलाच प्रयत्न म्हणावा लागेल. एकनाथांनी काशीतील वास्तव्यातच 'रुक्मिणी स्वयंवर' हे काव्य १७१२ ओव्यांचे व अठरावा अध्यायाचे, हे स्वयंवर काव्य त्यांनी आपल्या नेहमीच्या प्रसन्न व अलंकारपूर्ण शैलीत लिहिलेले असले तरी त्यातील अध्यात्माने काव्यावर मात केली आहे. संत एकनाथांनी वारकरी संप्रदायाचे पुनरुज्जीवन केले. स्वतः अध्यात्मिक जीवन जगून महाराष्ट्राला त्यांनी प्रेरणा दिली. यासंबंधीचे नाथांचे कार्य फार मोठेच म्हणावे. यासंबंधी न. र. फाटक लिहितात, "महाराष्ट्रातील देवाधर्मासंबंधीच्या अभिमानाला एकनाथांच्या शिकवणीने नवचैतन्य पुरवून वारकरी संप्रदायाच्या रूपाने जी संघटना ज्ञानेश्वरांपासून अस्तित्वात आली, तिचे शैथिल्य व कर्त्यापुरुषाच्या अभावी या संघटनेला आलेले दैन्य एकनाथांच्या शिकवणीने नाहिसे केले. लोकांमध्ये देवा-धर्माच्या अभिमानाचा उल्हास संचारला आणि यालाच पुढे पन्नास वर्षांनी स्वराज्यस्थापनेच्या प्रयत्नाचे फळ येऊन त्याचा परिपाक महाराष्ट्रातील जनतेला भोगायला मिळाला."[१] 'भावार्थरामायण' हा नाथांचा चाळीस हजार ओव्यांचा दुसरा प्रदीर्घ ग्रंथ. हा ग्रंथ अपूर्ण असतानाच नाथांनी इहलोकाचा निरोप घेतला आणि गावबा या त्यांच्या शिष्याने अखेरच्या पंधरा हजार ओव्या तंतोतंत त्यांच्या शैलीत लिहून तो पूर्ण केला. 'दैत्यांच्या त्रासातून देवांची मुक्तता करणे', ही श्री रामचंद्राचे अवतार कार्य होते, अशी मांडणी नाथांनी केली आहे. यानंतर पन्नास वर्षातच स्वराज्याचा उदय झाला. त्यासाठी आवश्यक अशी समाजाची मनोभूमिका तयार करण्यास 'भावार्थरामायणाचा' हातभार लागला, असे अभ्यासकांचे मत आहे. पदे, अभंग, भारुडे, गवळणी, विराण्या अशी स्फुट रचना नाथांनी केली आहे. भारुडे हा प्रकार त्यांच्यामुळेच रूढ झाला. विविध देवता, व्यवसाय, प्राणी, खेळ यांचा या भारूडांमध्ये

त्यांनी कौशल्याने उपयोग करून घेतला आहे. १२५ विषयांवर सुमारे ३०० भारुडे त्यांनी रचलेली आहेत. नाथांचे सुष्म समाजनिरीक्षण व परिचित गोष्टींच्या आधारे नीती बोध व अध्यात्म बोध करण्याचे त्यांचे सामर्थ्य या भारूडांमध्ये विशेषत्वाने दिसते. अर्जदास्त, अभयपत्र, ताकीदपत्र अशा स्फुट गद्य रचनेमध्ये राज्यव्यवहाराची समर्पक चित्रे एकनाथांनी काढली आहेत. ज्ञानदेवा नंतरचे श्रेष्ठ ग्रंथाकर म्हणजे संत एकनाथ. ज्ञानेश्वरीच्या खालोखाल 'एकनाथी भागवता'ला वारकरी पंथात मान्यता लाभली. विविधता हा एकनाथांच्या वांड.मयाचा विशेष होय. ज्ञानेश्वरांचे संशोधन, रुक्मिणीस्वयंवर काव्य, प्रदीर्घ कथापर रचना, एकादशस्कंधावर विस्तृत टीका आणि नाना प्रकारची स्फुट रचना त्यांनी केली. हे सारे लेखन त्यांनी समाजाला बोध देण्यासाठी केले. ते प्रापंचिक संत होते. पण तितकेच मोठे लोकशिक्षक होते.

## श्री एकनाथ चरित्र

संत एकनाथांचा जन्म पैठणास झाला. भानुदास-चक्रपाणी-सूर्यनारायण-एकनाथ याप्रमाणे त्यांची वंशपरंपरा आहे. सुप्रसिद्ध संत भानुदास यांचे एकनाथ हे पणतू होत. लहानपणीच आईबाप निवर्तल्यामुळे त्यांचे संगोपन त्यांचे आजे चक्रपाणी यांनी केले. पैठण हे तेव्हा संस्कृत विद्येचे माहेरघर होते. सहाजिकच नाथांच्या मनावर, बुद्धीवर पैठणच्या संस्कृतचे संस्कार झाले. एकनाथही मोठे बुद्धिवान आणि श्रद्धावान होते. भगवदभक्तीही त्यांच्या घराण्यात अनेक पिढ्यांची होती. तीच एकनाथात अवतरली आणि वयाच्या बाराव्या वर्षी आजाची अनुज्ञाही न घेता ते देवगडास येऊन जनार्दनस्वामीच्या सेवेत राहिले. प्रपंच साधून परमार्थ कसा साधावा हे जनार्दनस्वामींनी त्यांना स्वतःच्या आचरणाने शिकविले. 'एकाजनार्दन'या समासावरूनच गुरुशिष्यांची हृदये किती एकवटलेली होती याची साक्ष पटते. एकनाथांनी देवगडास गुरुमुखातून 'ज्ञानेश्वरी' एकली व त्या ग्रंथात सांगितलेल्या अपूर्व गुरुभक्तीचे व्रतही त्यांनी आचरले. यानंतर गुरुकृपेमुळे सगुण साक्षात्कार व तीर्थयात्रा नाथांना घडली. यात्रेच्या प्रारंभीच पंचवटीस नाथांनी गुरूआज्ञेने चतु:श्लोकी भागवतावर ओवीबद्ध टीका रचून आपल्या काव्य मंदिराचा पाया रचला. वयाच्या पंचविसाव्या वर्षी ते पैठणास आले व गृहस्थाश्रम स्वीकारून तेथे स्थिर झाले. यानंतर भागवत, रुक्मिणीस्वयंवर, काशीकरांचा झालेला विरोध, ज्ञानेश्वरीचे संशोधन हे ग्रंथकर्तृत्व उत्तरार्धातले. १५२१ फाल्गुन वद्य ६ ला त्यांनी पैठण येथे देह ठेवला. देहांतसमयी त्यांचे 'भावार्थरामायण' रचण्याचे काम चालू होते व ते तसेच अर्धवट सोडून नाथ आयुष्याच्या पानावरून उठले.

## नाथांना झालेले समाज दर्शन

समाजात माजलेल्या स्वार्थाचा, दंभाचा आणि आंधळेपणाचा समाचार घेऊन नाथ सकणव बुद्धीने समाजाच्या उद्धाराकडे वळले आहेत. या बहुविध व बहुरंगी समाजास एका भागवत धर्माच्या सूत्रात गोवून त्यास एकमय करून सोडणे, ही नाथांची खरी थोरवी होय. एकनाथ स्वतः परमार्थी असल्यामुळे त्यांनी धार्मिक क्षेत्रातील सोंगे ढोंगे उजेडात आणली हा समाज केवळ अवनतच नव्हे तर जीवन्मृत असून त्यास कोणी शास्ता म्हणून उरला नव्हता. अर्थात राजकीय पारतंत्र्य हे या सामाजिक अवदशेचे मूळ होय. हे मूळ पुढे शिवसमर्थांनी मिळून उपटून टाकले तेव्हा समाजावर आलेली तीनशे वर्षांची जुनी अवकळा धुतली गेली. तत्पूर्वीच्या परतंत्र महाराष्ट्राचे धार्मिक पुढारीपण नाथांनी स्वतःकडे घेतले आणि त्यास स्वातंत्र्योन्मुख करून रामदासांकडे निरोपिले नाथांची धर्मसेवा हीच एक प्रकारे त्यांची राष्ट्रसेवा ठरली.

## मराठी भाषेचे 'नाथ'

एकनाथांच्या काळी मराठी भाषा एकीकडून फारशीचा जुलूम तर दुसरीकडे संस्कृतीचा दुराग्रह याप्रमाणे दुहेरी कैचित सापडली होती. इस्लामी आक्रमणाचा घाला केवळ राजकीय स्वातंत्र्यावरच नसून महाराष्ट्राचा धर्म, भाषा आणि संस्कृती ही सर्व त्या आक्रमणाच्या सपाट्यात सापडून निस्तेज होऊन गेली होती. मराठी भाषेचे म-हाटपण फारसीने गढूळ होऊन गेले. फारसीच्या मराठीवरील आक्रमणास विरोध न

करता परकीय भाषेचे हे लोन नाथांनी आपल्या भाषेत जिरवून टाकले. मराठीप्रमाणेच त्यांचे फारसीवर प्रभुत्व होते व ते त्यांनी स्वभाषा समृद्ध करण्याकडे योजले. त्यांचे भाषाशुद्धीविषयक धोरण विशाल होते. मराठी ही प्राकृत भाषा म्हणून वेदात आणि भक्ती यांच्या निरुपनासाठी तिचा उपयोग करण्याला संस्कृत पंडितांचा विरोध होता. संस्कृत काय किंवा प्राकृत काय दोन्ही भाषेची घडण सामूहिक जीवनातून नैसर्गिकरित्या झालेली आहे. जगातील अशा साऱ्या घडामोडींचा नियंता परमेश्वर आहे तेव्हा “संस्कृत वाणी देवे केली । तर प्राकृत काय चोरापासून जाली” असा एकनाथांचा रोकडा सवाल संस्कृत भाषा पंडितांना होता. नाथांनी प्राकृत भाषेला धर्मभाषा केले असे म्हटले जाते. पण हे आंशिक सत्य आहे. डॉ. म. यु. पठाण यांनी म्हटल्याप्रमाणे, “नाथांनी मराठीला धर्माभाषेचे स्थान दिले नसून, त्यांनी खऱ्या अर्थाने, त्यांच्या काळात प्रचलित असलेल्या जिवंत बोलभाशेला आणि लोकभाषेला स्थान प्राप्त करून दिले.”[२] ज्या भाषेत हरिकथा गायली जाते, ब्रह्मविद्येचा ऊहापोह होतो ती भाषा तत्वतः पवित्रच आहे. देवाच्या ठिकाणी भाषाभिमान नाही अर्थात 'संस्कृत वंद्य नींद्य' हा केवळ दुराभिमानच म्हटला पाहिजे, असे एकनाथांचे मत होते. भागवताच्या मराठी करणावर काशीच्या पंडितांनी आक्षेप घेतला आणि त्या प्रश्नाचा निर्णय करण्यासाठी एकनाथ ताबडतोब काशीला गेले. तेथील पंडितांच्या पुढे त्यांनी आपली भूमिका नम्रतापूर्वक पण निश्चयाने मांडली आपल्या अभिजात धर्मश्रद्धने, विद्वत्तेने आणि साधू वृत्तीने त्यांनी आपल्या विरोधकांची मने जिंकली. त्यांनी एकनाथांच्या ‘मराठी भागवताला’ मान्यता दिली. इतकेच नव्हे तर या प्राकृत ग्रंथाचा उत्स्फूर्तपणे गौरव केला. तात्पर्य इतकेच की संस्कृताभिमान्याचा बोल सोसून त्यांना न दुखविता त्यांची समजूत घालून काशी क्षेत्रात म्हणजे संस्कृत विद्येच्या आगारात त्यांनी मराठी भाषेचा गौरव केला आणि विरोधकांचा विरोध साफ मोडून काढला. खरोखरच मराठी भाषेचे ते 'नाथ' होते.

## एकनाथ आणि ज्ञानदेव

'ज्ञानाचा एका' ही मन सर्वश्रुत आहे. नाथांना गुरु मुखाने 'ज्ञानेश्वरी' ऐकण्याचे भाग्य लाभले. त्यामुळे त्या ग्रंथाची गोडीही त्यांच्या जीभेला लागली. पुढे पुढे तर ते ज्ञानेश्वरीवर पुराणच सांगत. या दोन सत्पुरुषात कालाने जरी तीनशे वर्षाचे अंतर असले तरी दोघांची हृदये एक होती. तात्विकदृष्ट्या 'एकनाथी भागवत' ही श्रीमद्भगवद्गीतेवरील टीका आहे, हे खरे. पण सूक्ष्म दृष्टीने पाहिल्यास ते ज्ञानेश्वरीवरील विस्तृत भाष्य आहे असेच कोणासही वाटेल. किंबहुना तो ज्ञानेश्वरीचाच अवतार आहे. ‘ज्ञानेश्वरी’ आणि ‘नाथभागवत’ हे दोन ग्रंथ अगदी एकरुप वाटतात. या दोन ग्रंथात शेकडो साम्यस्थळे आहेत. तम, शम, दम, अहिंसा इत्यादी गुणांचा दोघांनी सारख्याच व्याख्या केल्या आहेत. दोघांनीही संस्कृतातील ज्ञानभांडार मराठीच्या माळावर आणले. दोघांनीही विरोधकांना न जुमानता मराठी भाषेचा जयजयकार केला आहे. दोघांच्याही ग्रंथात नितांत गुरुभक्ती असून ज्ञान भक्तीच्या एक्याचे प्रतिपादन केले. तात्पर्य विचारसरणी, शब्दयोजना, उपमा, दृष्टांत, भाषासरणी, विनययुक्त आत्मप्रत्यय आणि स्वानुभवाचा रंग अशा सर्वच बाबतीत ‘ज्ञानेश्वरी’ आणि ‘नाथभागवत’ या दोन ग्रंथात बिंब-प्रतिबिंब भाव आहे. प्रतिभा, विद्वत्ता, वक्तृत्व, स्वानुभव इत्यादी गुणांत नाथ श्रेष्ठ व स्वतंत्रप्रज्ञ आहेत. आपणावर ज्ञानदेवांचे ग्रंथरूपाने झालेले उपकार एकनाथांनी त्यांच्या समाधीचे आणि ज्ञानेश्वरीचे संशोधन करून फेडले. एकनाथ हे ज्ञानेश्वरीचे मराठी वाङ्मयाचे पहिले संशोधक आहे.

## एकनाथांची भारुडे

नाथपूर्व कवींनीही (ज्ञानेश्वर, एकनाथ) भारुडे रचली आहेत. पण भारुड म्हटले की, नाथांचे नाव पुढे येते. याचे कारण म्हणजे एकनाथ भारुडांची संख्या, त्याचे वैचित्र्य, व्यापकत्व, त्याचा ठसठशीतपणा, त्यातील रूपकांची, विनोदाची आणि अध्यात्म बोधाची बहार व त्याचा सर्व समाजाच्या थरातून झालेला प्रसार. डॉ. मदन कुलकर्णी म्हणतात, “नाथांची भारुडे रूपक स्वरूपी आहेत. तोच त्यांच्या भारुडाचा आत्मा आहे. परमेश्वराचे स्वरूप, अध्यात्माचा विचार, देहाची नश्वरता, अध्यात्म साधनेत षडरिपूचे अडथळे,

संसारसक्ती अशा कितीतरी विषयांवर रूपकाश्रयाने त्यांनी भारुडे लिहिली. त्यासाठी व्यक्ती, प्राणीमात्र, खेळ अशा कितीतरी दैनंदिन जीवनातील परिचित व्यक्ती आणि वस्तूंवर ही भारुडे रचली."[३] ही भारुडे एकूण शे-सव्वाशे असून त्यांची संख्या तीनशेच्या आसपास आहे. नाथांनी हे लोकवांड.मय लोकशिक्षणाच्या कामी योजले. समाजाचा तळाचा वर्ग, त्याच्या आवडीनिवडी, त्याचे रागलोभ, त्याची सुखदुःखे ही सारी नाथांनी नीटपणे न्याहाळली असून त्यांच्याशी ते पूर्णपणे समरस झाले होते. सर्व भारुडांमधून एकनाथांच्या कवीमनाची व्यापक व गाढ सहानुभूती व्यक्त होते. "बहुजानासाठीच नाथांनी भारुडाचा प्रपंच केला. नाथांनी ही भारुडे म्हणजे नाथांच्या हृद्यातील उदार हृद्याचे बोल आहेत."[४] नाथांनी या काव्यप्रकारावर भर दिला. याचे कारण त्यांना मिळालेला अवसर व त्यांच्या मनाची पारमार्थिक अवस्थाही असणे शक्य आहे. नाथांचा जीवित हेतू भक्तीचा प्रसार हा होता व तत्सिद्धीसाठी त्यांनी भारुड हे एक प्रभावी साधन म्हणून वापरले. ज्ञानेश्वर, नामदेवानंतर एका दृष्टीने संपलेला भक्तिमार्ग पुन्हा वाढीस लावण्यासाठी एकनाथांसारख्या भक्तधुरंधराचीच जरुरी होती. नाथ चांगले सुखवस्तू, प्रापंचिक होते तसेच त्यांच्या ठिकाणी विषय वैराग्य व प्रपंचविन्मुखताही होती. यासर्व अनुकूल परिस्थितीचा उपयोग त्यांनी लोकोद्धारासाठी करून घेतला व या कामी भारुड हे साधन विशेष उपयोगी पडले. प्रारंभी निर्गुण विचार व विठ्ठल भक्तीचा पुरस्कार नाथांनी केलेला आढळतो. समाजाच्या सर्व थरात भागवत धर्माचा प्रसार करून नेणत्यांना जाणते करणे हे त्यांचे जीवितकार्य असल्यामुळे तत्सिद्धर्थ ही भारुडे त्यांनी रचली.

**लोकसाहित्यकार एकनाथ**

बहुजनांच्या भावना ध्यानात घेऊन मुख्यत: त्यांच्यासाठी साहित्य रचणारा एक लोकसाहित्यकार संत एकनाथ. मराठी संत साहित्याचे जेष्ठ अभ्यासक आणि मराठी वाड.मयाचे एक श्रेष्ठ इतिहासकार प्रा. डॉ. ल. रा. नासिराबादकर यांनी म्हटले की, "विद्वानांसाठी आणि सर्वसामान्यांसाठी प्रौढ आणि आख्यान स्वरुपाची रचना केल्यानंतर बहुजनासाठी, अज्ञजनांसाठी त्यांना समजेल, रुचेल आणि पचेल अशी रचना करणे हाही नाथांचा एक दृष्टिकोन होता. त्यासाठी त्यांनी समाजात बहुरूढ असणाऱ्या अश्या भारूडातून काही रचना केली. बहुजनांच्या नित्याच्याच जीवनातील, संसारातील, व्यवहारातील दाखले घेऊन त्यांनी समाजाला भक्तीरसाचे घुटके पाजले."[५] ह्याच हेतूने त्यांची प्रत्येक वांगड.मयीन कृती प्रेरित झाली आहे. त्यांच्याइतकी प्रचंड, प्रसन्न आणि विविध ग्रंथरचना करणारा दुसरा कवी नसेल. त्यांची एकूण कविता पाहून लाखाच्या घरात जावी. ही सर्व रचना समाजास काहीएक सांगावे, शिकवावे या बुद्धीतून जन्मलेली आहे. नाथकालीन समाज हा दुःख दारिद्र्याने पिचून गेलेला होता. यादवकालीन वैभवाचा मागमूसही नाथकाळात दिसत नाही. जीवन्मृतावस्थेत काळ कंठणाऱ्या या स्वकालीन समाजाची काही चित्रे नाथांनी काढली असून ती अतिविदारक वठली आहेत. सामाजिक सुख-दुःखाविषयी आस्था बाळगणाऱ्या या संत कवीची सहानुभूती विशाल होती, पाहणे बारीक होते, समाजोद्धाराची तळमळ जिवंत होती आणि त्यांच्या अभिप्रायात एक प्रकारचा मार्मिकपणा होता. नाथांच्या लेखणीतून उतरलेली शब्दचित्रे पाहिल्यास त्यावरून तत्कालीन समाजाची स्थितीगती आपोआप कळून येईल. आपल्या बहुविध, बहुरंगी आणि बहुछंदी समाजास एका भागवत धर्माच्या सूत्रात गोवून त्यास एकरूप करून टाकणे हे नाथांचे महत्कृत्य होय. परतंत्र महाराष्ट्राचे धार्मिक पुढारीपण नाथांनी स्वतःकडे घेतले व त्यास स्वातंत्र्योन्मुख करून भविष्यकालाकडे निरोविले. त्यांची धर्मसेवा हीच एक प्रकारे राष्ट्र सेवा झाली आणि त्यासाठी लोकसाहित्य हे साधन एकनाथांनी वापरले.

## आबाल सुबोध रचना

एकनाथी भागवताची बैठक आणि त्याचा उठाव कवीच्या लोकोन्मुख वृत्तीतून झाला आहे. इतकेच नव्हे तर एकनाथांचा कोणताही ग्रंथ घेतला तरी त्यात त्यांनी लोकसाहित्यकाराची भूमिका घेतलेली दिसून येते. विशेषत: त्यांचे भावार्थरामायण व भारुडे यामध्ये तर ही गोष्ट ठळकपणे जाणवते. नाथांची लोकोन्मुखवृत्ती, त्यांच्या रचनापद्धतीत व भाषासरणीत प्रत्ययास येते. निरुपणाचा विषय पिंजून पिंजून

इतका विरळ करावा की, तो थेट तळाच्या वर्गासही सुलभ झाला पाहिजे. ही दृष्टी नाथांनी सर्वत्र ठेवलेली दिसते. त्यांच्या ग्रंथातील विस्ताराचे व पुनरुक्तीचे बीज या प्रवृत्तीत आहे. 'एकनाथी भागवत' ही ज्ञानेश्वराची सोपी करून वाढवलेली आवृत्ती आहे, असे म्हणतात. 'एकनाथी भागवता'स आबालसुबोध हे विशेषण शोभून दिसावे. कीर्तनकार असल्यामुळे कथारूपाने बोध करण्याचे कसब त्यात आहे.

## भाषाविषयक धोरण

एकनाथांची भाषाविषयक भूमिका व त्यांची भाषाशैली लोकसाहित्यकारास साजेशी अशीच आहे. लोकभाषेचा गौरव करून तिला प्रतिष्ठा मिळवून देण्याचे मोठे कार्य त्यांनी केले व तसे करण्यात त्यांची लोकसाहित्यकार ही भूमिकाच स्पष्ट होते. त्यांची भाषाशैलीही या भूमिकेस साजेशी आहे. प्रा. डॉ. दामोदर कुलकर्णी म्हणतात, "नाथांच्या 'मराठी' भाषेची कांती, तेजस्विता, तिचा लवचिकपणा, तिचे नादानुसंधान, तिची समाज प्रौढी, तिची चपल नृत्यगर्भता, तिची अचूक जानकारी व तिचे अर्थानुसंधान हे इतके विलक्षण आहे की, नाथांची ही 'वांड.मोहिनी' गुरुभक्तीच्या गुरुग्रंथात उद्धवाप्रमाणे गुरुगौरवाने स्वानंदमत्त डुलत असलेली दिसते."[६] नाथांचा भर संक्षेपावर किंवा शब्दांच्या मीतव्ययावर नसून आपले लिहिणे सुबोध कसे होईल याकडे त्यांचे लक्ष होते. नाथांचे लिहिणे मोठे ऐसपैस व प्रशस्त आहे. मनातील पूर्णार्थ स्पष्टपणे व खुलासेवाररीतीने व्यक्त करावा हा त्यांचा भाव. कारण त्यांचे लिखाण हे चार सुशिक्षीतांसाठी नसून सर्वांसाठी आहे.

## महान कर्मयोगी संत

लोकांच्या भावना त्यांच्या भाषेत व त्यांच्यासाठी बोलून दाखविणारे एकनाथ हे पहिले साहित्यकार होत. त्यांचे मन जिवंत अतएव संवेदनाक्षम असून काळाच्या उत्तरास प्रत्युत्तर देण्याचे सामर्थ्य यात आहे. ही भूमिका एका महान कर्मयोगी संताची आहे. इतकेच की एकनाथात ती बीजरूपाने दिसते तर रामदासातत तिचे सम्यक दर्शन घडते. पण नाथांचा भागवत धर्म हा समर्थांच्या महाराष्ट्रधर्माचा पूर्वज आहे. एकास आनंदवनभुवनाचे स्वप्न नव्हे साक्षात्कार घडला तर दुसऱ्याने तो प्रत्यक्षात आणला.

## वाङ्मयीन फलश्रुती

एकनाथांनी मराठी साहित्यात अनेक नवे प्रवाह आणून सोडले. त्यांनी आपल्या वांड.मयातून ज्या नव्या प्रवृत्तीचे बीजारोपण केले त्याचा पुढील दोन दशकात सर्व अंगांनी विकास झाला. टीकात्मक ग्रंथांच्या प्रांतात शिवकल्याण, रमावल्लभदास, वामनपंडित, शिवरामस्वामी इत्यादी लेखक उदयास आले. मुक्तेश्वर, कृष्णदयार्णव, श्रीधर, मोरोपंत यांनी रामायण, भारत, भागवत या ग्रंथांना मराठी पेहराव चढवून प्रदीर्घ कथा, काव्याचे दालन समृद्ध केले. अख्यानपर रचना करणाऱ्या कवीमालिकेतील रघुनाथ, सामराज, विठ्ठल, नागेश ही नावे आहेत. एकनाथांच्या गवळणीचे लावणी वाड.मयाशी जवळचे नाते आहे. एकनाथांच्या विचारप्रणालीत परंपरा रक्षण आणि परमार्थातील भेदभावांचे निर्मूलन अशा दोन्ही प्रवृत्ती आहेत. त्यांच्या नेमस्तपणामुळे त्यांना त्यांचा समन्वय करता आला पण पुढे तुकाराम आणि रामदास यांनी एकेका प्रवृत्तीचा परमोत्कर्ष बिंदू गाठला. एकनाथांच्या परंपरा रक्षणाच्या प्रवृत्तीची रामदासाच्या पुनरुज्जीवन वादात परिणती झाली, तर तुकारामांच्या प्रबोधन कार्यात नाथांची भेदभाव निर्मूलनाची प्रवृत्ती अधिक प्रखर व धारदार बनली. भागवतधर्माचा प्रसार करताना त्यांनी धर्म साधनेतील दंभ व आत्मवंचना यावर प्रहार केले आणि भक्तीचा जिव्हाळा इतकाच नैतिक मूल्यांचा आग्रह धरला. रामदासांनी महाराष्ट्र धर्माचे विवरण करून महंतांना धर्मजागृतीची आणि क्षत्रियांना धर्मनिष्ठ राजकीय ध्येयवादाची प्रेरणा दिली. एकनाथांच्या धार्मिक व वांड.मयीन कार्याचे आगळेपण त्यांनी मराठी वाड.मयाला जे नवे वळण लावले त्यात आहे. त्यातूनच महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा स्थिरपद व परिपुष्ट झालेली आहे. तुकारामांनी एकनाथांच्या मोठेपणाचे केलेले वर्णन हे खरोखरीच अचूक व अर्थपूर्ण आहे.

## निष्कर्ष

नाथ हे खरे लोकवाङ्मयकार होत. भक्तीचा संदेश समाजाच्या सर्व थरांपर्यंत पोहोचावा या हेतूने त्यांनी विशिष्ट धोरण आखलेले दिसते. किर्तन हे समाजोद्धाराचे एक प्रमुख साधन असल्यामुळे त्यावर तर त्यांनी भर दिलाच पण त्याबरोबरच आख्यानपर काव्ये रचून महाराष्ट्र सारस्वतात एक नवीन दालन त्यांनी उघडले. त्यांच्या ग्रंथ रचनेत अंतर्बाह्य वैचित्र्य आहे. रुक्मिणीस्वयंवरासारखी प्रतीककथा, भागवतासारखी लोकमान्य टीका, भावार्थ रामायणसारखे महाकाव्य, भारुडांसारखी लोकगीते याप्रमाणे विविध प्रकारची रचना करून त्यांनी साहित्याची सर्वांगे पोसली. त्यांच्या काव्याचे अंतरंगही वैचित्र्यपूर्ण असून भक्ती, करुण, वत्सल, वीर, शृंगार इत्यादी विविध रसांचा आस्वाद देण्यास ती समर्थ आहे. पाल्हाळ आणि पुनरुक्ती ही केव्हाही दोषास्पद होत व ती नाथवाड.मयात सपाटून आहेत हे खरे पण त्यास कारण प्रतिभेची उणीव हे नसून ग्रंथकाराच्या प्रचारकी घाटातून हे दोष उद्भवलेली दिसतात. किंबहुना हे दोष म्हणजे त्या त्या गुणांचा अतिरेक आहे असे म्हटले तरी चालेल. भागवत धर्माचा प्रसार करून महाराष्ट्राचे सांस्कृतिक पुनरूज्जीवन नाथांनी केलेले आहे.

एकनाथांचे नाव घेतले की, त्यांची रुपकदृष्टी डोळ्यापुढे उभी राहते. नानाविध कल्पनांनी नटलेली आणि अध्यात्मसूत्रात गुंफलेली त्यांची सर्वांग सुंदर रूपके म्हणजे एक वाग्वैजयंती आहे. रुक्मिणीस्वयंवरांसारखे अख्यान त्यांच्या अंगोपांगी रूपकचातुर्य खेळवून ते अध्यात्ममय करून दाखविण्याचे कौशल्य सामान्य नव्हे. अध्यात्माशी खेळावे तो विषय पिंजून पिंजून विरळ करावा ही नाथांची मनोवृत्ती त्यांच्या सामाजिक मनातून स्फुरली व उलट त्यांचे सामाजिक मन या रूपकाकांकडून पोचले गेले. रूपक हे नाथांचे मराठी साहित्याला देणे आहे व ते त्यांच्याच नावाने सर्वकाळ ओळखले जाईल. ही सर्व कामगिरी पार पाडताना या संतकवीस कर्मठ सांस्कृतिकांकडून पुष्कळच विरोध झाला. पण तो न जुमानता नाथांनी लोकवाणीचा कैवार घेऊन तिच्या पोटी परमार्थाच्या खाणी उघडल्या. हा त्यांचा महाराष्ट्रावरील व मराठी भाषेवरील मोठाच उपकार होय. त्यांच्या मराठीचे मराठपण हे खरोखरच अनन्यसाधारण असून प्रसंगानुसार मऊ किंवा कडक कसे व्हावे हे ती जाणते. एकादशस्कंधावरील टीकेत शांत दिसणारा त्यांचा भाषाप्रवाह गवळणीत नाजूक वळणे घेतो, भारुडात अवखळपणे वाहतो आणि भावार्थरामायणात त्यास वीर रसाचे उधान चढते. भाषेप्रमाणे नाथांचे मनही जिवंत होते याची साक्ष त्यांच्या प्रत्येक कृतीतून मिळते. भारुडात ते लोकोन्मुख होते व समाजातील नानाविध घटकांची परीक्षा करून बहूछंदी जनांशी ते त्यांच्याच भाषेत काही स्वहितगुजही ही करू पाहते.

## संदर्भ

१) संपादक, डॉ मदन कुलकर्णी, 'श्री एकनाथ महाराजांची भारुड संहिता व समीक्षा', पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, प्र. आ. नोव्हेंबर १९९८, पृ. १ वरून उद्धृत.
२) डॉ. म. यु. पठाण, 'संत एकनाथ दर्शन', पुणे, प्र. आ. १९८३, पृ. ११५.
३) संपादक, डॉ मदन कुलकर्णी, 'श्री एकनाथ महाराजांची भारुड संहिता व समीक्षा', उनि पृ. १२.
४) तत्रैव पृ. ४.
५) प्रा. डॉ. ल. रा. नासिराबादकर, 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास', फडके प्रकाशन, कोल्हापूर, सहावी आवृत्ती १९९७, पृ.१०८.
६) प्रा. डॉ. दामोदर कुलकर्णी, 'एकनाथी भागवताचा अभ्यास', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९८७, पृ.२१८.

❖❖❖

# ऑगस्ट क्रांती दिन — महिलांचे योगदान


प्रा. भारती दि. रत्नपारखी
सहा. प्राध्यापक (मराठी)
डॉ. आंबेडकर कला वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, चंद्रपूर, महाराष्ट्र, (India)
ईमेल—bhartichimurkar23@gmail.com
मो नं. ९६६५७१०१७३

प्रा. जगदीश आर. चिमुरकर
राज्यशास्त्र, विभाग प्रमुख
डॉ. आंबेडकर कला वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, चंद्रपूर, महाराष्ट्र, (India)
ईमेल—jagdishchimurkar23@gmail.com



## सारांश

१५ ऑगस्ट १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला. २६ जानेवारी १९५० नंतर एक सार्वभौम राष्ट्र म्हणून जगाच्या नकाशावर भारताचे स्थान अधोरेखित झाले. १९८५ ते १९४७ हा भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा गौरवशाली कालखंड म्हणून उल्लेखावा लागेल. प्रदीर्घ सांस्कृतिक परंपरा लाभलेला, वैविध्यातूनही एकता शोधणारा, विस्तीर्ण अज्ञान दारिद्रय, विषमता यामुळे पोखरलेला असूनही चिवटपणे ब्रिटिशांना अहिंसात्मक मार्गाने आव्हान देणारा भारत हा देश जगातील एकमेव उदाहरण आहे. भारतीय स्वातंत्र्य चळवळ ही सर्वात मोठी लोकचळवळ होती. तिच्यामध्ये लाखो स्त्री—पुरूष, जात—पात, उच्चनीचता यांची स्वतंत्र ओळख विसरून एकत्र आले. त्यामुळे साम्राज्यवादी ब्रिटिश जागतिक सत्तेला भारतातून माघार घेणे भाग पडले. या चळवळीत स्त्रियांचा सहभाग लक्षणीय होता. कामकरी, शेतकरी वर्गातील स्त्रियांनी सुध्दा या चळवळीला प्रत्यक्ष—अप्रत्यक्ष सहभाग दिला.


बीजसंज्ञा :— क्रांती, महिला, चळवळ, स्वातंत्र्य

## प्रस्तावना

१९८५ ते १९२० या कालखंडात मवाळवादी व जहालवादी स्त्रियांचा स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग उच्चभ्रू स्त्रियांमार्फत मर्यादित राहिला. पण १९२० ते १९४७ या महात्मा गांधीच्या नेतृत्वाखालील कालखंडात स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांचा सहभाग लक्षणीय ठरला. १८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या स्थापनेनंतर भारतीय राजकारणाला चालना मिळाली. १८८९ नंतर पंडिता रमाबाईच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेसच्या अधिवेशनाला काही स्त्रिया हजर होत्या. वंगभंग आंदोलनानंतर स्त्रियांनी जाहीरपणे ब्रिटिश विरोधी आंदोलनामध्ये भाग घेण्यास सुरूवात केली. १९२० ते १९४७ मध्ये गांधीच्या नेतृत्वामुळे सर्व स्तरांतून भारतीय स्त्रिया स्वातंत्र्य चळवळीत आल्या. त्यांचे प्रेरणास्थान म. गांधीच होते.

लोकमान्य टिळकांच्या नेतृत्वाखाली स्वदेशी, स्वराज्य, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या चतु:सूत्रीच्या कार्यक्रमामध्ये चेतना निर्माण होऊन रमाबाई रानडे यांच्या अध्यक्षतेखाली १९०४ साली झालेल्या अखिल भारतीय स्त्रियांच्या सभेत विविध प्रांतीय स्त्रिया, एकत्र आल्या. १९०५ मध्ये बंगालच्या फाळणीनंतर झालेल्या वंगभंग आंदोलनातील स्त्रियांचा सहभाग लक्षात येण्यासारखा होता. पण या स्त्रिया शहरातील उच्चवणीय, सुशिक्षित, बुध्दिजीवी वर्गातून आल्या होत्या.

चंपारण्य व खेडा सत्याग्रहाच्या आणि लखनोच्या अधिवेशनाच्या वेळी डॉ. ॲनी बेझंट, सरोजिनी नायडू यासारख्या नेतृत्व गुण असणाऱ्या स्त्रिया महिलांना एकत्रीत करण्याचे कार्य करू शकतात याची जाणिव म. गांधीना झाली. ''१९१७ मध्ये गुजरातच्या खेडा जिल्हयातील 'करबंदी सत्याग्रह' व १९१९ साली बिहारमधील चंपारण्य जिल्हयातील निळीच्या शेतीतील इंग्रज मळेवाल्यांविरूध्द झालेला लढा व त्यातील स्त्रियांचा सहभाग यातुनच गांधीजीना स्त्री—शक्तीची जाणीव होऊ लागली. रौलेट कायदा व जालियनवाला बाग हत्याकांड त्यामध्ये अनुसया 'बेनसारख्या स्त्रियांनी महत्वपूर्ण कामगिरी बजावली.''[१] १३ एप्रिल १९१९ रोजी जालियवाला बागेत जनरल डायरने केलेल्या हत्याकांडात स्त्रिया व मुली एकुण ४२ जण मृत्युमुखी पडल्या. माता अत्तर कौर आणि रतनदेवी या रात्रभर मृत शरीरांचे संरक्षण व जखमींना सांभाळत होत्या. जुलै १९१९ मध्ये सरोजिनी नायडू होमरूल लीगच्या प्रतिनिधी म्हणून इग्लंडमध्ये गेल्या असतांना लंडनमध्ये त्यांनी जालियनवाला बाग हत्याकांडाबद्दल निर्भयपणे भाषण केले व याकडे साऱ्या जगाचे लक्ष वेधले.

असहकार व सत्याग्रह आंदोलन (१९२० ते १९३०) या कालखंडामध्ये अंहिसात्मक रित्या आंदोलनाचा राष्ट्रव्यापी कार्यक्रम सुरू होता. त्यामध्ये निवडणूक व विधिमंडळावर बहिष्कार, विदेशी दारू व विदेशी कपडयांवर

बहिष्कार इत्यादी कार्यक्रम हाती घेतले. मुंबई व गुजरात प्रांतात अनेक स्त्रिया कस्तुरबा गांधीच्या नेतृत्वाखाली आंदोलनामध्ये सहभागी झाल्या, त्यामध्ये दंडाबहन, दाईबहन, भक्तीबा, मीठूबहन, मणीबेन, नरहरीबेन पारीख, नंदूबेन, नर्मदाबेन भट इ. महिलांनी सत्याग्रहात भाग घेतला. यामध्ये चरखा वर्ग चालविणे, खादी घरघरातून विकणे, स्वयंसेविकांचे गट तयार करणे, स्वदेशी कापड, स्वदेशी बांगडया वापरण्याबद्दल घरोघरी जाऊन स्त्रियांमध्ये जागृती निर्माण करणे, इत्यादी कार्यक्रमाचे नियोजन केले जायचे. आंदोलनामध्ये स्त्रियांची संख्या वाढू लागली. यशोदाबाई भट, राधाबाई आपटे यांनी कीर्तनाच्या माध्यमाचा वापर करून शहरात व खेडयात जागृती घडवून आणण्याचे कार्य केले. कॉंग्रेसची ध्येये, हुतात्म्याचे बलिदान, इतिहासकालीन स्त्री—पुरूषांची चरित्रे इ. विषय कीर्तनातून प्रभावीपणे मांडले जात. या दशकातील स्त्रियांनी सर्व प्रकारच्या विधायक कार्यक्रमात भाग घेतला.

६ ते १३ एप्रील १९२१ हा सत्याग्रहाचा आठवडा म्हणून म. गांधीनी जाहीर केला. सरोजिनी नायडू यांनी यासाठी अनेक सभा घेतल्या प्रिन्स ऑफ वेल्सच्या भारतभेटीच्या वेळी मुंबईतील हजार महिलांनी निदर्शने केली. इस्लामाच्या रक्षणासाठी ब्रिटिश सैतानांना घालविण्याचे आव्हान मुस्लीम स्त्रियांना केले. गांधीजीनी देशसेवेसाठी स्त्रियांना घराबाहेर पडावे अशी विनंती केली. त्यामुळे मोठया प्रमाणात स्त्रिया सत्याग्रहात भाग घेऊ लागल्या.

बंगालमधील सी. आर. दास. यांच्या विधवा भगिनी उर्मिलादेवी महिलांना देशसेवेसाठी घर सोडण्याचे आवाहन केले. बंगालच्या रस्त्यावर खादी विक्रीची दुकाने सुरू केल्याने सी. आर. दास पकडले गेले. त्यांचे कार्य पुढे त्यांची पत्नी वासंतीदेवी, बहीन उर्मिलादेवी व भाची सुनितादेवी यांनी चालु ठेवले. त्यांनाही अटक झाली. मद्रासच्या पूर्व गोदावरी जिल्हयातील दुव्वरी शुबम्मा हिने या मोहिमेत स्वतःला वाहुन घेतले. १२ वर्षीय दुर्गाबाई देशमुख या लढयात उतरल्या. त्यांनी देवदासीची सभा घेतली तर देवदासींनी २०,०००/— रूपयांची मदत देऊ केली. मदनादेवी मुख्योपाध्याय या वेश्या स्त्रीने १९२२ ते १९२४ या कालखंडात सत्याग्रह चळवळीत भाग घेतला. सरलादेवी चौथुरानी, मुथ्थुलक्ष्मी रेड्डी, अमृत कोर या स्त्रिया नेतृत्वासाठी तयार झाल्या.

सविनय कायदेभंग दांडी येथील सत्याग्रहात सरोजिनी नायडू यांनी धारासना सत्याग्रहाची सूत्रे आपल्या हातात घेतली. सत्याग्रहाच्या पहिल्या दिवशी जमलेल्या सत्याग्रहींना सरोजिनी नायडूंनी सांगितले, लाठीमार झाला तरी प्रतिकारासाठी हात उचलू नये. सत्याग्रही अतिशय निग्रहाने व तुकडया—तुकडयाने मिठागाराकडे गेले. पोलिसांच्या लाठीमाराला न घाबरता ते पुढे गेले. सत्याग्रहीचे अलोट ध्येय, निर्भयता, मृत्यूला हसतमुखाने सामोरे जाणे याचा सर्वानाच आश्चर्य वाटले. यात सरोजिनी नायडू यांना अटक करण्यात आली. सत्याग्रहाची चळवळ भारतभर खेडोपाडी पोहोचली.

या चळवळीत मुंबई व महाराष्ट्रातील स्त्रिया मोठया संख्येने सामील झाल्या. मुंबईतील स्त्रियांच्या चळवळीने भारताचे लक्ष वेधले. १९४० सालच्या वैयक्तिक सत्याग्रहात महाराष्ट्रातील पहिली स्त्री सत्याग्रही पघाताई हरोलीकर या होत्या. दारू दुकानावरील पिकॅटींग, मिठाचा सत्याग्रह, खादी तयार करणे आणि वापरणे हया गोष्टी गांधीनी स्त्रियांवर सोपवल्या. गुजराती स्त्रियांनी परदेशी कापडाची दुकाने बंद पाडली. १९३०—१९३१ सालच्या सत्याग्रह आंदोलनावरून एक लाख लोकांना अटक झाली. त्यापैकी सतरा हजार स्त्रिया होत्या. अनेकदा कारागृहात जागा नसल्याने महिलांना पकडून जंगलात सोडले जाई. त्यामुळे अन्नपाण्याविना चालत येण्याचे कष्ट अनेक भगिंनींनी सोसले. लाठीमार व गोळीबाराला सामोरी गेल्या. सविनय कायदेभंगाच्या चळवळीमध्ये मुंबई बंगाल, मद्रास, ओरिसा, आसाम इ. राज्यातील महिलांनी ठिकठिकाणी ब्रिटिशांच्या विरोधात असहकार आणि स्वदेशी वस्तु वापरण्याविषयी जागृती केली.

८ ऑगस्ट १९४२ रोजी 'भारत छोडो' प्रस्ताव मंजूर झाला. ९ ऑगस्ट प्रमुख नेत्यांना पकडल्याने मुंबईच्या गोवालीया टॅंकवर ''दळणवळणाची साधने नष्ट करून सरकारची प्रशासकीय व्यवस्था खिळखिळी करून भारत स्वतंत्र झाल्याखेरीज हा लढा थांबवू नये.''[२] अशी गर्जना अरूणा असफअली यांनी केली व १९४२ च्या भूमिगत क्रांतीला नेतृत्व दिले. या लढयात सुचेता कृपलानी, मृदुला साराभाई यांनी सहकार्य केले. पोलिसांच्या हाती न लागता ऑल इंडिया कॉंग्रेसची एक प्रतिकचेरी भूमिगत राहून चालवली. चळवळीचे लोण पसरविण्यासाठी अरूणा असफअलीनी देशभर संचार केला. त्यामुळे त्या १९४२ च्या नेत्या मानल्या जातात. २६ डिसेंबर १९४२ ला त्यांचे दिल्लीतील घर, संपत्ती जप्त करून त्यांनी आत्मसमर्पण केले नाही, म्हणून लिलाव केला. डॉ. राम मनोहर लोहिया यांचे बरोबर त्यांनी 'इन्कलाब' चे संपादन केले. त्या लिहितात. ''ही वेळ चर्चेची नाही. देशातील नागरिकाने जमेल तसे क्रांतीचा शिपाई झाले पाहिजे.''[३] त्यांना पकडण्यासाठी पाच हजाराचा पुरस्कार जाहिर झाला. कष्टमय जिवनामुळे त्या गुप्तपणे काम करत राहिल्या ''दैनिक ट्रिब्यून'' ने त्यांना १९४२ ची झाशीची राणी हा सन्मान देऊ केला.

काँग्रेसच्या समाजवादी पार्टीच्या सदस्या उषा मेहता यांचे नाव १९४२ च्या लढयात 'गुप्त रेडिओ केंद्रा'साठी नाव प्रसिद्ध झाले. १४ ऑगस्ट १९४२ ला बाबुभाई व उषा यांच्या रेडिओ केंद्रातून प्रसारण सुरू झाले. दर १५ दिवसांनी जागा बदलत त्या आपल्या केंद्रातुन सामान्य जनतेला संदेश देत राहिल्या. '' ब्रिटिशांनो भारत सोडा'' अशा घोषणा दिल्या जात. 'वंदे मातरम्' ने कार्यक्रम संपत असे. क्रांतिकारकांचे बॉम्बस्फोट जमशेटपूर, हरताळ, चिमूर व आष्टी येथील स्त्रियांवरील अत्याचार याविषयी सर्वात प्रथम बातम्या या रेडिओनेच प्रसारित केल्या. १२ नोव्हेंबर १९४२ ला हे रेडिओ स्टेशन पोलीसांनी छापा टाकून पकडले व त्यांना ४ वर्षाची कैद झाली.

सुचेता कृपलानी यांनी यशस्वीपणे भूमिगत आंदोलनाला नेतृत्व दिले. क्रांतीसिह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या महाराष्ट्रातील साताराच्या प्रतिसरकारच्या चळवळीत लीलाताई पाटील व राजमाता पाटील या स्त्रियांनी सहभाग घेतला. अमळनेर कचेरीवर मोर्चाने जाऊन पोलिसांनी केलेल्या मारहाणीत लीलाताईचा गर्भपात झाला व येरवडा जेलमध्ये शिक्षा झाली. तेथून सुटका करून घेऊन त्यांनी कुंडल येथील स्त्रियांच्या क्रांतिकारी दलाचे नेतृत्व करून 'तुफान' सेनेत स्त्रियांना लढण्याचे शिक्षण दिले.

वाळवा तालुक्यातील राजमाता पाटील यांनी सोलापुरात शिकत असतांना कार्यकर्त्यांच्या सहाय्याने टिळक चौकात झेंडा फडकवला त्यामुळे येरवडा जेलमध्ये कारावास भोगला. या चळवळीसाठी गोवा, बेळगाव, नाशिक या ठिकाणांहून बंदुके व काडतुसे गोळा करून प्रतिसरकार चळवळीतील क्रांतिकारकांना दिली. प्रतिसरकारच्या भूमिगत चळवळीतील 'क्रांतिकारी स्त्री' म्हणून त्यांचे नाव नोंदवले गेले आहे. भारतीय चळवळीतील वेगवेगळया प्रांतातील क्रांतिकारी स्त्रियांचे कार्य अंधारात राहिले. गुप्ततेमुळे त्यांच्या कार्याची नोंद इतिहासात जमा झालीच नाही. स्वातंत्र्य आंदोलनातील त्यांचे योगदान निश्चितच मौलिक स्वरूपाचे आहे.

बंगालमधील तामुलक होगला गावची मातंगिनी हाजरा यांनी १९३० च्या स्थानिक मीट केंद्रावर तिने कायदा मोडला. बंगालच्या गव्हर्नरला 'परत जावा' म्हणत काढलेल्या मोर्चामुळे तिला सहा महिन्यांची सक्त मजूरी झाली. १२ मैल चालत तिने प्रांतिक चळवळीमध्ये भाग घेतला व तिला कैद केले गेले. 'भारत छोडो' आंदोलनात तामुलक शहरातील स्त्री—पुरुषांनी काढलेल्या मोर्चाचे नेतृत्व ७३ वर्षीय वृध्द मातंगिनी हाजराने केले. या वेळी झालेल्या गोळीबारात मातंगिनी हाजरा शहीद झाल्या.

भूमिगत चळवळीतील गुप्ततेमुळे कार्य करूनही अनेक स्त्रियांची नावे पुढे आली नाहीत. अप्रत्यक्ष स्वरूपात अनेक स्त्रियांनी क्रांतिकारकांना लपविण्याचे निरोप देण्याचे, जेवण देण्याचे कार्य केले जे इतिहासात आजही नोंदले गेले नाही.

आर. सी. मजुमदार यांच्या मते, 'सशस्त्र उठाव' हे क्रांतिकारांचे साध्य नसून केवळ साधन होते आणि तेही नाइलाजाने पत्करलेले होते, त्यामागे निश्चित विचारसारणी होती. आध्यात्मिक व तात्विक बैठक होती. साामान्य जनतेच्या प्रक्षोभाला ते वाचा फोडत होते. आणि म्हणूनच त्याच्या होतात्म्यांची कदर सामान्य जनतेला होती. ''भारतीय स्त्रीने केलेला त्याग तिने प्रसंगोप्रसंगी दाखविलेले धैर्य व चाणाक्षपणा वास्तविक अवर्णनीय आहे.''[४]

स्वातंत्र्य आंदोलन व ऑगस्ट क्रांती लढयाच्या इतिहासातील महिलांच्या सहभागाच्या घटनाक्रमांचा आढावा घेतल्यानंतर असे लक्षात येते की, भारतीय स्वातंत्र्य चळवळीत व ऑगस्ट क्रांतीच्या लढयात महिलांचा नेतृत्वासह महत्वपूर्ण व मौलिक सहभाग असलेला दिसून येतो.

## निष्कर्ष

१. भारतीय स्वातंत्र्य आंदोलन व ऑगस्ट क्रांतीलढयात पुरूषांसोबतच स्त्रियांचे मौलिक व महत्वपूर्ण योगदान आहे.

२. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सुरूवातीला १९२० पर्यंत उच्चवर्णीय स्त्रियांचा आणि १९२० नंतर उच्चवर्णीय सोबतच मध्यमवर्गीय व सामान्य स्त्रियांचा सहभाग लक्षणीय होता.

३. स्वातंत्र्य चळवळीत स्त्रियांनी स्वदेशी, बहिष्काराचा मार्ग स्विकारताना तुरूंगवास, ब्रिटिशांचा रोष व अनेक हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या.

४. ब्रिटिशांविरोधातील स्वातंत्र्य चळवळीत सर्वधर्मिय स्त्रियांचा सहभाग दिसून येतो.

## संदर्भ

१. डॉ. सौ. पघजा पाटील, डॉ. सौ. शोभना जाधव, 'भारतीय इतिहासातील स्त्रिया' पृ.क्र.२४८
२. तत्रैव, पृ.क्र. २६२
३. तत्रैव, पृ.क्र. २६३
४. दैनिक लोकसत्ता, दिनांक १० ऑगस्ट २०१३

❖❖❖

# फेसाटीतील लोकसाहित्य

**प्रा.डॉ. सूर्यकांत आजगांवकर**
मराठी विभाग प्रमुख
गुरु नानक खालसा कॉलेज-माटुंगा, मुंबई 19, महाराष्ट्र, (India)

## गोषवारा (Abstract)

फेसाटी ही नवनाथ गोरे यांची युवा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त ग्रामीण कादंबरी आहे. सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील निगडी गाव आणि ग्रामीणपरिसराच्या पार्श्वभूमीवरील ही कादंबरीची आहे. या परिसरात वास्तव्य करून राहणाऱ्या धनगर कुटुंबातील नायक नाथाची व त्याच्या कुटुंबाची कहाणीकादंबरीत कथन केलेली आहे. कादंबरीचा निवेदक नाथाचा इयत्ता पहिली ते एम्. ए. पर्यंतचा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत झालेला शैक्षणिक प्रवास याचे रेखाटन या कादंबरीत केले आहे. तसेच नाथांचे आई-वडील व कुटुंबीय यांच्या हलाखीचे, दुःख, दारिद्र्य व अभावग्रस्तता याने भरलेल्या जीवनाचे चित्रण केले आहे. त्यामुळे कादंबरीला आत्मकथनपर कादंबरीचे परिमाण प्राप्त झालेले आहे. तसेच धनगर समाजाच्या जीवन संस्कृती, रुढी-परंपरा यांचे चित्रण करणारी ही प्रातिनिधिक कादंबरी म्हणूनही तिला महत्त्व प्राप्त झाले आहे. नाथांचे आई-वडील शेरडं विकून जमीन घेऊन अस्थिर जीवनाला स्थिर करू पाहतात. पण अवतीभवतीचा समाज, आप्तस्वकीय आणि शासन यंत्रणा त्यांना स्थिर होऊ देत नाहीत. पण या प्रतिकूल परिस्थितीत निवेदकाच्या मनात आईने फुलवलेला शिक्षणाचे स्वप्न निवेदक नाथा पूर्णत्वास नेतो. नाथा अठराविश्वे दारिद्र्य, उपासमार यांच्याशी संघर्ष करत अभावग्रस्तता बाजूला सारत एम्.ए. पर्यंतचं शिक्षण पूर्ण करतो.या चित्रणाबरोबरच आई-वडिलांच्या आणि भावा-बहिणींच्या कौटुंबिक संघर्षाचं रेखाटन केले आहे.

ग्रामीण पार्श्वभूमी, शेती संस्कृती,, निसर्ग सन्मुखता, गावगाडा या ग्रामीण साहित्याच्या वैशिष्ट्या बरोबरच लोकसाहित्यातील लोककथा, लोकगीते, ओव्या, विधीविधाने, उत्सव, श्रद्धा, समजुती यांचा कथानकाच्या घडणीबरोबर फेसाटीचा आकृतीबंध घडण्यात हातभार लागलेला आहे.

## Bridge Sentence

फेसाटी ही ग्रामीण आत्मकथनपर कादंबरी असली तरी तिच्यात लोकसाहित्याचे प्रकार सहजपणे सामावून घेतलेले आहेत. त्यामुळे फेसाटीत ग्रामीणता आणि लोकसाहित्य यांचा मेळ लेखकाने साधलेला आहे.त्यामुळे ग्रामीण आणि लोकसाहित्याचा अनुबंध निर्माण झालेला दिसून येतो .

## प्रस्तावना

फेसाटी ही नवनाथ गोरे यांची 2018 सालीचा युवा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कादंबरी आहे. त्यानंतर अनेक साहित्य पुरस्कार या पुस्तकाला लाभले आहेत. आतापर्यंत फेसाटी या कादंबरीच्या पाच आवृत्त्या प्रकाशित झालेल्या आहेत. पहिली आवृत्ती प्रियंका पटवर्धन प्रकाशन पुणे, यांनी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या अनुदानातून प्रकाशित केली होती .उर्वरित चार आवृत्या अक्षरवाड.मय प्रकाशन पुणे, यांनी प्रकाशित केलेल्या आहेत.

फेसाटी कादंबरीतून आत्मकथनपर लेखन झालेले आहे .तसेच यापूर्वी बलुतं, उपरा, उचल्या, बेरड, पारधी ,बिराड अशा साहित्यकृतींमधून आत्मकथनपर लेखन झालेले आहे. त्यांना पुरस्कारही लाभले आहेत.नवनाथ गोरे यांच्या फेसाटी या आत्मकथनपर कादंबरीला अल्पावधीत खुप प्रसिद्धी मिळाली. कादंबरीच्या आशयाच्या अनुषंगानं आस्वादात्मक लेखनही झालेले आहे. या पाठीमागचे गमक काय?

फेसाटी कादंबरीची अर्पण पत्रिका पाहा-

अस्मानी संकटांशी दोन हात करता करता
ज्यांची उभी हयात मातीमोल झाली
शिक्षणाची गंगा ज्यांच्या दारात आली
पण परिस्थितीने ज्यांच्या घशाला कोरड पडली
आणि साऱ्याच कचाट्यात ज्यांच्या जल्माची
फेसाटी झाली त्या माझ्या वर्तमान पिढीस---

वरील अर्पण पत्रिकेवरून फेसाटी या ग्रामीण आत्मकथनपर कादंबरीच्या अंतरंगात काय दडले आहे, याची कल्पना वाचक, अभ्यासक यांना सहजपणे येईल .

महाराष्ट्रात आज अनेक भटके विमुक्त जाती- जमाती आहेत. त्यापैकी धनगर, वंजारी ,गवारी, गोवारी ,पारधी , बेलदार ही काही नावे सांगता येतील. पायली -कुडवभर ज्वारी-बाजरी आणि कळशीभर पाण्यासाठी रानोमाळ भटकणारे हे समूह आहेत. स्वातंत्र्याची सात दशके उलटली तरी आजही या बेदखल, वंचित समाजाच्या परिस्थितीत कोणताही सुखद बदल घडून आलेला दिसत नाही. भटक्या जाती- जमातींचे समूह जमिनीचा तुकडा विकत घेऊन  ग्रामीण भागात स्थिरस्थावर होण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु महसूल ,पोलीस या शासकीय यंत्रणांकडून तसेच प्रस्थापित समाजाकडून पुरेसे सहकार्य न लाभल्याने आजही हे समूह अस्थिर,बिनभरवशाचे  जीवन जगत आहेत. हे पारधी, बेरड, बिराड इत्यादी  साहित्यकृतींमधून अधोरेखित झालेले आहे.

प्रस्तुत कादंबरीचे मुखपृष्ठ पाहिले, तर एक व्यक्ती हातात काठी घेऊन उभी आहे. तिच्यासोबत शेळ्या मेंढ्या आहेत . आणि ती एका पक्क्या  घराकडे आशाळभूतपणे पाहत आहे. भटके-विमुक्त यांची स्थिर होण्याची अपेक्षा त्यातून व्यक्त होत आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सात पंचवार्षिक योजना आल्या आणि गेल्या, पण धनगर ,पारधी या भटक्या जाती-जमातींच्या आयुष्यात खास असे काही बदल झालेच नाहीत.  अन्न ,वस्त्र ,निवारा या प्राथमिक गरजा ही त्यांच्या भागविल्या गेल्या नाहीत.  ग्रामीण भागात वास्तव्य करून राहणारे समूह अनेक प्रकारच्या समस्या, अभावग्रस्तता यांनी व्यापून राहिले आहेत.  त्यामुळे सुख-समृद्धी, स्थिरता यापासून ते दूर आहेत . याला जत तालुक्यातील निगडी गावातील डोंगराच्या पायथ्याशी वस्ती करून राहिलेला धनगर समाजही अपवाद नाही.

फेसाटी या कादंबरीला दोन पदर आहेत एक पशुपालन करणाऱ्या शेतमजूर कुटुंबाचा आहे. तर दुसरा पदर धनगर समूहाच्या समाज चित्रणाचा आहे.आज ग्रामीण समाजाला  शिक्षणाचे महत्व कळले आहे. म्हणूनच नाथाची आई नाथाच्या शिक्षणासाठी आपल्या जीवाची आटापिटा करते. आपल्या मुलानी  आपल्यासारखं रानात काम करू नये म्हणून ती नाथाला व मुलींना जाणीवपूर्वक शाळेत पाठवते . परंतु पुरेसे शैक्षणिक वातावरण नसल्यामुळे नाथाला पहिली ते एम.  ए. पर्यंतच्या शैक्षणिक प्रवासात असंख्य अडचणींशी मुकाबला करावा लागतो . शाळेच्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिव्या घालणे, जातीवाचक उल्लेख करणे ह्या शिक्षण व्यवस्थेतील वैगुण्यांमुळे तसेच घरची आर्थिक परिस्थिती नीट नसल्यामुळे नाथाला मध्ये मध्ये शाळा सोडावी लागते. त्यामुळे  शैक्षणिक व्यवस्थेविषयी संतापतो वह्यापुस्तके  फाडून  व्यक्त करतो.

निवेदक नाथाचे आई, वडील (काका  काकू) मोठा भाऊ दादा, बहिणी असे हे शेतकरी कुटुंब दुःख ,दारिद्र्य, उपासमार, अभावग्रस्तता  यांनीभरलेले आहे.पण या कुटुंबात जगण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती आहे.नाथाचे वडील काका शेरडं विकून आलेले पैसे व आंदा मामांना केलेली आर्थिक मदत यातून १८ एकर जमीन खरेदी करुन  भावाच्या नावावर करतात. पण भाबड्या स्वभावामुळे आणि दूरदृष्टीच्या अभावामुळे त्यांची फसगत  होते. शेती करून स्थिर होण्याचा काकांचा प्रयत्न फसतो . भावाने दिलेल्या दोन एकर जमिनीत शेती करतात .पण पुढे या दोन एकर शेतजमिनीपैकी काही भाग हडप केला जातो. शेतीला जोडधंदा म्हणूनकाका कर्ज काढुन  गाय विकत घेतात .पण त्यात यश येत नाही. कर्ज वाढत जाते. ते फेडण्यासाठी शेवटी जमीन विकावी लागते. महसूल ,पोलिस यंत्रणा,गावगाड्यातील पंच मंडळी तसेच आर्थिक बलवान मंडळीकडून होणारा अन्याय  सहन करीत व आप्तस्वकीयांशी  संघर्ष करीत नाथाचे आई-वडील संसाराचा गाडा रेटत राहतात. उपासमार, कर्जाचे डोंगर, देणेक-यांचे तगादे ,नाथा आणि काकांचे आजारपण या सगळ्यावर मात करताना नाथा आणि कुटुंबीय थकून-भागून जातात. मरेपर्यंत कष्ट करून हे कुटुंब पार दमून जाते. त्यांच्या आयुष्याची  फेसाटी  होते.

कादंबरीचा दुसरा पदर हा धनगर समाजाच्या लोकजीवनाचा, संस्कृतीचा आहे. महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील जत तालुक्यातील निगडी गावात डोंगराच्या पायथ्याशी हा धनगर समूह वसलेला आहे.ग्रामीण पार्श्वभूमी असेलेला  हा परिसर, तिथली माणसे , लोकव्यवहार कृषिकेंद्रित संस्कृती, गावगाडा यांच्या बरोबरच तिथल्या रूढी, परंपरा,सिद्धलिंगाच्या पूजेपासून मलकारसिद्धच्या जत्रेपर्यंतचे सण-उत्सव ,सांस्कृतिक घडामोडी तसेच पेरणीपासून मळणी पर्यंतच्या सर्व घटना- घडामोडी यांचे वास्तवदर्शी रेखाटन या कादंबरीत केलेले आहे .त्याच्या जोडीला गावकी भावकी, भावकीतील हेवेदावे ,गावातील स्थानिक राजकारण, नातेसंबंध, सहकार्य व द्वेष मत्सराने  भरलेली माणसे, त्यांच्या उक्ती व कृती आदी गोष्टींतून साकारलेला कादंबरीचा दुसरा पदर मिळूनया कादंबरीचा रुपबंध साकार झाला आहे. या कादंबरीच्या रचनाबंधात कादंबरीकाराने काही नवे प्रयोग केले आहेत का हे पाहणे महत्वाचे आहे.

लेखक नवनाथ गोरे यांनी आपल्या मनोगतात फेसाटीच्या लेखनासाठी आपण आख्यानाचा फॉर्म, रूपबंध  निवडल्याचे सांगितले आहे. पण प्रत्यक्षात कादंबरीचा रूपबंध  आख्यान काव्यासारखा नाही. या कादंबरीत सुरुवातीलाच निवेदकाने सुंबरान म्हणजे सुस्मरण केलेले आहे. निवेदकाने आपल्या जन्माचे, आपल्या कुटुंबाचे आणि धनगर समाजाचे आख्यान कथन केले आहे. आणि ते ऐकण्याचे आवाहनही केले आहे.

प्रारंभीच्या आख्यानासोबत( कथागीत) कादंबरीतील घटना प्रसंग ,व्यक्तिरेखा ,गावगाडा ,दैववाद, निसर्ग- सन्मुखता, श्रद्धा- समजुती या गोष्टी उजागर करण्यासाठी लोकसाहित्यातील लोककथा ,ओव्या ,लोकगीत ,विधीविधाने, म्हणी यांचा वापर केलेला आहे. पण त्यामुळे कथानकाच्या ओघवतेपणात कोणतीही बाधा निर्माण झालेली नाही.पण फेसाटी कादंबरी व लोकसाहित्य यांचा आंतरिक संबंध आहे का? त्यावर प्रकाश टाकण्या पूर्वी ग्रामीण साहित्य व लोकसाहित्य यांचे स्वरूप समजून घेतले पाहिजे.

ग्रामीण जीवनातून फुलणारे, ग्रामीण वास्तवातून साकार होणारे ते ग्रामीण साहित्य होय. कृषिकेंद्रिता हाच ग्रामीण साहित्याचा पाया व निसर्ग -सन्मुखता हे ग्रामसंस्कृतीचे लक्षण आहे. असे नागनाथ कोतापल्ले यांनी प्रतिपादन केले आहे. ग्रामीण साहित्यातील ग्रामीणजीवन, ग्रामसंस्कृती यांचा आविष्कार हालोककला, लोककथा, लोकगीत, उखाणे, ओव्या, म्हणी, विधिविधाने यातून होत असतो.

ग्रामीण साहित्य हे व्यक्तिकेंद्री असते. व्यक्तीमनाचा आविष्कार हा ग्रामीण साहित्यतून होतो. त्यावेळी कृषिकेंद्रित संस्कृतीतून तयार झालेले लोकमन आणि संस्कृती संवर्धनासाठी असलेला गावगाडा व्यक्तीच्या जडणघडणीला हातभार लावीत असतो.ह्या गावगाड्यातून समूहमनाचा आविष्कार होत असतो. तसाच लोकसाहित्यातूनही समूहमनाचा आविष्कार होतो . हे नीट लक्षात घेतले तर लोकसाहित्याशी ग्रामीण साहित्याचे नाते प्रस्थापित झालेले असते हे स्पष्ट होईल.

लोकसाहित्य हा लोकमानसाचा आविष्कार असतो . लोकसमूहातील साहित्य निर्माण करणाऱ्या व्यक्तीची आपण साहित्य निर्माण करतो अशी धारणा नसते. तर ती समूहाची निर्मिती आहे असा भाव त्यांच्यापाशी असतो. शेतात खुरपणी व निंदणी करताना, अन्य कृषी कामे करताना तसेच दळताना, लग्नविधीच्या वेळी व देव देव करताना लोकगीते , विधीगीते ,ओव्या गायल्या जातात. भौतिक शक्तींना संतुष्ट करून घेण्यासाठी विधीविधाने केली जातात. धनगर समाजात सण उत्सवांच्या वेळी धनगरी ओव्याचं गायन केलं जातं. तसेच मेलेल्या माणसाच्या बाराव्याच्या विधीला जागरण करतात . त्यावेळी आख्यान काव्याचे सादरीकरण केले जाते . शेकोटीच्या वेळी सुद्धा धनगरी ओव्या गायिल्या जातात. शेतकऱ्यांच्या शेतात शेळ्या-मेंढ्या बसवितात त्यावेळी धनगर, मेंढपाळ रानटी प्राण्यांपासून रक्षण करण्यासाठी रात्रभर जागे राहतात. त्यावेळी आपले आराध्य दैवत विरोबा, खंडोबा, धुळोबा,शिंग्रोबा आधीचे स्मरण करणाऱ्या ओव्या गातात. त्यातून त्यांना एक बळ लाभत असते.एकूणच लोकसाहित्य ग्रामीण समाज, समूह यांच्या जगण्याचा एक भाग बनलेले असते.

मराठी साहित्यात विशेषत: ग्रामीण साहित्याला लोकसाहित्याचा पदर असलेला दिसून येतो. पवन काठचा धोंडी( गो. नी. दांडेकर), बनगरवाडी (व्यंकटेश माडगूळकर), टारफुला (शंकर पाटील), गोतावळा (आनंद यादव)इत्यादी कादंबऱ्यात लोकसाहित्याचे प्रकार ,तत्व आलेली आहेत. फकीरा (अण्णाभाऊ साठे), लोककथा -७८ (रत्नाकर मतकरी) या साहित्यकृतीमध्येही सामूहिकता, व्यक्तीहीनता, गूढता, परिवर्तनशीलता आधी लोकसाहित्यातील लोकतत्वं अभिव्यक्त झालेली आहेत.

फेसाटी कादंबरी निगडी आणि आजूबाजूचा ग्रामीण स्थलावकाश, कृषिकेंद्रित जीवन संस्कृती, जातिभेद ,गाव गाडा, निसर्ग सन्मुखता, सण-उत्सव यातून आकारास आलेली आहे. पण त्याचबरोबर या कादंबरीचे लोकसाहित्याशी अतूट नाते आहे. कादंबरीच्या सुरुवातीला सुंबरानमध्ये लेखकानं लोकगीताचा फॉर्म वापरलेला आहे. त्यातून आपल्या जन्माच्या कहाणी बरोबर आई वडील धनगर समूह यांच्याबद्दल कथन केले आहे.

कादंबरीतील घटना प्रसंगांचं निवेदन करताना, निवेदकाने उमदीच्या मलकारसिद्धच्या जत्रोत्सवाचे वर्णन करणे, निवेदकाने मलकारसिद्धच्या संदर्भात आईला प्रश्न विचारणे, आईने मलकारसिद्धची लोक कथा सांगणे अशा घटना प्रसंगातून कथानकाची उभारणी होण्यास मदत होतेच पण त्याच बरोबर या लोककथेतून देवदेवता मधील संबंध, नातेसबंध यावर प्रकाश टाकला जातो. या उपकथानकामुळे ग्रामीण भागातील लोकजीवनामध्ये श्रद्धाभाव टिकून ठेवण्यास मदत होते.

निवेदक नाथा चौथीच्या वर्गात असताना शाळेच्या स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमात रामजी चव्हाण यांच्या सहकार्याने श्रीयाळ -चांगुणा यांची पारंपरिक धनगर ओवी सादर करतो. व गुरुजींकडून शाबासकी मिळवतो. या प्रसंगातून धनगरी ओवी गद्य-पद्य मिश्रित रचना प्रकार अनुभवायला मिळतो. पण त्याचबरोबर श्रीयाळ- चांगुणा या चालत आलेल्या ओवी प्रकारातून धनगर समूहाला सत्वाची व स्वत्वाची शिकवण मिळते .फेसाटी मधील निवेदक, काका- काकू ,चंदा मामा या पात्रांच्या कृती-उक्ती मधून सत्व आणि स्वत्व व्यक्त झालेले दिसून येते .

नाथाच्या शैक्षणिक वाटचालीत अनेक अडचणी, समस्या ,पेचप्रसंग निर्माण होतात.उदा.सांगलीच्या एस.टी. स्ट[illegible]वर केळीची साले खाऊन रात्र निभावणे. घर आगीत भस्मसात झाल्यानंतर शेतात काम करायला गेलेल्या नाथाने पाथरीचा पाला खाऊन आपली भूक भागवणे. प्रेमात पडलेल्या जयाची फसवणूक न करणे या आणि इतर घटना प्रसंगातून नाथाने आपले सत्व अबाधित ठेवल्याचे स्पष्ट होते .

नाथांच्या आई-वडिलांनीही अनेक तऱ्हेच्या संकटांशी संघर्ष करत आपले सत्व व सत्व कायम टिकवून ठेवलेले दिसून येते . नाथाच्या वडिलांना काकाने जमिनीच्या बाबतीत फसविले तरी ते आदळाआपट करीत नाहीत .पंडयाने क[illegible]ल पलिकडची जमीन शासन, पोलिस व पंच मंडळी यांना पैसे चारुन बळकावल्या नंतर या सर्वांपुढे आपला निभाव लागणार नाही हे ओळखूनकाका

त्रागा करून घेत नाहीत. दिवसाढवळ्या घराला आग लागते त्या आगीत नाथाचे घर आणि ईश्वराला सरकारी अनुदानातून मिळालेल्या पैशातून कर्जफेड करून शिल्लक राहिलेले रुपये चाळीस हजार जळून खाक होतात. पण या संकटानी हतबल न होता फिनिक्स पक्षाप्रमाणे राखेतून हे कुटुंब भरारी घेते.पुन्हा एकदा काका- काकू, नाथा, दादा, बहिणी संसाराची विस्कटलेली घडी बसविण्याचा प्रयत्न करतात. आपल्या मोलमजुरीच्या कामाला सुरुवात करतात. नाथाची आई काकू, काकांच्या बरोबरपुन्हा एकदा पोटाला फडकं बांधून मोलमजुरी करायला सुरुवात करते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत जीवन जगत असताना ही सगळी पात्रे आपलं स्वत्व टिकवून ठेवतात. पण काकांचा भाऊ, नामदेव मामा आदी पात्रे याला अपवादहीआहेत.जीवनामध्ये सत्वाची आणि सद्गुणांची घडण करण्यास अशा प्रकारच्या ओव्या,लोककथा यांची मदत होताना दिसते. समूहमनाचे भरणपोषण अशाप्रकारच्या लोकसाहित्यामुळे होते.

ग्रामीण साहित्यात कृषिकेंद्रित संस्कृतीला प्राधान्य असते. भौतिक शक्तींना आपलेसे करून घेण्यासाठी तसेच दृष्ट शक्तीपासून आपले आणि शेतीचे संरक्षण व्हाव म्हणून अनेक विधीविधाने केली जातात. उदा.जोंधळ्याची कणसं काढून झाल्यानंतर खळे केले जाते. त्यावेळी खास खळ्याचा विधी केला जातो. पाणी शिंपडून खळे सारवणे, खळ्याच्या मध्यभागी पाच दगड ठेवून त्यावर खापराचे गाडगं त्यावर लोटगं, भातवरण, जोंधळ्याची भाकरी, लिंबू, नारळ ठेवायचे. अन वरण-भात खळ्याच्या भोवती शेवटी शिंपडायचे.(पृष्ठ १५) हा विधी करण्यापूर्वी नाथाचे वडील पंचांगात मुहूर्त पाहतात. कारण विधिविधाने मुहूर्तावर केल्याने कुठलीही अडचण येणार नाही असा त्यापाठीमागे विश्वास आहे. या विधिविधाना बरोबरच काही नवसाचे विधीअसतात. हे विधी भौतिक सुखसमृद्धी, बाह्य संकटापासून बचाव व्हावा म्हणून केले जातात.नाथाच्या पायाला आलेली सूज कमी व्हावी म्हणून काकू चिंचणी मायाक्काला नवस करते. (पृष्ठ १७२) या नवसांची फेड करण्याचाही विधीग्रामीण असतो . त्यानुसारच नवस पूर्ण केले जातात.बाहय दुष्ट शक्ती पासून संरक्षण व्हावे,त्यांची वक्रदृष्टी मुलाबाळांवर पडू नये,नजर लागू नये म्हणून नजर काढण्याचा विधी धनगर समाजात आहे. ही विधीविधाने ग्रामीण प्रदेश,जाती, समूह निहाय अशी वेगवेगळी केली जातात . या विधिविधानांबरोबरच ग्रामीण भागातील धनगर समाजातील लग्न विधीचे निवेदकाने वर्णन केले आहे. त्यातून लग्न विधीबरोबरच हुंड्याच्या अनिष्ट प्रथेचे दर्शन घडते.

ग्रामीण जीवनसंस्कृतीमध्ये देवा- धर्माबद्दलची श्रद्धा तसेच समजुती टिकून असलेल्या दिसून येते. अमावस्येला घराच्या बाजूला घुबड ओरडणे हे अशुभ मानले जाते. त्या अशुभाच्या निवारणासाठी कोंबडे कापून त्याचे रक्त घराभोवती शिंपडण्याचा विधी केला जातो.

लोकसाहित्यातील लोककथा, लोकगीत, ओव्या ,म्हणी याचबरोबर सण- उत्सव, जत्रा- खेत्रा, श्रद्धा समजुती या सर्वांचा उपयोग करून या कादंबरी रचना केलेली आहे. त्यातूनच ग्रामीण साहित्य व लोकसाहित्य यांचे निकटचे नाते स्पष्ट झालेले दिसून येते .

प्रस्तुत कादंबरीत सुरवातीपासून शेवटपर्यंत अभावग्रस्तता भरून राहिलेली आहे. या कादंबरीतील व्यक्तिरेखा सर्व प्रकारच्या अभावग्रस्ततेने व्यापलेल्याआहेत. नाथा, काका ,काकू ,दादा बहिणी या व्यक्तिरेखा या अभावग्रस्ततेवर सुरुवातीपासून शेवटपर्यंत मात करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. नाथा ही मध्यवर्ती व्यक्तिरेखा अर्थात निवेदक प्राथमिक ते पदव्युत्तर शिक्षणापर्यंतचा प्रवास अभावग्रस्ततेतून आलेले अडथळे पार करतच चालू ठेवतो. या प्रवासात आलेले अडथळे कुटुंबाच्या आणि मित्रांच्या सहकार्याने पार करतो. आणि आपलं शिक्षण पूर्ण करतो. नाथा जितका जिद्दी आहे तितकाच खोडकर आहे. सातपुते शिक्षकांनी जातीवाचक उल्लेख केला तेव्हा नाथा गप्प न बसता प्रतित्यूर देतो. जिद्द, स्वतंत्र बाणा ,कष्ट करण्याची तयारी नाथाच्या ठिकाणी पुरेपूर आहे .नाथाची आई काकू नाथाच्या शैक्षणिक प्रवासात नाथालाशेवटपर्यंत साथ देते. स्वतः निरक्षर असली तरी शिक्षणाचं महत्व जाणणारी काकू नाथाने भरपूर शिकून नोकरी करावी आणि दारिद्रय दूर करावे अशी तिची इच्छा आहे .अठराविश्वे दारिद्र्य असल्यामुळे घरात खायला काही नसते तेव्हा काकू स्वतः उपाशी राहून मुलांना खाऊ घालते. नवरा आजारी पडल्यानंतर गळ्यातलं मंगळसूत्र काढून देणारी काकू आपल्या परीने कुटुंबाचा डोलारा सांभाळण्याचा प्रयत्न करते .आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात श्रद्धा, समजुती ,नवस या गोष्टी हास्यास्पद ठरतात. पण तरीही काकू सारख्या सामान्य स्त्रीच्या जगण्याचा आधार मात्र श्रद्धा भाव ठरतात.

काकूंच्या मनाची जडणघडण ग्रामीण भागात झालेली आहे. तिथल्या लोकसंस्कृतीचे संस्कार मनावर झालेले आहेत.म्हणून काकू देव देवताना नवस करणे, सवाष्णी जेऊ घालणे , घरात सुख समृद्धी लाभावी, शेतीला बरकत यावी यासाठी पूजा-अर्चा करणे ,त्यातून काकूंना जगण्याचे बळ लाभते .काकू अभावग्रस्ततेवर मात करण्याचा सतत प्रयत्न करतात. तिचा मनपिंड हा कर्मविपाकाच्या परंपरेवर पोसलेला आहे. त्यामुळे लोकसंस्कृती, लोकपरंपरा, श्रद्धाभाव ,संकेत हे तिच्या व्यक्तित्वाचे घटक आहेत. पारंपरिक जीवन जगणारीकाकू आशा-आकांक्षा उराशी बाळगून वाटचाल करते . त्याग, समर्पणशिलता हा तिचा स्वभावधर्म आहे . नाथाच्या जीवनाला आकार देणारी काकूची व्यक्तिरेखा ठसठासीतपणे साकार झालेली आहे.

नाथाचे वडील काका हे अतिशय कष्टाळू प्रामाणिक आणि स्वभावाने भाबडे आहेत. भटकंतीने भरलेले जीवन स्थिर व्हावे म्हणून शेरडं विकून जमीन घेतात.शेतकरी म्हणून आपल्या जीवनाला सुरुवात करतात पण शासन यंत्रणा ,रक्ताचे नातेवाईक

आणि परिस्थिती त्यांना स्थिर जीवन जगू देत नाही. कुटुंब सावरण्यासाठी कर्ज काढून गाय विकत घेतात .घराला उभारी मिळण्याऐवजी कर्जबाजारी होतात पण त्यामुळे खचून न जाता काका अधिक धीरानं एकेक पाऊल टाकतात. ज्वारीच्या शेतीबरोबरच कापसाची शेती करतात. त्यातही त्यांचे नुकसान होते. संकटाचे डोंगर कोसळले म्हणून काका दुःख करत बसत नाहीत. आपल्याला कोणी सहानुभूती दाखवावी अशी त्यांची अपेक्षा नाही. फेसाटी ही कुटुंब कहाणी आहे त्यापेक्षाही ती धनगर समूहाची प्रातिनिधिक कहाणी आहे. या कादंबरीतील व्यक्तिरेखा या परिस्थिती शरण आहेत.हतबल आहेत . पण जगण्यासाठी चिवट झुंज देणाऱ्या आहेत. सतत संघर्ष करणाऱ्या या व्यक्तिरेखा पोटाची भूक भागत नाही .भाकरीचा प्रश्न कायमस्वरूपी सुटत नाही .म्हणून कुठेही उरबडवेपणा करीत नाहीत. दु:खाला गोंजारत न बसता आपला भाकरीचा संघर्ष या व्यक्तिरेखांनी कायम सुरू ठेवलेला दिसतो.

फेसाटी कादंबरीच्या रूपाचा विचार करताना कादंबरीची भाषाशैली हा घटक लक्षात घेतला पाहिजे. जत-निगडीच्यापरिसरातील भौगोलिकवैशिष्टये, कृषिकेंद्रित लोकजीवन, संस्कृती,सामाजिक जडणघडण ,श्रध्दा-समजुती, रुढी-परंपरा,सण, उत्सव या सर्वांचे ओघवत्या बोलीभाषेतून रेखाटन केले आहे. निवेदकाने सुरुवातीपासून शेवटपर्यंत सर्व घटना प्रसंगांचे निवेदन धनगरी बोलीतूनच केले आहे. धनगरी बोलीतील वाक्प्रचार ,उपमा तसेच लयबद्ध छोटी छोटी वाक्ये ही वैशिष्ट्ये या कादंबरीत अधोरेखित झालेली आहेत

उदा. पाऊस सुपानं पाणी वतत होता.पोटात गाडी एवढी आग पडली होती. (वाक्प्रचार )

आंगण दरविशा वाणी दिसतया .आंगण सगळं रंडच्या बायावानी दिसत हुतं (उपमा)

खालील ओळीतून भाषेची लयबद्धता दिसून येते.

उदा. तुझं नाव सखू आणि सगळ्यांसाठी नकू.

तू माझी सखू आई मरून बहिण जगू.

या भाषेवर कानडी भाषेचा प्रभाव आहे.त्यातून हिराक्का, नंदाक्का अशी स्त्रियांची नावे तर धुळाप्पा ,रायाप्पा, मल्लाप्पा अशी पुरुषांची नावे धनगर समाजामध्ये ठेवलेली असतात. सुक्काळीच्या, बोकडीच्या, फुकनीच्या अशा शिव्या तसेच हूतं ,हुती, आलतू अशी क्रियापदे आणि छोटी छोटी वाक्यरचना या कादंबरीत केलेली दिसून येते. आत्मकथनपर निवेदनातून जे जे घडले तेप्रांजळपणे सांगितल्यामुळे कादंबरी वास्तवदर्शी झालेली आहे.

फेसाटी कादंबरीचा प्रारंभ सुंबरानाने होतो तर कादंबरीचा शेवट गीताने होतो.

फेसाटी गा जीवाची
कथा हाय एकलव्याची
लागलू वाट चालायला
जन्म दुःख ओविले
कथा आली शेवटाला
राम राम सर्वाला
चंदर गाss सूर्याला
पोसलं त्या मातीला
वाचणाऱ्या जीवाला
राम राम सर्वाला
कथा गेली शेवटाला

या बिंदूवर कादंबरीचा शेवट होतो. अशा प्रकारचा रामराम करण्याची पद्धत ही लोककलांमध्ये दिसून येते. उदा. नमन खेळे.

थोडक्यात फेसाटी या कादंबरीत धनगर समूहचित्रणाबरोबर आत्मपर निवेदनातून नाथाच्या बालपणीच्या आठवणी पासून एम. ए . पर्यंतच्या शिक्षणाचा प्रवास रेखाटलेला आहे. शेती आणि शेतमजुरी करणारे धनगर कुटुंब, सतत कष्ट करणारे आईवडील, भावंड आणि निवेदकाची शैक्षणिक धडपड यातून ही कादंबरी साकारलेली आहे निवेदकाच्या शिक्षण संघर्षाची आणि कुटुंब कुटुंबाच्या जीवन संघर्षाची ही प्रातिनिधिक कहाणी आहे तशीच ती वंचित समूहाचीही कहाणी आहे. कादंबरीतील व्यक्तिरेखा, घटना प्रसंग यांच्या चित्रणाबरोबरच ग्रामीण कृषिकेंद्रित संस्कृती, निसर्ग सन्मुखता, गावगाडा, रूढी परंपरा, गावगाडा, श्रद्धा- समजुती यांचे दर्शन घडविताना लोकसाहित्यातील लोककथा, ओव्या, विधिविधान, नवस वगैरेंचा केलेला वापर यातून कादंबरीची घडण झालेली आहे. त्यामुळे कादंबरीला एक परिमाण प्राप्त झालेले आहे असे दिसून येते.

❖❖❖

# मूल्यशिक्षण : स्वरूप, संकल्पना व महत्त्व

प्रा.डॉ. अपर्णा पाटील
बा.बु. कला, ना.भ. वाणिज्य, बा.पा. विज्ञान महाविद्यालय
दिग्रस, जि. यवतमाळ ४४५२०३, महाराष्ट्र, (India)
भ्रमणध्वनी ९७३०७७५५८५

## सारांश :–

आजच्या आधुनिक युगात कितीतरी अधिक झपाट्याने माणसाची प्रगती होत आहे. भौतिक सुखाची रेलचेल झालेली आहे. आणि त्याचवेळी माणसाची नैतिकदृष्ट्या घसरण होत आहे. माणसांमध्ये फसवाफसवी, लबाडी, बेपर्वाई, भ्रष्टाचार, गुन्हेगारी इ. प्रवृत्तीमध्ये बेसुमार वाढ झालेली आहे आपली सर्व समाज व्यवस्था या अपप्रवृत्तीनी पोखरून टाकली आहे. या अपप्रवृत्तींना आपण वेळीच आळा घतला नाही, तर आपला समाज, आपला देश पुर्णपणे कोसळुन पडेल समाजच उद्ध्वस्त झाला, तर त्या समाजातील कोणतीही व्यक्ती टिकू शकणार नाही. म्हणून सध्याच्या या भीषण परिस्थितीतला आळा घालण्यासाठी मूल्य शिक्षणाची निंतात गरज आहे. लहान वयात झालेले परिणात खोलवर रूजतात आणि भावी आयुष्याला वळण व दिशा देतात. हेच मूल्य शिक्षण महत्त्व आहे.

## प्रस्तावना :–

मूल्यशिक्षण म्हणजे नैतिक शिक्षण होय. लहानपणापासून आईवडील आपल्याला वळण लावण्याचा प्रयत्न करतात. असे करू नको, तसे बोलू नको, असे वागणे चांगले नाही. मोठ्यांशी नम्रपणे वागावे इ. उपदेश आईवडील आपल्याला सतत करत असतात. तसेच 'रांगेने चला, नीट उभे रहा, गडबड करू नका, वह्या पुस्तके नीट ठेवा, वर्गात वेळेवर जा, अभ्यास करा, इ. उपदेश प्राध्यापकांकडूनही केला जातो. आई–वडील व शिक्षक असा उपदेश करून थांबत नाहीत, ते आपल्याला तसे वागायला लावण्याचाही प्रयत्न करतात. त्यांचा हा प्रयत्न म्हणजेच 'मूल्यशिक्षण' होय.

## विवेचन :–

'मूल्य शिक्षण' हा शब्द 'मूल्य' व 'शिक्षण' हे दोन शब्द जोडून तयार झालेला आहे. त्याचा अर्थ मूल्याचे शिक्षण किंवा 'मूल्य रूजविण्याचे शिक्षण' असा होतो. एखाद्या व्यक्तीशी कसे वागावे, कसे बोलावे, कोणते वर्तन योग्य, कोणते वर्तन अयोग्य हे शिकविणे म्हणजे 'मूल्य शिक्षण' होय.

'मूल्य शिक्षणाला' आपण 'संस्कार' असेही म्हणू शकतो. आपले आईबाबा, आजीआजोबा, घरातील इतर मोठी माणसे आपल्याला लहानपणापासून वळण लावण्याचा प्रयत्न करतात, त्यातून कसे वागावे, कसे वागू नये, याचे मार्गदर्शन आपल्याला मिळत असते. शाळा–कॉलेजमध्ये शिक्षकही आपल्याला मार्गदर्शन करत असतात. आपल्या अवतीभवतीची माणसे, विविध प्रसंगामध्ये विविध प्रकारे वागत असतात ती अनेक कृती करीत असतात. त्यांच्या या वागण्यातूनही आपल्याला चांगले काय, वाईट काय हे कळते. तसेच आपण ज्या कथा कादंबऱ्या वाचतो, जी नाटक, सिनेमा पाहतो. त्यात विविध माणसाचं वर्तन चित्रित केले असते. त्यातुनही आपल्याला चांगले काय वाईट काय हे कळत असते या साऱ्यांचा अर्थ असा की, प्रत्येकी क्षणाला कोणत्या ना कोणात्या मूल्यांचा परिणाम आपल्या मनावर होत असतो. यावरून आपण असे म्हणू शकतो की, जेव्हा काही मूल्यांचा असा खोलवर परिणाम होतो, त्यांचा अपल्याला विसर पडत नाही, तेव्हा त्या परिणामाला संस्कार असे म्हणतात.

## मूल्यांची वैशिष्ट्ये :–

मूल्यांचा एक खास विशेष आहे. कोणतेही मूल्य हे फक्त कृतीतूनच व्यक्त होत असते. आपण प्रामाणिक आहोत. असे फक्त तोंडाने बोलणे पुरेसे नाही. – तोंडी बोलून आपला प्रामाणिकपणा सिध्द् होत नाही. आणि कोणी मान्यही करीत नाही. तो कृतीतुनच व्यक्त व्हावा लागतो. त्यासाठी आपण प्रामाणिकपणे वागून दाखवावे लागते. एखादा दारूड्या, दारू किती वाईट आहे, हे सांगणारी भाषणे देऊ लागला तर कोणीही त्याचा बोलण्याकडे लक्ष देणार नाही. याचे कारण तेच आहे.

कोणतेही मूल्य कृतीतून व्यक्त व्हावे लागते आणि ते सातत्याने व्यक्त व्हावे लागते समजा, आपण एकदोनदा प्रामाणिकपणे वागलो आणि इतर वेळी अप्रामाणिकपणे वागलो, तर आपल्या प्रामाणिकपणावर कोणी

विश्वास ठेवणार नाही, नेहमी, खरे बोलणारा एकदा जरी खोटे बोलला, तरी लोक 'तो खरे बोलतो' यावर विश्वास ठेवत नाहीत.

उच्च, उदात्त मूल्ये फक्त थोर व्यक्तीच आचरणात आणताता असे नाही, किंवा उच्च पदावरील लोकच उद्दात्त मूल्यानुसार वागू शकतात असे नसते. समजा एक हमाल अत्यंत प्रामाणिकपणे वागणारा आहे. आणि एक मोटा मंत्री भ्रष्टाचार करणार आहे. तर अशा स्थितीत तो हमाल त्या मंत्र्यापेक्षा नैतिकदृष्ट्या श्रेष्ठ ठरतो.

या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला विचार सर्वांना मनन करण्याजोगा आहे. त्यांनी सांगितले आहे. की, ''जीवनात शिक्षणाला खूप महत्त्व आहे. सर्वांनी अतोनात कष्ट करून शिक्षण मिळवलेच पाहिजे, पण शिक्षणाबरोबर शीलही आवश्यक आहे. माझ्या मते, ज्ञान हे दुधारी शस्त्र आहे. त्याचा उपयोग एखाद्याचे संरक्षण करण्यासाठी करता येते किंवा एखाद्याचा  घात करण्यासाठीही करता येतो. शील नसलेला माणूस ज्ञानाचा उपयोग दुसऱ्याचा घात करण्यासाठीच करील'' येथे शील याचा अर्थ चारित्र्य. चारित्र्याला उदात्त मूल्यांचा आधार असतो. वरील विचारात बाबासाहेबांनी मूल्य शिक्षणाचीच माहिती सांगतलेली आहे.

## कुटुंबातून मिळणारे मूल्य शिक्षण संस्कार :—

मूल कुटुंबाच्या सहवासात जास्त असते. कुटुंबातच ते लहानाचे मोठे होते. त्यामुळे कुटुंबाच्या अनेक लहानपणाची मुलावर आईबाबांचे पूर्ण नियंत्रण असते. ते कधी गोडीगुलाबीने, तर कधी सक्तीने मुलाला चांगले वागायला लावतात. त्यामुळे मुलांवर उदात्त मूल्यांचा संस्कार होतो.

कुटुंबातील लोक मित्रमंडळीशी, शेजाऱ्यांशी नातेवाईकांशी कसे वागतात. त्यामुळे इतर सर्वजण आपल्या कुटुंबीयांशी कसे वागतात, ही गोष्ट मुलं सतत पाहत असते. या वर्तनाचा परिणाम मुलांवर होत असतो. मूल मोठयांचेच अनुकरण करत असते.

पालक, शिक्षक, उच्चपदस्थ व उच्च अभिरूची असलेले असतील, तर घरात विविध विषयांवर चर्चा होते. कुटुब, नातेवाईक यांच्या पलीकडे जाऊन समाज व देश यांच्या हिताचा विचार केला जातो. अशा घरात मनोरंजनाचा दर्जाही वरचा असतो. आवडीनिवडी वरच्या दर्जाच्या असताता. बोलताना कोणते शब्द वापरू नये, काय वाचू नये, कोणत्या बाबीची चर्चा नको, इतरांशी कसे वागावे, किंवा वागू नये इ. बाबत उत्तम मार्गदर्शन मिळते. याचा परिणाम अर्थातच मुलांच्या व्यक्तिमत्त्वावर होतो.

काही पालक आपल्या पाल्याच्या भवितव्याबाबत जागरूक असतात. साहजिक या सगळ्या बाबींचा मुलांच्या वर्तनावर प्रभाव पडतो. त्यांच्यावर संस्कार होतो.

## शाळेच्या माध्यमातून होणारे संस्कार :—

कुटुंबातून मूल 'शाळा' या अधिक व्यापक विश्वात दाखल होते. अत्यंत संवेदनक्षमता व संस्कारक्षम वयात मूल शाळेत असते त्यामुळे शाळेचे त्यांच्या मनावर खूप खोलवर संस्कार होतात.

या काळात मुलाला आपल्या आईबाबापेक्षा शिक्षक खूप महत्वाचे वाटतात. शिक्षकांचे बोलणे ते अत्यंत गंभीरपणे ऐकून घेतात. शाळेत विविध प्रकृतीचे शिक्षक असतात, त्यांचे बोलणे, वागणे विचार करणे यांचा विद्यार्थ्यांवर खोलवर परिणाम घडतो. एक प्रकारे विविधांगी मार्गदर्शन मिळते.

शाळेत शिक्षकांबरोबरीनेच सोबत शिकणाऱ्या विदयार्थ्यांच्या स्वभावांचा, वागण्याचा प्रभाव पडत असतो. शाळेत विविध थरांतील, जातिधर्मातील, प्रदेशातील विदयार्थी एकत्र येतात. विविध नविन नमुने विदयार्थ्यांना पाहायला मिळताता त्यांचे बरेवाईट परिणाम त्यांच्यावर होत असताता. काही विदयार्थ्यांच्या वाईट वागण्याचे परिणाम पाहायला मिळतात. तर काही विदयार्थ्यांच्या चांगल्या वागण्याचेही दर्शन घडते. त्यामुळे चांगले वाईट ठरविण्याची त्यांची विवेकबुध्दी घडत जाते.

शाळेत विविध अभ्यास विषय असताता त्याद्वारे मिळणाऱ्या शिक्षणाचाही परिणात होत असतो. उदा. विज्ञान,भुगोल यासारख्या विषयामुळे वैज्ञानिक दृष्टीकोन वाढीला लागतो. अंधश्रद्धा नष्ट होण्यास हातभार लागतो. भाषेसारख्या विषयांमधुन भावनाशक्ती, विचारशक्ती विकसीत होते नैतीक मूल्य ाचा संस्कार होतात. अभिरूची घडते संगीत चित्रकला, यासारख्या विषयातूनही अभिरूची घडते. या प्रकारे प्रत्येक विषयाच्या अभ्यासामुळे जीवन जगण्याचे कोणते कोणते कौशल्य प्राप्त होते.

शाळेत विविध उपक्रम केले जातात त्यातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळतो. या अनुभवातूनही संस्कार घडतात.

अनेक विदयार्थी व शिक्षक यांच्या सोबत आपल्याला काही तास राहावे लागते म्हणुन समुदायात वावरतांना कोणती पथ्ये पाळावीत,इतरांशी कसे वागावे इ. संबंधातील संस्कार प्रत्यक्ष अनुभवातनच मिळतात.

शाळा महाविदयालये हे व्यक्तीमत्व घडविण्याचे एक अत्यंत महत्वाचे ठिकाण आहे.

## साहित्य व अन्य कलाकृतीतून होणारे संस्कार :–

महाविदयालयामध्ये, अभ्यासाच्या निमित्ताने कथा, कादंबऱ्या, कविता वगैरे प्रकारातील लेखनाचा परिचय होतो. आपण असे साहित्य वाचतो, त्याच विविध प्रकारच्या माणसांचे वर्तन शब्दबध्द् केलेले असते. त्यातुनही आपल्याला चांगले काय, वाईट काय हे कळत असते

नाटक सिनेमामध्येही माणसाचे जीवन चित्रित केलेले असते. त्यातुनही आपल्याला चांगले काय वाईट काय हे कळत असते. बारकाईने पाहिले, तर बहुसंख्य नाटक सिनेमात सज्जन माणसे आणि दृष्ट माणसे यांच्यातील संघर्ष दाखविलेला असतो. या संघर्षामध्ये अखेरीस दृष्टांचा पराभव होता, सज्जनांचा विजय होतो, असे दाखविलेले असते या सगळयांचा व्यक्तीमत्वाच्या जडणघडणीला नैतीक मूल्य ंचा हातभार लागतो.

शिवाय साहित्य, संगीत, चित्र, नाटय, चित्रपट इ. कलाचा सदोदित आस्वाद घेतल्याने अभिरूची घडते. अशाप्रकारे कलाप्रान्तसुध्द्दा माणसाच्या जडणघडणीत फार मोठे कार्य करित असते

## स्वानुभवातून होणारे संस्कार :–

अनेकदा आपल्याला घरी लहानमोठी कामे करावी लागताता अंथरूण पांघरूणाच्या घडया घालणे, स्वयंपाकघरात मदत करणे, वगैरे अशा कामांमधुन कष्टाचा, कामकरण्याचा अनुभव मिळतो. विविध प्रकारच्या कौशल्यांची वाढ होते. आपली कुवत वाढते काम करण्यातला आनंदही मिळतो.

शाळेत अनेक उपक्रम राबविले जाताता. साफसफाई, वृक्षारोपण, वर्गसजावट, सभा आयोजन, सादरीकरण, विविध स्पर्धा मनोरंजनाचे कार्यक्रम असे विविध प्रकारचे उपक्रम आयोजित केले जातात. अशा कार्यक्रमांमधील सहभागातुन संधी मिळते समुदायात वावरंताना आवश्यक असलेल्या वेगळया प्रकारच्या कौशल्याचा परीचय होता. हे सर्व संस्कार शाळा कॉलेजच्या वातावरणात घडतात.

आपल्या अवती भोवती अनेक प्रसंग घडत असतात त्यात बरेच प्रसंग सर्वसाधारण स्वरूपाचे असताता. काही प्रसंग विशेष स्वरूपाचे असताता. लग्न मुंजे सारखा धार्मिक विधी, बारसे वगैरे सारखे आनंददायी प्रसग असताता तर कधी मृत्यु, अपघात, दरोडेखोरी, दहशतवादी कृत्ये, पुर,भुकंप, आग लागणे यासारखेच प्रसंग नित्याचे नसतात. पण केव्हा ना केव्हा अशा प्रसंगांचे दर्शन घडतेच अशा प्रसंगात आपण असु किंवा नसु पण तरीही अशा प्रसंगातुनही काही अनुभव मिळतो. त्याचे संस्कार मनावर होतात.

एकंदरीतच अशा विविध प्रकारच्या प्रत्यक्ष अनुभवांचे संस्कारही आपले व्यक्तिमत्त्व घडवत असतात. त्यामुळे कळत नकळत आपले मूल्य शिक्षण चालूच असते.

जीवन जगताना मूल्य शिक्षणाचे महत्त्व पुढील चार ओळींतून ......................

<u>जीवन जगताना</u>

मुलांवर प्रेमाचं पांघरूण घाला, पण दृष्टी झाकू नका, मुलांच्या सगळ्या लढाया आपणच लढू नये
चटके बसल्याशिवाय, अपमान पचविल्या शिवाय वाट अपुरीव असते. आयत्या सुखाला किंमत नसते.
स्वकष्टाची भाकरीच गोड लागते शिक्षण दया, संस्कार दया, अडचणीला आधार द्या.
आयुष्यभर मुलं बसून खातील इतका मागे ठेवूच नका. जसे अतिपाणी रोप कुजवते, तसे अतिप्रेम मुलांना पंगू बनविते. मन मजबुत,खबीर आनंदी असेल तर कोणत्याही परिस्थितीवर आपण निश्चित विजय मिळवू शकतो, हेच ''मूल्य शिक्षणाचे'' सार आहे.

## संदर्भ ग्रंथ:

१) मूल्य शिक्षण – व्याख्याते – डॉ. पी.व्ही. रसाळ
२) भारतीय संस्कृती – साने गुरूजी
३) मूल्य शिक्षण – दि. तु. होले

❖❖❖

# 'उपरा' आणि 'उचल्या': एक तौलनिक विचार

प्रा. डॉ. विजयकुमार खंदारे
मराठी विभागप्रमुख
इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव–दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे, महाराष्ट्र, (India)
मेल: hodmarathi@gmail.com मोबा. ९४२२५६९२४९

भटक्या–विमुक्त–जाती–जमाती यातही भटके आणि विमुक्त असा फरक आहे. या अंतर्गत अनेक जाती–पोटजाती आहेत. याविषयी थोडेसे,

## विमुक्त जाती:

ब्रिटिश सरकारने १८७१ साली 'गुन्हेगार जाती कायदा' केला. या कायद्याने काही जातींची माणसे जन्मत:च गुन्हेगार ठरवली गेली. त्यामुळे कधी पोलिसांच्या ताब्यात, कधी तुरूंगात तर कधी रानावनात लपून–छपून कोल्हया लांडग्यांचे जीवन जगणे यापलिकडे त्यांना दुसरा पर्याय उरला नाही. पुढे यापेक्षाही भयानक असा १९२४ साली 'गुन्हेगार वसाहतीकरण कायदा' करून त्यांच्यावर कडक निर्बंध लादून तारेचे कुंपन व पोलिसांचा कडक पहारा ठेवण्यात आला. स्वातंत्र्यानंतर आपल्या राज्यघटनेने कोणत्याही जातीतला माणूस जन्मत: गुन्हेगार असू शकत नाही. हे तत्व मान्य केल्याने त्या जातीतील सर्व लोकांना १९२४ च्या कयाद्याच्या कक्षेतून मुक्त करण्यात आले. म्हणून त्यांना विमुक्त जाती असे संबोधतात. पशुच्याही पलिकडेचे जीवन यांच्या माथी मारण्यात आले होते. त्यात बेरड, भामटा, कैकाडी, कंजारभाट, लमाण, पारधी, रामोशी, वडार, वाघरी, छप्परबंद इत्यादी उदाहरण दाखल सांगता येतील.

## भटक्या जमाती:

उपजीविकेसाठी सतत गावोगाव भटकत राहण्याची परंपरा असलेल्या काही जमाती आहेत. यात प्रामुख्याने बावा, बैरागी, भराडी, गारूडी, घिसाडी, गोंधळी, जोशी, कोल्हाटी, डोंबारी, दांगट, मसणजोगी, नंदीवाले, वैदू, वासुदेव इत्यादी.

लक्ष्मण माने (उपरा), भीमराव गस्ती (बेरड), लक्ष्मण गायकवाड (उचल्या) हे विमुक्त जमातीतील तर दादासाहेब मोरे (गबाळ), गुलाब वाघमोडे (रानभैरी), वैजनाथ कळसे (आयरणीच्या घणा) आत्माराम राठोड (तांडा), किशोर काळे (कोल्हाटयाचं पोर) हे भटक्या जमातीतील लेखक. यापैकी 'उपरा' व 'उचल्या' ही दोन आत्मकथने तुलनेसाठी निवडली आहेत. ती यातील साम्यभेद लक्षात घेऊन.

## साम्य:

१. दोन्ही कलाकृती विमुक्त जातींची आहेत:
   'उपरा' व 'उचल्या' ही भटक्या–विमुक्तांची आत्मकथने म्हणून ओळखली जातात. वरील विवेचनावरून ती विमुक्त जातीची आहेत, असे आपणास सांगता येईल.
२. दोघानाही शाळेत पाठवण्याचा दोघांच्याही वडिलांचा आग्रह:
   दोन्ही आत्मकथनातून दोघांच्याही वडिलांना आपली मूलं शिकावीत याविषयीची तळमळ व्यक्त होताना दिसून येते. याविषयी लक्ष्मण मानेंचे वडील म्हणतात, ''आजपासनं साळत जायचं. हिथं हाय तवर? पाटी पेन्सल उद्या आणून दीन.'' (पृ. १, उपरा) तर स्वत: लक्ष्मण माने अर्पण पत्रिकेत म्हणतात, ''ज्यांनी वळण्याची पाटी सोडून लिहिण्याची पाटी हाती दिली त्या आई व भाऊ यांना...'' लक्ष्मण गाायकवाड देखील आपल्या वडिलांविषयी म्हणतात, ''बाबानं हातात खिसे कापायची भारतपत्ती न देता. पाटीन् पेनस दिली? तवा बालवर्गात नेऊन नांव घातलं. तवा मी शाळत जाऊ लागलो.'' (पृ. १३, उचल्या). शिक्षण घेणं हे जातपंचायतीच्या दृष्टीने गुन्हा आहे. असे जरी असले तरी ही मुलं शिक्षण घेताना दिसून येतात. ते वडिलांनी कुणाचेच मनावर घेतले नाही म्हणून. याविषयीची भावना व्यक्त करताना लक्ष्मण गायकवाड म्हणतात, ''बाबा त्या येळस कुनाचंच आयकला न्हाई. म्हणून मी शाळा शिकलो न्हायतर मी बी आज चाोर म्हणूनच न्हायलो असतो.'' (पृ. २७, उचल्या)
३. पुस्तकांच्या शीर्षकात साम्य:
   दोन्ही लेखकांच्या नावात देखील साम्य दोन्ही पुस्तकांच्या शीर्षकाची सरूवात 'उ' या अक्षरापासून झालेली आहे. जसे 'उपरा' आणि 'उचल्या.' तसेच लेखकांची नाव तर एकसारखीच आहेत, फक्त आडनावात फरक आहे.

लक्ष्मण माने आणि लक्ष्मण गायकवाड. तर सांगावयाचे म्हणून एकसारखेपणामुळे बऱ्याचजणांची गफलत होताना दिसून येते. तेव्हा 'उपरा' हे लक्ष्मण माने यांचं तर 'उचल्या' हे लक्ष्मण गायकवाड यांचं आत्मकथन आहे, लक्षात असू द्या!

४. दोघांचेही जीवन पहिल्यांदा मराठीत आले. दोघानाही साहित्या अकादकमी पुरस्कार मिळाले:
दोघांचेही जीवन पहिल्यांदाच मराठीत साहित्यात आलेले दिसून येते. ज्यावेळेस दलित साहित्याची निर्मिती झाली, त्यावेळी त्यातल्या त्यात आत्मकथनांची जी लाट आली त्या लाटेच्या प्रवाहातच मराठी माणसाला, मनाला एक अनोखं असं विश्व पाहायला मिळालं ते या दोन आत्मकथनामुळे. त्यामुळेच ती आजतागायत चर्चेचा विषय ठरलेली दिसून येतात. दोन्ही कलाकृतींना साहित्य अकादमी पुरस्कार लाभले. 'फोर्ड फाउंडेशन शिष्यवृत्ती' मिळाल्यामुळे मानेना अमेरिकेचा प्रवास घडला. तर लक्ष्मण गायकवाड भारत महोत्सवात चीनला जाऊन आले.

५. दोन्हीमधला पोलिसांचा त्रास:
दोन्ही आत्मकथनातून पोलिसांच्या अन्यायी अत्याचाराविषयीचे चित्रण झालेले दिसून येते. या जातीच गुन्हेगार ठरवल्यामुळे गुन्हा कोठेही होवो, प्रथम यांनाच जबाबदार धरले जाई व शिक्षा केली जाई. याविषयी लक्ष्मण माने मनोगतात म्हणतात, ''सेटलमेंटचा प्रश्न म्हणजे १८७१ साली ब्रिटिशांनी लावलेली काटेरी कुंपणे आणि गुन्हेगारीचा, गुलामीचा कायदेशीर शिक्का... तारा, हजेरी गेली, मुक्त झाली. हाती झोळी आली, गुन्हेगारीचा शिक्का आहेच, आजही पोलिसांच्याकडे गुन्हेगार जमातीच्या काळया याद्या आहेत. गुन्हा कोठेही होवो, त्याला या जमातीस जबाबदार धरून पोलीस त्यांना ठोकताहेत. बेवारस समजून.'' अशा पोलिसी अत्याचारास बळी पडलेल्या काही घटना सांगताना माने म्हणतात, परवा झबझब्या पारध्याची बायको सांगत होती, '' तुझ्या सरकारला सांग. हामची समदी माणसं तुरूंगात घाल. म्हंजी बरं व्हईल. नायतर गोळया घाल. म्हंजी किटाळ जाईल. मंग न्हाय व्हायची चोरी. दादा, आमी काय मागतोरं? उलीकसं कपाट, अंगावर धडुतं, हाताला उलीकसं काम, आंन् पोटाला आन्न.'' (चेहरा–मोहरा, 'उपरा') तर आणखी एक घटना नमूद करताना–नामदेव पाटलाच्या विहिरीतल्या इंजिनाची चोरी. खरी तर त्याच्याच भावकीतल्या वाकुडपणा असलेल्यानं केलेली असते. पण पोलिसांच्या माराला मात्र गजरीच्या पोरांना सामोरे जावे लागते. हे असे कुठपर्यंत चालणार? याविषयीचा विचार तुम्हा–आम्हाला करावयाचा आहे.

'उचल्या'मध्ये तर ही जातच गुन्हेगार समजली गेल्यामुळे अनेक ठिकाणी पोलिसांच्या अत्याचारीचे दर्शन घडते. एखाद्या ठिकाणी काम मागण्यासाठी गेले तर अगोदर जात विचारली जाई आणि ती सांगितली तर मात्र हे चोर आहेत म्हणून कुणी काम देत नसत. एवढेच कशाला गाव सोडून दुसऱ्या गावी जायचे असले तरी त्यांना पोलीस पाटलाचा दाखला घ्यावा लागत असे. अन्यथा त्यांना चोर म्हणून पोलिसांच्या ताब्यात देत असत. अशा एक ना अनेक घटनांची उदाहरणे आपणास देता येतील. लेखक आपल्या आजी सासू व सासऱ्याविषयी म्हणतो, ''आजही ही म्हातारी व आमचा सासरा पोलिसांचा मार खाऊन अपंग झाले आहेत.'' (पृ. ११६–१७, 'उचल्या') गिरणी कामगारांचे संप काळात लेखकाचे भाषण चालू असताना पोलिसांनी कामगारावरती असाच लाठीमार केलेला आहे. त्यात शेकडो कामगार जखमी झालेले आहेत. कळंब तालुक्यातील मोहा या गावी पोलिसांनी पारधी कुटुंबावर अत्याचार केल्याचेही वर्णन येते. हिराबाई काळे या बाळंतणीजवळ अर्धे पोते ज्वारी मिळाली म्हणून तिला गुन्हेगार समजून चौकीत नेले जाते. प्रत्यक्षात ती ज्वारी विकत आणलेली असते. तसेच ढोकी येथील पारध्यांच्या मुलांना स्वत: लेखकांनी सूतगिरणीत कामाला लावलेले असते. ही बातमी पोलिसांना लागताच ते त्या मुलांना ताब्यात घेऊन बेदम मारहाण करतात आणि लातूरपासून १०–१५ कि.मी. दूर अंतराव सोडून येतात. अशाप्रकारे पारधी जमातीवर अनेक ठिकाणी अन्याय–अत्याचार होताना दिसून येतात. उलट पोलिसच तशी परिस्थिती निर्माण करून त्यांना चोर ठरवतात. याविषयी लक्ष्मण गायकवाड सांगतात, ''पारधी लोकांना चोरी करण्यासारखी परिस्थिती निर्माण करून पारध्यांनी चोरी करावं असं जवळपास उस्मानाबाद जिल्हयात अनेक ठिकाणी पोलीस व जमिनदार लोक जाणून बुजून प्रयत्न करतात असे मला दिसून आले.'' (पृ. १५९ 'उचल्या') साळूकवाडीतील (अहमदपूर) मसणजोगीवर झालेल्या पोलिसांचा अत्याचार असाच हृदयद्रावक आहे. तसेच जायबा गायकवाड हा जांबूर, ता. अहमदपूरचा राहणारा. एका व्यापाराचे दहा हजार रूपये चोरीस गेले, म्हणून जायबास गुन्हेगार ठरवले जाते. (तो केवळ पाथरवट समाजाचा म्हणूनच.) काहीही गुन्हा नसताना पोलीस त्याच्याकडून दोन हजार रूपये उकळतात व बायकोस देखील उभ्या बुटाची लाथ खावी लागते. असे अनेक प्रसंग सांगता येतील.

६. दोन्हीत स्त्रियांवर होणारा लैंगिक—मानसिक छळ:

दोन्ही आत्मकथनात स्त्रियांवर अन्याय—अत्याचार होताना दिसून येतात. कधी ते गाववाल्याने केलेले असतील तर कधी जात पंचायतीने दिलेली शिक्षा असेल तर कधी स्वतःच्या नवऱ्याने केलेली छळवणूक असेल. 'उपरा'त लक्ष्मण मानेना शाळेत पाठवण्यावरून आई—वडिलांचा वाद होतो. प्रसंगी आईला वडिलांचा मार खावा लागतो. याविषयी माने सांगतात, ''माझा मार चुकला होता पण आईच्या अंगावरचे वळ बघून कळवळलो होतो.'' (पृ. ५, 'उपरा') ओढयाच्या काठच्या फोका कापल्या तर गाववाल्यांच्या, शेतकऱ्यांच्या शिव्या, तर प्रसंगी ते उघडे—नागडे करून मारतही असत. सोनवडी गावच्या लोकांनी आपल्या आईला असेच उघडे—नागडे करून मारलेले आहे. याविषयी लेखक म्हणतो, ''माझ्या आईची आबरू... बाच्या आंगारक्यात झाकली हुती.'' (पृ. ३७, 'उपरा') पारूमामी ही देखील गावगुंडाच्या वासनेला बळी पडलेली स्त्री आहे. ती दिसायला सुंदर आहे. गरिबीला सौंदर्य शाप असतं म्हणतात ते इथेही प्रत्ययाला येते. नंतर नवऱ्याने सोडून देणे आणि एक दिवस वेड लागून मरून जाणे. याशिवाय तिच्या वाटयाला काहीही येत नाही. पत्नी शशीचा देखील असाच मानसिक छळ होताना दिसून येतो. कधी तो माहेर—सासरच्या माणसांमुळे असेल तर कधी शेजारणींच्या वटसावित्रीच्या पुजेवरून झालेल्या संवादाने असेल. याशिवाय गजरा, सरी, मसणजोगीची बाई अशा आणखी काही स्त्रियांची नावे सांगता येतील.

'उचल्या'त देखील अशी उदाहरणे सापडतात. विशेषतः इथल्या स्त्रियांना पोलिसी अत्याचाराला अधिक सामोरे जावे लागलेले आहे. या समाजातल्या बायकांच्या अंगावर एखादी चांगली साडी दिसली तरी ती चोरीचीच आहे असे म्हटले जाई. याविषयीचा प्रसंग नोंदवताना लक्ष्मण गायकवाड म्हणतात, ''माझ्या मायची साडी धरून, मारून साडी फेडून दे, ती चोरीची हाय...'' (पृ. ४९, 'उचल्या') असे म्हणून ती साडी जप्त केली जात असे. माणिकदादाने बार्शीच्या बाईला म्हणजे पद्मीनभाभीला रांड म्हणून ठेवतो आणि नंतर तिला कर्नाटकात एका माणसाला २०० रूपयेला विकून टाकल्याचे वर्णन (पान नं. ५१—५३ वर) येते. प्रेयसी शोभा जगतापला तिच्या वडिलांनी केवळ पाथरूटाच्या लक्ष्याबरोबर प्रेम करते म्हणून तिच्या गालावर तापवलेल्या पट्टीचा डाग देतात. पत्नी छबूला केवळ इतरांच्या सांगण्यावरून व संशयावरून लेखक तिचा मानसिक आणि शारीरिक छळ करताना दिसून येतो. जायबाच्या बायकोला असाच पोलिसाच्या उभ्या बुटाचा मार खावा लागतो.

७. दोन्हीमधली प्रेमप्रकरणे:

प्रेम करणे हा तर प्रत्येक व्यक्तीचा स्थायीभाव. प्रेमाला कसलेही बंधन नसते. कुणी प्रेमात यशस्वी होतो तर कुणी अयशस्वी. इथे 'उपरा'त लक्ष्मण माने मराठा जातीतील शशी या मुलीशी प्रेम करतात आणि शेवटी त्याचे विवाहात रूपांतर होते. याविषयीचे कडू—गोड अनुभव 'उपरा' वाचत असताना लक्षात येतात. तसेच 'उचल्या'त देखील लक्ष्मण गायकवाड शोभा जगताप या मुलीवर प्रेम करतात. पण विवाहापर्यंत मजल मारत नाहीत, असे दिसून येते.

८. दोघानाही झालेला स्वकीयांचा त्रास/विरोध:

दोघानाही स्वतःच्या नातेवाईकांचा विरोध सहन करावा लागलेला आहे. मग तो प्रेमविवाह केल्यामुळे असो अथवा पुस्तक प्रकाशित केल्यामुळे असो. या ना त्या कारणाने दोघानाही स्वकीयांच्या/जातपंचायतीच्या जाचक नियमांना सामोरे जावे लागलेले आहे. म्हणूनच लक्ष्मण माने म्हणतात, ''हे लिहिणं हाही जातपंचायतीच्या दृष्टीने फार मोठा गुन्हा मी करीत आहे. त्याच्या शिक्षेची तरतूद मला माहीत आहे. होणाऱ्या परिणामांना तोंड देण्याची माझी तयारी आहेच.'' (या मुक्कामावरून, 'उपरा') लक्ष्मण गायकवाडांनाही अशा प्रसंगाना सामोरे जावे लागले आहे.

९. दोन्ही आत्मकथनातून प्रकट होणरा गावगाडा/गावाशी असणारे संबंध:

दोघानीही गावगाडयाविषयीचे चित्रण आपल्य आत्मकथनातून केलेले आहे. या गावगाडयात हेटाळणी, तिरस्कार करणारी जशी माणसे आहेत, तशी प्रेमाने वागवणारी देखील आहेत. 'उपरा'त तर 'आज इथं उद्या तिथं' अशी अवस्था मग त्यांना एक गाव कसं असू शकेल? तरी देखील निरगुडी हे त्यांचं गाव. कारण पावसाळा आला की सर्व जातबांधव, नातेवाईक एकत्र येण्यासाठीचे ठिकाण म्हणूनच ते योग्य वाटते. अशा गावाविषयी, शाळेत ग्रुप फोटो काढत असताना लेखक नकळत गावातल्या मुलीशेजारी बसतो. तेव्हा त्याची परिणती शब्दात व्यक्त करताना लेखक म्हणतो, ''आपल्यामुळं बा ला मार बसला. गाव कायमचं सोडावं लागलं. तसं आपल्याला गाव न्हाईच, पर वाडवडील तितं पाउसकाळात ऱ्हायचे. म्हणून आपलं गाव. अन् त्येबी आपुन सोडलं.'' (पृ. ७८, 'उपरा') अशी खंत व्यक्त होताना दिसून येते. जिंतीला जगतापाच्या लग्नाला गेल्यानंतर मराठयांच्या पोरांसमवेत जेवणाच्या पंगतीला बसल्यानंतर एक वाढपी लेखकाचा कान पकडून म्हणतो, ''व्हंकाडया, काय समजतं का

न्हाय? चल निग हितनं!'' (पृ. ७३, 'उपरा') तसेच आणखी एका प्रसंगाचे वर्णन करताना केवळ नकळत पाण्याच्या टिपाडाला लेखकाचा स्पर्श झाल्यामुळे, ''आरं आर... मुडद्या! बाटविलंस... का पानी आता? काय तझं मडं प्यावं का?'' (पृ. ७७, 'उपरा') असा भेदभाव दिसून येतो. याउलट गावातील शाळकरी मित्र, शिक्षक यांच्याविष्यी चांगल्या भावना व्यक्त झाल्या आहेत. शिवाय रामभाऊ पाटलासारखा माणूस संकटसमयी आश्रय देताना दिसून येतो. फलटण—सातारा—जेजुरी—सासवड—खटाव—खोपोली—कोकण परिसर अशी अनेक गावे आणि तेवढया एक—दोन दिवसांपुरता येणारा संबंध देखील जसाच्या तसा व्यक्त होताना दिसून येतो.

'उचल्या'त देखील असे प्रसंग व्यक्त झालेले आहेत. लक्ष्मण गायकवाडांचं लातूर जिल्हयातील धनेगाव हे जन्मगाव यालाच लेखक वतनाचा गाव म्हणून सांगतो. लेखकाला लहानपणी भजन—कीर्तनाची आवड. त्यासाठी ते गावातील थोरा—मोठयांच्या घरी जाऊ—येऊ लागले. ''माझा तांब्या बाटवलास कीरं लक्ष्या'' (पृ. ६७, 'उचल्या') म्हणून शिव्या व मार खाणाऱ्याला लोक जवळ करू लागले, याचा लेखकाला आनंद होतो. गावातील वारकऱ्यात ते रमू लागले. गळयातील माळ पाहून त्यांना पोथी वाचावयास देऊ लागले. असे जरी असले तरी लोकांच्या भावना मात्र बदललेल्या दिसून येत नाहीत. शेवटी 'पाथरवटाचा लक्ष्या' हा टोमणा आहेच. मोठेपणी अशा या गावाविषयीची चीड व्यक्त करताना लेखक म्हणतो, ''या गावात जलमलो म्हणून गाव म्हणायचा. पर याच गावानं मला उपाशीपोटी ठिवलं व्हतं, आणि लाचारीनं जगाया लावलं हुतं... या गावानं मला गुलामीचं जिनं जगाया लावलं हुंतं... तरीबी या गावात जलमलो म्हणून गावावर प्रेम हुतं. अन् गावात यायचो पण लोकांच्या भावना मात्र बदलल्या नव्हत्या म्हणून वाईट वाटायचं.'' (पृ. ९४—९५, 'उचल्या') अशा प्रकारे दोघानीही आपल्या गावाविषयीचे कडू—गोड अनुभव व्यक्त केलेले आहेत.

१०. गावकुसाबाहेरील समाजाविषयीचे दोघानीही केलेले चित्रण:

गावकुसाबाहेरील जो इतर अस्पृश्य समाज आहे त्यांचेही चित्रण या दोन्ही आत्मकथनातून झालेले आहे. वरच्या वर्गात जसा जातीभेद पाळला जातो तसा खालच्या वर्गात देखील पाळला जातो. इथे तर साधा महार आडवा जाणे म्हणजे अपशकून समजले जाते. याविषयी कैकाडी बोलीत मानेचे वडील म्हणतात, ''अय, गाला लवकर पराद आड्डा वाईर'' (अग, उरक, महार आडवा येईल. पृ. १० 'उपरा') तसेच लेखक शशी या मराठा मुलीशी लग्न केल्यानंतर ज्यावेळेस जातपंचायत बसते त्यावेळेस अशीच एक म्हण येते. ''तुला काय जातीचं ना गोतीचं, आना सख्या म्हारणीचं.'' ( पृ. १५८ 'उपरा') यााशिवाय मसणजोगी, पारधी आदी जातीविषयीचे चित्रण केलेले आहे. 'उचल्या'त देखील मसणजोगी, डोंबारी, लमाण, पारधी वगैरे गावकुसाबाहेरील समाजाविषयीचे चित्रण केलेले दिसून येते.

११. दोन्हीतून व्यक्त होणारे भूकचे चित्रण:

गरिबी आणि भूक हे तर यांच्या पाचवीलाच पुजलेले. जात गुन्हेगार म्हणून कुणी काम देत नाही की भीकही घालत नाहीत. लग्नसमारंभातील पत्रावळीवील उष्टे—खरकटे खावे लागते. तर कधी मासे, खेकडे, रानमांजर, उंदीर, डुक्कर वगैरे प्राण्यांची शिकार करून भूक भागवावी लागते. 'उपरा'त देखील पोटासाठी बरीच भटकंती करावी लागते. गावातून मागून आणलेल्या शिळया तुकडयावर तर कधी मासे, डुक्कर, रानबोका, गिलोरगी वगैरे प्राण्यांची शिकार करून पोटाची खळगी भरावी लागत. तर बऱ्याचवेळा उपाशीपोटी राहावे लागते. एका प्रसंगाचे चित्रण करताना माने लिहितात, ''मी शिळी भाकरी चिचंच्या पाण्यात भिजायला घातली व्हती. पोटात आग पडली होती. बाहेरच्या आगीत आतली आत धुमसत होती. डोळयातनं पाण्याच्या धारा लागल्या व्हत्या. घरात कायबी नव्हतं. सारी घायकुतीला आलो हुतो.'' (पृ. ३७ 'उपरा').

१२. अशा या पोटासाठी मोठेपणी देखील दोघानाही उपजीविकेसाठी अनेक उद्योगधंदे करावे लागलेले आहेत.

लक्ष्मण गायकवाड यांना सूतगिरणीत काम करावे लागलेले आहे. नगरपालिकेत चपराशीचीही नोकरी करावी लागलेली आहे. शिवाय किराणा दुकान चालवणे, हॉटेल चालवणे, सायकल दुकान चालवणे वगैरेसारखे अनेक छोटे—मोठे उद्योग करावे लागलेले आहेत. तर 'उपरा'त मानेंना देखील पाव विकणे, पेपर विकणे, ग्रंथालयात काम करणे आणि प्रेमविवाहानंतर ब्लाऊज पिसेस विकण्याचा व्यवसाय करावा लागलेला आहे.

१३. दोघेही फुले—आंबेडकर विचारसरणीचे आहेत:

दोघानाही फुले—आंबेडकरांविषयी नितांत आदर आहे. त्यांचे विचार घेऊनच ते आजपर्यंत आपल्यावर, आपल्या समाजावर होणारे अन्याय अत्याचार हे केवळ फुले—आंबेडकरांच्या विचारसणीमुळेच आपणाला कळू शकले, असे स्पष्ट करतात आणि म्हणूनच आपण आपल्या समाजासाठी काहीतरी केले पाहिजे, त्यांचे पुनर्वसन केले पाहिजे हा विचार बळावताना दिसून येतो. मोर्चे—चळवळीच्या माध्यमातून त्यांनी पुनर्वसनाचे काम सुरू केलेले

आहे. म्हणूनच लक्ष्मण माने मनोगतात, ''तर हा मानवमुक्तीचा संघर्ष चालू झाला. खरं म्हणजे म. ज्योतीराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीची व्याप्ती वाढत आहे. माणसं उभी राहताहेत, पुनर्वसनाची मागणी करताहेत.'' असा विचार स्पष्ट करतात.

१४. दोघेही चळवळीतील कार्यकर्ते आहेत:

दोघांचेही चळवळीतील वावरणारी मनं आहेत. चळवळीविषयी त्यांना नितांत आदर आहे. त्यासाठी त्यात त्यांचा सक्रीय सहभाग आहे. मग ती चळवळ सामाजिक असो, राजकीय असो की साहित्यविषयक असो. चळवळीचं मोठेपण सिद्ध करताना लक्ष्मण माने मनोगतात म्हणतात, ''मी चळवळीत वाढतो. चळवळीनंच मला मोठं यश दिलं. म. जोतीराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छ. शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांनी माझं आयुष्य घडवलं गेलं. 'उपरा'चं यश हे या महान माणसांच्या पायवाटेने गेल्याचं यश आहे. 'ग्रंथाली'सारख्या चळवळीचं परिवर्तनवादी, समाजवादी मित्राचं, संघटनांचं यश आहे. ते एकटया लक्ष्मण मानेंचं नाही, त्याला घडवणाऱ्या सगळयांचं आहे.

१५. दोघेही सामाजिक, राजकीय कार्यकर्ते बनलेले दिसून येतात:

त्यासाठी दोघांनीही गावोगावी जाऊन समाजकार्य, समाज संघटित करण्याचे कार्य केलेले आहेत. होणारे अन्याय, अत्याचार, जलूम याविरूद्ध आवाज उठविलेला आहे. त्यासाठी कधी संप तर कधी मोर्चा काढावा लागलेला आहे. याविषयी लक्ष्मण गायकवाड म्हणतात, ''मराठवाडल्यातील भटक्या—विमुक्ताच्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी जिथे—जिथे भटक्या—विमुक्तावर अन्याय होतात तिथे—तिथे जाऊ लागतो. कधी कायद्याने तर कधी मोर्चा काढून अधिकाऱ्यावर दडपण आणण्यासाठी पाऊल उचलू लागलो.'' (पृ. १५५, 'उचल्या')

आणखी एके ठिकाणी प्रत्यक्ष मोर्चाचे वर्णन करताना, '२५ नोव्हेंबर १९८२ ला लातूरच्या नेहरू चौकातून मोर्चा निघाला... दहा हजारांच्या आसपास लोकं प्रथमच एकत्र आले व आम्हाला अन्यायापासून वाचवा, 'घरं द्या', 'काम द्या', 'जातीच्या नावावर गुन्हेगार समजू नका', 'पुनर्वसन करा' अशा घोषणा देत होती.'' (पृ. १७३, 'उचल्या') तसेच आपल्या राजकीय कारकिर्दीच्या सुरूवातीविषयी लक्ष्मण गायकवाड म्हणतात, ''चळवळीतला एक चांगला कार्यकर्ता म्हणून बहुजन समाज पार्टीचे लोक माझ्याकडे आले आणि एकदम खासदारकीच्या निवडणुकला उभा राहा म्हणाले.'' (पृ. १८२, 'उचल्या') निवडणुकीसाठी उभे राहिलेही, परंतु यश आले नाही. राजकीय कारकिर्दीस सुरूवात मात्र झाली हे नक्की. तसेच सामाजिक व राजकीय या दोन्हीचा समन्वय साधताना गायकवाड म्हणतात, ''मी या समाजव्यवस्थेत सामाजिक परिवर्तनासाठी न्याय, हक्क आणि समतेसाठी आज राजकीय—सामाजिक चळवळीत भटकत आहे.'' (पृ. १८८, 'उचल्या')

लक्ष्मण मानेंनी देखील समाजकार्य करण्यासाठी असे मोर्चे काढलेले आहेत. याविषयी ते म्हणतात, ''औरंगाबादच्या 'संशयित गुन्हेगार निर्मूलन परिषदे'ने प्रतिकात्मक गुन्हेगारीचे प्रतिक म्हणून बेडया जाळल्या आणि लाचारीचं प्रतिक म्हणून झोळया जाळल्या... २६ जानेवारी १९८३ ला मोर्चा निघाला. घोषणा होती, 'स्वातंत्र्याचं झालं काय? आमच्या हाती आलं काय?... तर मुंडव्याच्या सेटलमेंटची मंडळी मोर्चात म्हणत होती, ''जनावराला न्याय, माणसाचं काय?' (चेहरा—मोहरा, 'उपरा') आज ते राजकारणात देखील सक्रीय सहभागी आहेत. आमदारकीसारख्या पदावर विराजमान होऊन भटक्या—विमुक्तांच्या अनेक प्रश्नांची सोडवणूक करू पाहताहेत.

१६. दोघेही कार्यकर्ते असल्यामुळे विषमव्यवस्थेविषयीची चीड व्यक्त होताना दिसून येते.

दोन्हीतून अन्यायाविरूद्ध लढा व्यक्त झालेला आहे. विषमव्यवस्थेमुळेच हे अन्याय होताना दिसून येतात. मग ते श्रीमंतांनी गरिबांवर केलेले असोत की, श्रेष्ठांनी कनिष्ठांवरती आणि सवर्णांनी अस्पृश्यांवरती केलेले असोत. लक्ष्मण गायकवाड अशी चीड व्यक्त करताना म्हणतात, '' स्वातंत्र्याच्या ३९ वर्षांनंतरसुद्धा आपल्या लोकांना पोटाचे लेकरू विकून उपजीविका भागवावी लागते. स्वाभिमानाने जगणे अशक्य होते. तर स्वातंत्र्याचा उपयोग काय?'' (पृ. १५० 'उचल्या') तसेच आणखी एके ठिकाणी, 'पारध्याच्या घरात तीन—चार जर्मन भांड्याशिवाय काहीही राहत नाही. तरी तो फार मोठा बदमाष चोर समजला जातो, आणि ऑफिसर भ्रष्टाचार करून कोटयवधी रूपये कमवितात आणि बदली झालेल्या प्रत्येक गावात, शहरात एक तरी बंगला बांधतात. त्यांना मात्र आपण प्रतिष्ठित समजतो.' (पृ. १६०—६१ 'उचल्या') असा आपला संताप व्यक्त करतात.

'उपरा'त देखील अशी चीड, संताप व्यक्त होताना दिसून येते. आंतरजातीय विवाह केलेल्यांना सरकार मदत देते. म्हणून स्वत: लेखक आंतरजातीय विवाह केल्यामुळे अशी मदत मिळवण्यासाठी ते जिल्हा परिषदेत हेलपाटे घालतात, पण त्यांना तुम्ही अस्पृश्य नाही, म्हणून तुम्हाला मदत करता येत नाही, असे उत्तर मिळते. तेव्हा लेखक आपला संताप व्यक्त करताना म्हणतो, ''अस्पृश्य कोणाला म्हणायचं? अरे लेकांनो महाराला

निदान महारकी असते, हाडकी असते, हाडवळी असते, डोक्यावर कसं का असेना छप्पर असतंय... पण मी–मला 'धरणी माय ठाव देईना, अन् आभाळा हात पोचंना.' हागंदरीतल्या माणसाला अस्पृश्य म्हणत नाहीत. मग काय म्हणतात? (पृ. १४१ 'उचल्या') तसेच पुढे म्हणतात, ''ज्या जातीव्यवस्थेवर प्रहार करावा, म्हणून उपास काढतोय तीच पक्की करावी काय? आणि आमच्या पोरानं कुणाचीच जात लावली नाही, तर तो या देशाचा नागरिक होणार काय? अस्सा सारा शिमगा केला आणि सरकार सवलत, 'गरिबी हटाव' कुणी म्हणाला की मोजून पायतानानं हाणावा असं वाटत होतं.'' शिवाय 'चोर चोरी का करतो? माणसं अनीतिमान का होतात? ती मुळातच तशी असतात का? पोटातलं पाणी न हालता लाखो रूपये कमावणारे नीतिमान कसे? केवळ गुंतवणीकीवर व्याज खाणारे भाडखाऊ... नव्हेत काय? (पृ. १४१ 'उपरा') असा शब्दाशब्दातून संताप व्यक्त करतात.

१७. उपस्थित प्रश्न:

दोन्ही आत्मकथनातून अनेक प्रश्न उपस्थित केले गेले आहेत. हे प्रश्न चिंतनाच्या पातळीवरून व्यक्त झालेले आहेत. 'उचल्या'त १८८ पृष्ठात ११० प्रश्न उपस्थित केले गेले आहेत तर 'उपरा'त १५७ पृष्ठात २५५ प्रश्न उपस्थित केले गेले आहेत. या प्रश्नांची कुठेतरी गुंतवणूक होण्यापेक्षा त्यांची सोडवणूक व्हावी, हाच या प्रश्न उपस्थित करण्यामागचा हेतू आहे.

१८. हेतू:

'उपरा'त लक्ष्मण माने आपल्या लेखनामागील हेतू स्पष्ट करताना म्हणतात, ''या पुस्तकानं भटक्या–विमुक्त–जाती–जमातींच्या प्रश्नांवर सामाजिक मंथन सुरू झालं. भटक्यांचे प्रश्न सामाजिक चर्चेचा विषय झाला आणि त्यांच्यासाठी काम करण्याऱ्या मंडळीच्या कामाला चालना मिळाली तर पुस्तक लिहिण्याचे श्रम सार्थकी लागले असं मी समजीन. पिढयान् पिढया बिऱ्हाड पाठीवर घेऊन गाढवाचं जिणं जगणाऱ्या मंडळीच्या वेदना समाज समजावून घेऊ शकला तरी खूप झालं.'' (या मुक्कामावरून, 'उपरा') तर 'उचल्या'त लक्ष्मण गायकवाड, '...तथाकथित प्रतिष्ठितांना बुद्धिवाद्यांना व मध्यमवर्गीयांना या समाजाच्या दु:खाची अजिबात कल्पना नाही. म्हणून ही सर्व दु:खे लोकांच्यासमोर मांडावी हा या लेखनप्रपंचाचा हेतू. प्रस्थापितांनी आपले पूर्वग्रह बाजूला ठेवून आमच्याबद्दल नव्याने विचार करावा व त्याचवेळी या जातीजमातीतून नवीन पद्धतीचे शिक्षण घेऊन जगणाऱ्यांनी या समाजाबद्दलची आपली बांधिलकी सांगावी या दुहेरी हेतूने मी या व्यथा मांडतोय.'' (मनोगत, 'उचल्या') अशा दुहेरी पद्धतीने आपला लेखन हेतू स्पष्ट करतात.

## भेद:

१. एक गुन्हेगार आहे. त्यातही अनेक पोटजाती आढळून येतात. जसे पाथरूट, टकारी, भामटा, उचले, गीरनेवडार, कामाटी, घंटीचोर, वडार इत्यादी. म्हणूनच लक्ष्मण गायकवाड म्हणतात, ''... मला महाराष्ट्रात जात सुद्धा एक नाही अनेक जाती सांगाव्या लागतात.'' (उचल्या, पृ. ०४) तर दुसरा कैकाडी समाजाचा आहे. त्यालाच काही भागात 'कोरवी' म्हणून ओळखतात. यांच्यातही अनेक पोटजाती आहेत. लक्ष्मण माने यांनी म्हटल्याप्रमाणे, 'आज कैकाडी जमातीचच पोटशाखा जवळपास १४३ च्या आसपास आहेत.' (उपरा, चेहरा–मोहरा).

२. दोघांच्याही जातपंचायती:

दोघांच्याही जाती वेगवेगळया असल्यामुळे त्यांच्या जातपंचायतीदेखील वेगवेगळया आहेत. 'उपरा'त एखाद्यानं आंतरजातीय विवाह केल्यास, अथवा एखाद्या घरची बाई बोहरख्याली असेल तर संपूर्ण घराला वाळीत टाकण्याचा नियम असे. यासाठी गजरी या बाईचे उदाहरण देता येईल. तसेच स्वत: लेखकाला आंतरजातीय विवाह केल्यामुळे–घरच्यांसह झालेला विरोध. यासाठी जातपंचायत बोलावली जाते आणि 'उरसांड' (दत्तक घेणे) चालतं म्हणून तोडगा काढला जातो. नंतर परत एकदा लेखकाचं लग्न लावलं जातं. शेवटी हताशपणे लेखक उद्गार काढतो, ''जो जातीचा ठपका पुशीन म्हणत होतो, तो गडद झाला होता.'' (पृ. १५७, 'उपरा')

'उचल्या'त चोरी केलेले पैसे जर साथीदाराला वाटून न देता मधल्या मध्ये लांबवले तर जातपंचायत बसत असे. जर गुन्हा सिद्ध झाला तर त्याच्यावर दंड (मूठ) बांधायचा. हे दंड पाचशे–पन्नास पासून पाच–हजारापर्यंत असायचे. ज्या साथीदारासंगं चोरी करताना बेईमानी केली असल्यास त्याच्यासंगं सहा महिने, दोन महिने नुसतं पोटावरच चोऱ्या करायच्या. त्यानं बेईमानी केली म्हणून त्याला त्याचा हिस्सा मिळायचा नाही. जर एखाद्यानं मूठा नाकारला तर त्याला जातीबाहेर टाकण्याचा नियम असे. जर बापाचे

मुलीशीच संबंध असतील तर त्यादेखील शिक्षा ठरलेल्या असत. याविषयी लक्ष्मण गायकवाड सांगतात, '.. .म्हणून आमच्या जातपंचायतनं दोन वरसं शंकऱ्या अन् त्याच्या पोरीला वाळीत टाकलं. अन् शंकऱ्याच्या मिशा त्याच्या पोरीच्या मुतानं भादराव्यात अशी शिक्षा कवठयात दिली.' (पृ. ४२, 'उचल्या') जर एखाद्या स्त्रीचे इतर परपुरूषांशी पूर्वी संबंध होते अथवा असतील तर त्यांना पैशाच्या रूपात दंड भरावा लागे किंवा डोक्याचे केस कापले जात असे. नंतरच त्यांना शद्ध म्हणून मान्यता आणि मुलांच्या लग्नास परवानगी दिली जात असे. जोपर्यंत निर्णय लागत नसे, तोपर्यंत लग्नाचा मुहूर्त निघून गेला तरी लग्न लागत नसे. जर गुन्हयाचा निकाल देणे अवघड असेल तर त्यांच्यातदेखील एक उच्च न्यायालय असल्यासारखे असायचे ते म्हणजे कवठे येथे. कारण येथील काका हे या समाजातील पहिले मास्तर असल्यामळे त्यांच्या न्यायनिवाडयास मान्यता असे. त्यांचा शब्द प्रमाण मानला जात असे. अशाप्रकारे दोन्ही आत्मकथनातून दोघांच्याही जातपंचायतीचे चित्रण प्रभावीपणे रेखाटले गेल्याचे दिसून येते.

३. भाषा:

दोघेही विमुक्त जातींची असली तरी त्यांच्या जाती–जातीत फारक आहे. म्हणून त्यांच्या बोलीभाषा देखील वेगवेगळया आहेत. त्यातील काही शब्द आणि विधाने जशीच्या तशी आलेली दिसून येतात. त्याचा अर्थ कंसात प्रमाण मराठीत देऊन इतर मराठी भाषकांची सोय केलेली आहे. 'उचल्या'तील बोलीभाषा ही तेलगु आहे. (पृ. ४, 'उचल्या') असे स्वत: लेखक सांगतात.

तेलगुतील उदाहरणा दाखल काही शब्द:

तळंगे (पाटील), पाळा (वाटणी), गंगाराला (साथीदाराला), मूठा (दंड), उरेसंग (मराठ्यासंग), तग्गू (जातपंचायत).

चोरीच्या निमित्ताने येणारे काही शब्द:

खिस्तंग मत्ताया, मट्टल, त्यचींग, तिरगेंग, एलगाडया (खिसेकापाया, गडुडे आणया, बाजारांनी फिराया जायाचा), गुरंदा (हेर), तिरगाया (चोरी कराया), संतामुचलर (आठवडयाच्या बाजारात चोरी करणारा), खिस्तंगमतने (खिसे कापणे), पाळागंगार (टोळीवाल्याने).

पशू–पक्षांच्या रूपाने येणारे काही शब्द:

उडता (खार), रंडलू (खेकडं), गुन्ना (डुक्कर), नू यल्का पिल्लील तिन्टींरे (तू मांजर खातूस), मुर्ऱ्या (मटन) इरवा (काळीज)

तसेच काही हिंदी भाषेतील शब्द आणि विधाने:

'बोल कहॉ कहॉ रख्खा है पैसा सोना. नही तो बहुत मार खाओंगे'. (पृ. ०२) 'सब को मत उठाव'(पृ. १४३), 'गायकवाडजी सीर सलामत तो पगडी हजार! कायको जान गमाते! (पृ. १२९), 'तुम जहॉ भी रहो खुश रहो सनम्, दिल मिल गया तो क्या कम है सनम (पृ. ८९)

'उपरा'ची भाषा प्रामुख्याने कैकाडी बोलीभाषा जागोजागी व्यक्त होताना दिसते. बऱ्याच ठिकाणी विधाने ही जशीच्या तशी येतात दिसून येतात. उदा. 'आला लक्षा नि शाळा केच्चुंगरक हुगीना मिदा अस. मास्तर ईडुच का? मिदा असं. (पृ. ०४) 'दादा निन आय बुटीरा! नि् हू नान. खेघा पाकाकी' (पृ. ०६). 'अर्य गाला लवकर पराद आड्डा वाईर' (पृ. १०) 'गप खानसी नाई' (पृ. १९)

तसेच इतर काही शब्द:

इरड, कनिंग, सांधन, हुरडं फुकत उरसांड, छबडया, कांदवणी, गलांगू, गुन्ना, पालवी (कुत्रा), पेनसुन्यानो लंगर गोळी (काळूबाईचा भक्त).

जातपंचायतीच्या निमित्ताने येणारे काही शब्द:

ओक (खटला), ओकोळे (जातपंचायत चालवणारे), कै (जामीनदार), सनांग (खास वस्तू), येशान (शरीर संबंध), सुला (मावळखंड), थाळभरणी, मिदळाकी इ. अनेक शब्द सांगता येतील. एकूणच या दोन्ही आत्मकथनांनी भाषेच्या बाबतीत मराठीचा शब्दसंग्रह वाढविण्यास मदतच केली आहे. हे विसरून चालणार नाही.

## संदर्भग्रंथ:


१. लक्ष्मण माने, 'उपरा', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई–४०००२८, चौथी आवृत्ती, १९८८.
२. लक्ष्मण गायकवाड, 'उचल्या', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९८७.


❖❖❖

# म. फुल्यांच्या क्रांतिकारी शिक्षणाची पोलादी चौकट बळकट करणारी बिजागरी : सावित्रीबाई फुले

प्रा. डॉ. संदीप रतन कांबळे
मराठी विभाग,
इंद्रायणी महाविद्यालय, ता. मावळ, जि. पुणे, महाराष्ट्र, (India)
E-mail : sandipk07@gmail.com मोबा. ९८२३८०८७३६

दि. ०३ जानेवारी १८३१ साली खंडूजी नेवसे पाटलांच्या घरात लाडात वाढलेल्या सावित्रीबाईचे नायगाव, ता. खंडाळा जि. सातारा हे माहेर. बापाचा म्हणजे नेवसे पाटलाचा पंचक्रोशीत मोठा दबदबा. बापासारखंच आपणही करारी व्हावं, असं सावित्रीलाबाई नेहमी वाटायचे. सावित्रीबाईची आई सावित्रीचे खूप लाड करायची. जात्यावर भल्यापहाटे दळायला बसली की, ओव्या म्हणायची, त्यातल्या बऱ्याच ओव्या सावित्रीबाईच्या रंगा–रूपाचे, अंगीपणी असलेल्या गणांचे गुणगाण–गोड कौतुक करणाऱ्या असायच्या.

*''नायगावाच्या चावडीला, सोनियाचा दरवाजा,*
*सोनियाचा दरवाजा गं,*
*जुन्या गाडीव लव्हाराचा*
*सावित्री लाडाईची लेक, धरी बापाच्या धोतराला*
*धरी बापाच्या धोतराला गं,*
*लेक सोभती साधुराला....''*

अशा ओव्या ऐकताना सावित्रीच्या अंगावर चिमुटभर मांस चढल्याचा भास व्हायचा.

सावित्रीबाईला जिलेबी खूप आवडायची. बापही खूप लाड करायचा. बापाचे एकच म्हणणे असायचे, ''जो कोणी समाजसुधारणा करणारा असेल, जग परिवर्तन करणार असेल, त्यांच्याशीच माझ्या पोरीचं लग्न लावील...''

दरम्यान धनकवडीच्या पाटलांची मुलगी सगुनाबाई ही आपल्या मावस भावासाठी म्हणजे जोतिरावांसाठी सावित्रीबाईला बघायला गेली होती. त्यावेळी ''माझ्या जोतिबाला शोभून दिसेल'', असं म्हणून तिने लग्नाचा इरादा पक्का केला, त्यानुसार जोतीबांचे वयाच्या तेराव्या वर्षी लग्न झाले.

लग्न झाल्यावर सावित्री जेव्हा जोतीबाच्या घरी आली, तेव्हा सर्वत्र पुस्तकंच पुस्तकं बघून भारावून गेली. त्यावेळी एकंदरीतच शिक्षणाची काय स्थिती होती, त्यातली त्यात मुलींच्या शिक्षणाची काय स्थिती ही कल्पनाच न केलेली बरे. सावित्रीने जोतीबांच्या सानिध्यानत साध्या–सोप्या प्रतिमा–प्रतिकांतून 'अ–आ' ची बाराखडी गिरवायला सुरूवात केली. सुरूवातीला जमायचं नाही, पण प्रयत्नातून ते सारं काही जमलं. नंतर नंतर सावित्रीबाईला पुस्तकातील अक्षरे आपल्याशी बोलायत असल्याचा भास व्हायचा. ती सावित्रीबाईंना फुलासारखे वाटायची, याचे जोतीबांना खूप समाधान वाटायचे. बरेच वर्षे झाली तरी या दाम्पत्याला मूलबाळ होईना, म्हणून घरात चर्चेला उधाण आले होते. मान–अपमानाचे मानहानीचे प्रसंग वाट्याला यायला लागले होते. घरात तर सावित्रीला सवत आणावी येथपर्यंत मजल गेली होती. पण कालातीत विचारांच्या जोतीबांनी सावित्रीला खंबीरपणे साथ दिली. *''सावित्रीला सवत आणण्यापेक्षा, सावित्रीचं दुसरं लग्न करून मला 'सवता' का आणू नाही बरं, असं झालं तर त्यांना झालेली मुलं मी आनंदान स्वीकारील...''* असं म्हटल्यावर जोतीबांवर घरातले, बाहेरचे चिडायचे. रागवायचे. नंतर नंतर हा विषय मागे पडला. आता चांगलं लिहायला वाचायला यायला लागल्याने शिक्षणाच्या कामात जोतीबांना मदत करावी, म्हणून सावित्रीबाई पुढे सरसावल्या. मुलींना शाळेची दारं खुली झाली पाहिजेत, म्हणून जोतीबांनी सर्वत्र मोहीम उघडली होती. हे दाम्पत्य पोरीबाळींना शाळेत घाला, म्हणून लोकांना सांगताना जीवाचा आटापिटा करायचे. पण... झोपेचं सोंग घेणाऱ्याला जागे कसे करणार, याचा वारंवार प्रत्यय यायचा. पोरींना शाळेत कोणी पाठवायचे नाही. त्यामुळे घरी–दारी समजावयाला गेल्यावर नको तो अपमान सहन करावा लागायचा. एकदा जोतीबांचा ब्राह्मण मित्राच्या लग्नात झालेला अपमान या उद्वेगाने सावित्रीबाईला चीड आली, तरीपण जोतीबांना धैर्याने साथ दिली.

पुण्यात भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू करून ज्ञानदानाच्या कार्याला सुरूवात केली खरी, परंतु निराशाच पदरी पडायची. सावित्री इंग्ळ्यावर लिहायला लागली की, मुली पळून जायच्या. सावित्रीबाई त्या मुलींना पुन पुन्हा बोलावून पुस्तकात काय आहे, हे सोप्या, भाषेत समजून सांगयच्या. तेव्हा कुठे दोन–चार मुली थांबायच्या.

जोशीकृत पुणे वर्णनातील उतारा त्यादृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. *''फुले दाम्पत्यास दोन प्रहरी भाकरी खाण्यास देखील फुरसत नसे, जातीने एकेक दिवस संध्याकाळपर्यंत उपाशी राहावे लागे. तरी त्यांनी या परोपकारी कृत्याचा पिच्छा सोडलाच नाही. पुढे काही दिवसांनी लोकांच्या मनातील सर्व बंड निघून मुली शाळेत बिनहरक येऊ लागल्या व शाळा बरीच चालली.''*[४] रस्त्याने जाताना लोकं अंगावर शेण, चिखल, खरकाटं फेकायचे. अंगाचा वास सुटायचा. पण या लोकनिंदेला सावित्री डगमगली नाही. सावित्रीबाई सोबत दोन साड्या घेऊन जायच्या. शाळेत गेल्यावर ती घराब झालेली साडी बदलायची, आणि शिकवायला सुरूवात करायची. एकदा तर भटजी वाट अडवून म्हणला, ''सावित्री, तू हे शिक्षणाचं खूळ बंद केलं नाहीस, तर तुझी अब्रू शाबूत ठेवणार नाही...''पण खंबीर सावित्रीने त्याच्या मुस्काट झ्गोडलं, तेव्हापासून सभोवताली गर्दी 'आ' वासून बघायची. त्यावेळी पुरूषाच्या थोबाडीत मारणे, त्यातली त्यात भटजीच्या थोबाडात मारणे म्हणजे हे खूप मोठे धाडस होते. तेव्हापासून सावित्रीला सारे लोक खूप घाबरायचे. त्यानंतर मात्र सावित्रीची वाट अडवायची कोणाची हिंमत झाली नाही.

हा हा म्हणता साऱ्या पुण्यात ही बातमी पसरली. जोतीबांचे वडील म्हणजे सावित्रीबाईचे सासरे गोविंदराव. यांचे पुण्यातल्या तत्कालीन ब्राह्मणांनी कान भरले. एकाचे दोन सांगून पती—पत्नींत तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला. वाळीत टाकायची धमकी दिल्याने सावित्री—जोतीबा मात्र गोविंदरावांचे घर सोडून दुसरीकडे आश्रय घेणे भाग पडले. असे म्हणतात, संकटाच्या काळी जो मदत करतो, तोच खरा मित्र. असे जीवाला जीव देणारे काही मित्र म. फुल्यांनी जोडली होती. कालातीत विचार करणाऱ्या व स्वातंत्र्य—समता आणि बंधुता या न्यायाने वागणाऱ्या जोतीबांजवळ मग कसला आला जातीपातीचा भेदभाव. अशा वेळी उस्मान शेख नावाच्या मित्राने त्यांना आश्रय दिला. परंतु शेवटपर्यंत ज्ञानदानाचा ध्यास घेतलेल्या फुल्यांनी आपल्या कामात तसूभरही अंतर पडू दिले नाही.

अज्ञानाने माणसाला कसे गुलाम बनविले, अज्ञानाने आपली काय दुर्देशा झाली, याचे व्यवहारातील अनेक उदाहरणे देऊन लोकांना शहाणे करण्याचा विडाही जोतीबांनी उचलला. त्यासाठी पुस्तके लिहायला सुरूवात केली. 'गुलामगिरी' हे पुस्तक लिहून त्यात, ''तुम्ही जन्माने गुलाम होत नाहीत, तर कर्माने गुलाम होतात; म्हणून लोक तुम्हाला जास्तच गुलाम करतात.'' तर 'ब्राह्मणाचे कसब'मध्ये, ''जन्मापासून तर मरणापर्यंत ब्राह्मण कसा कर्मकांडात सर्वसामान्य माणसाला अडकवतो, याचे सविस्तर विश्लेषण केले आहे.''

जोतीबांनी शेवटी कर्मशून्य माणसापुढे झुकल्यावर, विचाराला कृतीची जोड द्यायची ठरवली. त्यासाठी प्रत्येक नियोजनाची सावित्रीबाईशी चर्चा, सल्लामसलत करून, सावित्रीला विश्वासात घेऊन म. फुले मार्गक्रमण करीत राहिले.

कोणत्याच राज्यकर्त्याच्या काळात माणसांवर झाले नसतील इतके अन्याय अत्याचर हे पेशवाईमध्ये अस्पृश्यांवर झाले. खरे तर हा माणुसकीला फासला गेलेला कलंक आहे. पेशवाईमध्ये 'गळ्यात मडकं, हातात झाडू, कमरेला बोराटीची काटी' ही अस्पृश्यांची आयडेंटीटी होती. १८१८ ला जरी पेशवाईचा खऱ्या अर्थाने अंत झालेला असला तरी ती व्यवस्था मात्र अगदी आता आतापर्यंत तशीच जिवंत होती. आज ती अस्पृश्यता, जातीभेद छुप्या पद्धतीने व्यक्त होत आहे, काय तो एवढाच बदल. परंतु त्यावेळी शूद्रांचे अतोनात हाल व्हायचे. त्यांना प्यायला पाणीसुद्धा मिळायचे नाही. अस्पृश्य लोक 'पाणी वाढ गं, मायऽऽ' म्हणून आक्रोश करायचे. त्यांच्या आकांताने सावित्रीबाईंच्या संवेदनशील मनावर जखम व्हायची. म्हणून फुल्यांनी तर आपल्या घरातील पाण्याचा हौदच सर्वांसाठी खुला करून दिला.

त्याकाळात बालविवाहाची पद्धत होती. नवरा मेल्यानंतर त्या स्त्रीला नवऱ्याच्या जळत्या चितेवर जिवंत जाळले जायचे. विधवांचे केस भादरले जायचे. म्हणून फुल्यांनी न्हाव्यांचा संप घडवून आणला. नाव्ह्यांचा तो भारतातला पहिला संप होता. खरे तर या संपात ब्राह्मण नमले, त्यांच्या दाढ्या, केस वाढायला लागले. त्यांना स्वत:ची लाज वाटायला लागली. परिणामी त्यांनी संप मागे घेतला.

ही सामाजिक कामे करताना दमदाटी, गुंडागर्दीला नेहमीच फुले दाम्पत्याला सामोरे जावे लागले, हे सर्वज्ञात आहे. रात्री—अपरात्री घरावर गुंड यायचे, परंतु आपल्या वाणीच्या ताकदीने आणि प्रेमाणे जोतीबांना त्यांची मने जिंकली. अशा वेळी सावित्रीबाई नेहमीच तेवणारी ज्योत बनून त्यांच्या पाठीशी उभी राहिली. एका सकाळी सावित्रीबाई घरी स्वयंपाक करीत होत्या, दरम्यान जोतीबा 'काशीबाई' नावाच्या विधवेला घरी घेऊन आले. ती जीव द्यायला नदीवर निघाली होती. समाजाने तिच्यावर अन्याय केल्याने तिच्यावर ही वेळ आली, हे फुले दाम्पत्यांना कळण्यासाठी कोणत्याही भविष्यवेत्त्याची गरज नव्हतीच. त्यांनी काशीबाईला आधार दिला. सावित्रीबाईंनी तिला आपल्या लेकीची माया देऊन सांभाळ केला. तिचे बाळंतपण केले. तिला जो मुलगा झाला, त्याचे नाव 'यशवंत' ठेवले आणि त्याला या दाम्पत्याने दत्तकच घेतले. हीच प्रेरणा घेऊन फुले दाम्पत्यांनी 'अशा अन्याय झालेल्या

बायांनी यावं, बाळंत व्हावं, मुल हवं असेल तर घेऊन जावं, नाहीतर इथं ठेवून जावं...' असा आपल्या घरावर ङ्गलक लावला. परिणामी जीवाचे बरे वाईट करायला निघालेल्या या शंभराच्यावर पीडित महिला फुलेवाड्यात आल्या, बाळंत झाल्या. त्यांच्या मुलांना सावित्रीबाईने प्रेमाने सांभाळले. आपलेसे केले. तेच 'बालहत्या प्रतिबंधक गृह' या नवाने नावारूपाला आले.

आपले विचार, कार्य पुढच्या पिढीला कळावेत म्हणून फुल्यांनी मोजकीच पण कालातीत अशी साहित्यनिर्मिती केली, ती आपण जाणकार जाणताच आहात. 'सत्यशोधक समाज' हे पुस्तक लिहिता लिहिता हाताला वात आला. अर्धांगवायूने हात लुळा पडला. जिद्दी जोतीबांनी डाव्या हाताने हे पुस्तक लिहून पूर्ण केले. आणि सावित्रीला म्हणाले, ''सावित्री हे माझ्या विचाराचं गाठोडं आहे. हे मी खुंटीला टांगून ठेवतो. उद्या कोणीतरी युगपुरूष येईल, ते विचारांचे गाठोडं खाली घेईल. पुण्यातल्या लोकांना सांगेल, मला काय म्हणायचं ते. तो युगपुरूष इतका महान असेल की, तो मनुस्मृतीचं दहन केल्याशिवाय राहणार नाही....'' हे बोलता बोलता फुल्यांना धाप लागली, तरीही ते अखंड बोलत राहिले, ''सावित्री, हे काम पुढं जोमानं चालू ठेव. आपल्या यशंवताला मोठं कर. त्याला डॉक्टर कर...'' आणि बोलता बोलता पुन्हा एकदम जोराची धाप लागली, त्यातच त्यांचा अंत झाला. तो काळ होता सन १८९० चा.

अशा वेळी रडून उपयोग काय? आणि रडणार तरी कोणापाशी. सावित्रीसमोर खंबीर मन केल्याशिवाय दुसरा पर्यायच नव्हता. सावित्रीने यशवंताला मडकं उचलायला लावले, परंतु सावत्र दीर पुढे येत यशवंताला दत्तक घेतले असल्या कारणाने रोखू लागला. अशा वेळी स्वत: सावित्री पुढे झाली. सारे झाल्यावर सावित्रीबाई कमरेला पदर खोचून जोतीबांच्या विचारांचा रथ जोमाने पुढे घेऊन गेली. दरम्यान यशवंताला सावित्रीबाईने डॉक्टर केले. यशवंताच्या दवाखान्यात सारे गोर–गरीब जायचे. आयुष्यभर समाजाची सेवा करणाऱ्या फुले दाम्पत्याला या गोर–गरीबांच्या चेहऱ्यावरचे हासू बघून जन्माचे सार्थक झाल्यासारखे वाटायचे. दरम्यान पुण्यात आलेल्या प्लेगच्या भयंकर साथीने हजारो लोकांचे बळी घेतले. प्लेगची लागन झालेल्यांची सेवा करता करता एके दिवशी सावित्रीलाही प्लेगने गाठले, आणि त्यातच तिचा अंत झाला. तो काळ होता, सन १८९७चा.

* * *

भारतीय स्त्रियांच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या तत्कालीन काळातील स्त्रीचे हे अस्तित्व अतिमहत्त्वाचे आणि मोलाचे आहे. प्रतिकूल परिस्थितीत कौटुंबिक दुरावलेपणाची तमा न बाळगता, सामाजिक प्रकोपाला न जुमानता आपल्या जिवाची पर्वा न करता मानवतेला जागणारे आणि सामाजिक कर्तृत्वाला पुजणारे साक्षात दैदिप्यमान 'धैर्याची माऊली' म्हणूनही सावित्रीबाईच्या कृतीसाफल्या अस्तित्वाची दखल घ्यावी लागते. कृतीच्या फलितातून ध्येयाची सीमा गाठण्याचे त्यावेळचे सावित्रीबाईचे मनोबल एवढे प्रबळ होते की, समोर आठ कोटी देवांचा अडथळाही त्यांना त्यांच्या ध्येयापासून परावृत्त करू शकला नाही. कौटुंबिक, धार्मिक, सामाजिक कोणत्याही अडथळ्याची पर्वा त्यांनी कधीच केलेली नाही.

तत्कालीन परिस्थिती बघता कुटुंबापुरते मर्यादित जीवन जगण्यात आणि कुटुंबाच्या संगोपनातच सारे आयुष्य व्यतीत करणे हेच स्त्रीचे अस्तित्व शिल्लक होते. त्यामुळे कुटुंबसंस्था जोपासून ठेवण्यात भारतीय स्त्रीचा मोठा सहभाग आहे, हे मान्य करावे लागते. मानव म्हणून तिला काही वेगळे अस्तित्व नव्हते. पारंपरिक पूजा–स्थानाला तिलांजली देऊन कर्तव्याला पूजा मानणारा सावित्रीचा नवा विचार तिने भारतीय स्त्री समोर ठेवला आहे, म्हणून सावित्रीबाई ही या स्त्री युगाचा नवा आदर्श आहे. स्त्री–पुरूष असा भेदभाव न करता स्वतबळावर शाळा काढणे, मुलींना शिकविणे, समाजकार्यात स्वत:ला झोकून देणे, दत्तक पुत्र घेऊन वारस चालविणे, गरजू आणि उपेक्षित स्त्रियांना आश्रय देणारी ती क्रांतीज्योत होती. याचेच प्रतीक म्हणून आजच्या फुले–आंबेडकरवादी पुरोगामी विचारांच्या स्त्रियांनी सावित्रीबाई फुलेंना आपली प्रेरणा व नव्या विचाराची देण म्हणून स्वीकारले आहे, यात वाद नाही.

* * *

सावित्रीबाईची समाजकार्याबरोबरच आणखी एक ओळख अधोरेखित करणे अत्यंत महत्त्वाचे वाटते. ती ओळख म्हणजे सावित्रीबाई एक जातीवंत कवयित्री होत्या. याची सर्वसामान्य लोकांना ङ्गारशी माहिती नाही. त्यांच्या काव्यरचनेबद्दल काही लेखांचा अपवाद वगळल्यास त्याबद्दल ङ्गारसे लेखन झालेली नाही. अवघ्या वयाच्या २३ व्या वर्षी म्हणजे १८५४ साली सावित्रीबाईंचा 'काव्यफुले' हा ४१ स्फूट रचनांचा काव्यसंग्रह प्रकाशित झाला. तर १८९२ मध्ये 'बावन्नकशी सुबोध' हा दुसरा काव्यसंग्रह प्रकाशित झाला. 'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' ही ५२ कडव्यांची दीर्घ काव्यरचना सावित्रीबाईंनी जोतीराव फुलेंच्या निधनानंतरच्या वर्षी म्हणजे १८९१ मध्ये लिहिली होती. 'काव्यफुले' या काव्यवसंग्रहात सामाजिक विषयावर कविता आहेत. सावित्रीबाईंच्या या दोन्ही काव्यसंग्रहातील कविताचे सामाजिक

कविता, काव्यविषयक कविता, निसर्गवर्णनपर कविता, स्वकथनपर कविता, बोधपर कविता आणि स्फूट कविता असे विविधांगी वर्गीकरण करता येते. दुसऱ्या काव्यसंग्रहात प्राचीन काळापासूनचा सामाजिक इतिहास कवितांद्वारे मांडला आहे. तसेच पेशवाईतील विदारक सामाजिक परिस्थितीचे चित्रण आणि जोतीरावांच्या कार्याविषयीचे चित्रण या काव्यसंग्रहात आढळते.

जोतीरावांच्या खांद्यांला खांदा लावून सामाजिक कार्य करीत असलेल्या सावित्रीबाईंना भारतीय सामाजिक व्यवस्थेची जाणीव होती. विषम समाजरचनेमुळे शूद्र आणि अतिशूद्रांची दु:खे त्यांनी समजून घेतली होती. शूद्रातिशूद्रांच्या दयनीय परिस्थितीचे कारण अतिशय समर्पक शब्दात त्या आपल्या कवितेतून मांडतात.

*''शूद्र आणि अतिशूद्र अज्ञानाने पछाडले*
*देव, धर्म, रूढी अर्ची दारिद्याने गठाळले''*

जोतीराव फुले यांच्याप्रमाणेच सावित्रीबाई या क्रांतिकारी विचारांची धगधगती तोङ्ग आहेत. या क्रांतीकारी तोङ्गेतून त्या समाजातील धार्मिक रूढी परंपरावर प्रखर हल्ला करतात. व्रत—वैकल्ये, नवस इत्यादी गोष्टींनी त्या आपल्या काव्यातून प्रखर विरोध करून वस्तुनिष्ठतेची जाणीव करून देतात.

*''गोट्याला शेंदूर फासुनी तेलात*
*बसवी देवात दगड तो,*
*नवस करिती बकरी मारेन,*
*नवस फेडीन बाळजन्मी''*

समाजाची दयनीय परिस्थिती बदलायची असेल तर त्यावर एकच उपाय, तो म्हणजे शिक्षण होय. शिक्षणामुळे शहाणपण आणि माणुसकी प्राप्त होते. शिक्षणाच्या अभावामुळे लोक परंपराप्रमाणे वागतात, म्हणून त्या आपल्या कवितेतून शूद्र—अतिशूद्रांना उपदेश करतात की,

*शूद्रांना सांगण्याजोगा आहे शिक्षण मार्ग हा*
*शिक्षणाने मनुष्यत्व, पशुत्व हाटते पहा*

'इंग्रजी शिका' या कवितेत सावित्रीबाई म्हणतात,

*''विद्येविना गेले वाया गेले पशू,*
*स्वस्थ नका बसू विद्या घेणे,*
*इंग्रजी शिकाया संधी आली,*
*इंग्रजी शिकूनि जातिभेद मोडा,*
*भटजी भारूडा फेकुनिया''*

इंग्रजी शिकून मानवतेचा विचार ग्रहण करा आणि माणसामाणसांत विषमता निर्माण करणारी जातिव्यवस्था नष्ट करा, हा मौलिक सल्लाही त्या देतात.

वरील काव्यसंग्रहांतील शिक्षणासाठी जागे व्हा, मनू म्हंजे, ब्रह्मवंती शेती, शूद्रांचे दुखणे, इंग्रजी माऊली, शूद्र शब्दाचा अर्थ, बळीचे स्त्रोत, शूद्रांचे परावलंबन, तयांस मानव म्हणावे का? इत्यादी समाजचिंतनपर कविता मार्मिक आहेत. तर अज्ञान, तेच संत, श्रेष्ठ धन, बाळास उपदेश, नवस, बोलकी बाहुली, गुलाबाचे ङ्गूल इत्यादी कविता बोधपर आहेत.

अर्वाचीन मराठी साहित्यात, विशेषत: कवितेच्या प्रांतात केशवसुतांनी क्रांती केली, असा मराठी समीक्षकांनी दावा केला आहे. असे असले तरी १८५४ साली सावित्रीबाईंचा पहिला काव्यसंग्रह प्रकाशित झाला. त्यानंतर तब्बल ३० वर्षांनी म्हणजे १८८४ नंतर केशवसुतांनी कविता लिहिली. केशवसुतांच्या ३० वर्ष आधी सावित्रीबाईंनी सामाजिक विषयावर कविता लिहून अर्वाचीन मराठी कवितांमध्ये क्रांती घडवून आणली, ही बाब दुर्लक्षून कसे चालेल. म्हणूनच खऱ्या अर्थाने सावित्रीबाई या अर्वाचीन मराठी काव्याच्या जननी होत्या. किंवा केशवुतांचे काव्य ही अर्वाचीन काव्यातील ङ्गक्त एक प्रगत अवस्था होती, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

* * *

क्रांतीचा महामेरू असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म. फुल्यांना आपला गुरू मानले होते. आज म. फुले दाम्पत्यांनी १८४८ मध्ये पुण्यातल्या भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू करून 'न ूतो ना विष्यते' अशी क्रांती घडवून आणली आहे. परमानंद म्हणतात, ''महार—मांग या वर्गातील लोकांसाठी शाळा स्थापन करून त्या चालविणे व इतर समाजबंधूंच्या बरोबरीने त्यांना वागविणे म्हणजे सिंहाच्या गुहेत प्रवेश करून त्याची आयाळ पकडण्यासारखेच होते.''[४] त्याच बळावर आजची स्त्री शिकली, मोठी झाली. वकील, डॉक्टर झाली. मान—सन्मानाच्या

जागा पादाक्रांत करून लाल दिव्याच्या गाडीत ड्ग्गिरायला लागली, ही पुण्याई केवळ फुले–शाहू–आंबेडकरांच्या शिक्षणाविषयीच्या असलेल्या दूरदृष्टीला जाते, यात तिळमात्रही शंका नाही.

याच विचारांना पुढे घेऊ जात असताना आज विविध गायक–गायिकांनी सावित्रीबाई, म. फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना कविता आणि लोकगीतांच्या माध्यमातून गुंङ्गन करून त्यांना विशिष्ट प्रकारची चाल लावून अजरामर केले आहे. ती गाणी आज पुस्तक, सी.डी. रूपाने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचली आहेत. फेसबुकवरूनही ती देश–विदेशात 'यू–ट्यूब'च्या माध्यमातून पोहोचली आहेत. असेच एक 'यू–ट्यूब'वरील सावित्रीबाईची महती वर्णन करणारे गीत, गायक आनंद शिंदे यांनी स्वरबद्ध केले आहे, ते मुद्दामहून आपल्या माहितीसाठी देत आहे.

*वकील, डॉक्टर झाले मी नीटर, फिराया लागलीस गाडीत,*
*माझी सावित्रीबाई नसती, असती गुरांचं शेणकुर काढीत...*

*अधिकाराने ड्ग्गिरती आज, पुरूषावर चढं आवाज,*
*सरकारी कामाला जाई, अंगावर सोन्याचा साज,*
*टिपटॉप राहतेस, कामाला जातेस, रोजच नवीन साडीत,*
*माझी सावित्रीबाई नसती, असती गुरांचं शेणकुर काढीत...*

*लई होता तो बिकट काळ, होतं डोईशी धुराचं जाळं*
*चुल फुकता फुकता जाई, दर दिसाची तुझी सकाळी*
*गेला तो काळ, गेली ती वेळ, विसरली बसून माडीत,*
*माझी सावित्रीबाई नसती, असती गुरांचं शेणकुर काढीत...*

*क्रांती कराया निघती पुढे, अंगी साहून शेणाचे शितोडे,*
*तुम्ही शिकावे नवीन धडे, स्वत: याचसाठी तडफडे,*
*घरोघरी ड्ग्गिरून, हाताला धरून, घातलं तुला बालवाडीत,*
*माझी सावित्रीबाई नसती, असती गुरांचं शेणकुर काढीत...*

*धन्य झाली आई सावित्री, मुक्त करून तिच्या जाती,*
*राजकारणात ग तुला, मान मिळतोय किती,*
*सुनीलचं मत घेऊन जीत, झाली तुझी आघाडीत,*
*माझी सावित्रीबाई नसती, असती गुरांचं शेणकुर काढीत...*

*वकील, डॉक्टर झाले मी नीटर, ड्ग्गिराया लागलीस गाडीत,*
*माझी सावित्रीबाई नसती, असती गुरांचं शेणकुर काढीत...*

*कवी सुनील यांचं हे गाणं, गीतकार आनंद शिंदे यांच्या आवाजत ऐकण्यासाठी व व्हिडिओ पाहण्यासाठी खालील लिंकला भेट द्या.* http://youtu.be/1KubnCSjpeg
किंवा youtube वर टाईप करा, Vakil Doctor Jhaali [Full Song] Jai Bheem Walyancha Sardar

## समारोप :

केवळ शाळा म्हणजे शिक्षण नव्हे. चार भिंतीच्या आतले शिक्षण म्हणजे शाळा नव्हे. या साऱ्याच्या बाहेरचे विश्व म्हणजे समाज, आणि या समाजातल्या अज्ञानी माणसाला सुशिक्षित करण्याचे, साक्षर करण्याचे काम महात्मा फुल्यांबरोबरच खांद्याला खांदा लावून सावित्रीबाईने केले. फुल्यांना साथ देणारी सावित्रीबाई खरे तर ही रथाचे दुसरे चाक होती. महात्मा फुले किंवा सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा आढावा घेत असताना, दोघांपैकी कोणालाही उणे करून चालणार नाही. शूद्र, अतिशूद्र, स्त्रियां या सर्वांना म. फुले–सावित्रीबाईंनी शाळेतल्या चार भिंतीच्या आतल्या शिक्षणाबरोबरच चार भिंतीच्या बाहेरचे, जगाच्या उघड्या व्यासपीठावरचे शिक्षण देऊन त्यांना ज्ञानरूपी दिव्याचा प्रकाश

दाखविला. त्यांना खऱ्याअर्थाने विद्याविभूषित केले. खऱ्या अर्थाने या क्रांतिकारी शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या महात्मा फुल्यांच्या क्रांतिकारी शिक्षणाच्या पोलादी चौकटीची सावित्रीबाई ही एक बिजागरी होती.

* * *

## संदर्भ :


१. डॉ. वृषाली रणधीर–मोरे, 'मी सावित्रीबाई जोतिबा फुले बोलतेय' (नाट्याविष्कार) यांच्या एकपात्री प्रयोगाच्या चित्रफिगती आधारे.

२. डॉ. सुशीला ढगे, लोकानुकम्पा, (संपा. डॉ. योगेंद्र मेश्राम) जाने.–फेब्रु.–मार्च, २००७, क्रांतीज्योती प्रेरणा अंक, नागपूर, पान नं. ९–१३.

३. डॉ. सरोज आगलावे, लोकानुकम्पा, (संपा. डॉ. योगेंद्र मेश्राम) जाने.–फेब्रु.–मार्च, २००७, क्रांतीज्योती प्रेरणा अंक, नागपूर, पान नं. १४–१६.

४. महात्मा फुले गौरवग्रंथ, (संपादक : हरी नरके), डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले आणि राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई, सुधारित आवृत्ती: २००६, पान नं. ४२३–४७७.

5. http://youtu.be/1KubnCSjpeg


❖❖❖

# कवी नारायण सुर्वे यांच्या कवितेतील प्रीतिभावना

डॉ. श्याम मु. जाधव
सहयोगी प्राध्यापक तथा मराठी विभाग प्रमुख,
कला व वाणिज्य महाविद्यालय, जरूड,
ता. वरूड, जि. अमरावती, महाराष्ट्र, (India)
Email: shyamjadhao3@gmail.com मोबा. ९१५८७०१९८७

## प्रस्तावना :

प्रेमकविता हा बहुधा सर्वच कवींच्या लेखनाचा विषय असतो. केशवसुतांपासून प्रेमकवितेचा विचार केल्यास त्यात हळूहळू बदल होत गेलेला दिसतो. त्यानंतरची कविकिरण मंडळाची इंग्रजी काव्याच्या अनुकरणाची प्रेमकविता यात हूरहूर, प्रतिक्षा, विरह, प्रेमभंग वगैरेंचा भाग येतो किंवा नंतरच्या काळातील वासनासक्त भोगलोलुप प्रेमकविता, या सर्व कवितेहून सुर्वेची प्रेमकविता भिन्न असते.

नारायण सुर्वे यांची कविता ही पती–पत्नीच्या नात्यातील आहे. जिथे अन्य कविता संपते, तिथे ही सुरू होते. या कवितेला संपूर्ण सामाजिक संदर्भ प्राप्त झाले. त्यामुळे प्रामुख्याने येते ते चाहीस, खुराडयात संसार करणाऱ्या पती–पत्नीचे प्रेम, त्यांच्यातले रूसवे, फुगवे, चीड, संताप, व्यक्त करते. या कवितेत वासनाभोग असला तरी त्यापेक्षा आत्मसमर्पनाची ओढ अधिक प्रगाढ आहे, म्हणून ही निखळ स्वरूपाची प्रेमकविता ठरते. सामान्य कवितेला वासनेला आणि भावनेला एक स्वयंभू महत्व आले असते. हा सुध्दा जीवन वास्तावाचा एक भाग असतो. प्रेममीलनाच्या प्रसंगी उन्माद आणि उल्हासच एकमेव असला तरी जीवनाच्या वास्तवाला पुन्हा दुसरी बाजू येते. म्हणून भावनेला व वासनेलाही वास्तवाचे पदर असतात. म्हणून सुर्वेची निव्वळ प्रेयसी राहत नाही, तर ती सहचारिणी, आधार देणारीही व प्रेरक अशी ठरते.

नारायण सुर्वेची कविता ही विवाहोत्तर प्रेम साकार करीत असल्यामुळे, त्यापूर्वीच्या भेटी, आठवणी, हूरहूर, लज्जा, अस्वस्थता, काहूर, आश्वासने, आतुरता हा भाग हा कवितेतून हद्दपार होतो. ही कविता मीलनापासूनच आरंभते आणि हे मीलनही अशा स्थितीतले असते, जिथे पलीकडे खडखडणारे कारखाने आहेत, खोल्याखोल्यांतून अंथरलेले बिछाने आहेत, ईश्वराच्या नावाने दिलेली शेवटची हाक आहे, अशा स्थितीत नव्या जोडप्याने एकत्र यायचे कुठे ? आणि बाबाने धुमसत फुटपाथ गाठाची, तेव्हा कुठे मिलनाचा एकांत लाभतो, म्हणून या एकांताला समर्पणाची ओढ असते. त्यासाठी शब्दांची गरज ठरत नाही. म्हणून कवी म्हणतात –

‘तुझे गरम ओठ...
रात्री आली नकार घेऊन’

ही समर्पणाची ओढ सतत वाढतच जाते, म्हणून हे समर्पणसुध्दा वेगळया स्तरावरचे ठरते. पुढे कवी व्यक्त करतो ते असे की, रतीचा शेवट रती नाही. तर तो नव्या पिढीचा जन्म आहे. हा जन्म जसा आनंद आहे, तशी एक जबाबदारीची जाणीव करून देणाराही आहे आणि हेच मुख्य सत्य आहे.

सुर्वेची प्रेयसी ही सुध्दा प्रियकराच्या बरोबरीने कष्ट उपसणारी अशीच आहे. त्यामुळे दिवसभराचे काम करून थकलेली जेव्हा ती घरी येते, तेव्हा हे आकाशच छानसे पाखरू होऊन खिडकीत येऊन बसले आहे, असे वाटते. तेव्हा ही केवळ प्रेयसी नसते, तर एक सहकारी असते, त्यालाही तिच्या कष्टाची जाणीव आहे, म्हणून कवी म्हणतो,

‘आतासाच कुठे तिचा डोळा लागलेला आहे.
एक स्वप्न सारिका येऊन तिच्याशी बोलत आहे.
ऐन रंगात आल्या आहेत सुखदु:खाच्या गोष्टी’

अशा या दमून आलेल्या चंद्रावळीजवळ तिचा प्रियकर शब्द जुळवित बसला आहे. त्याला तिची ओढ वाटते. स्नेहमय साथ त्याला थंड सावलीसारखी वाटते. ती दिवसभर संसाराचे आझे शिरावर वाहत थकते तरी ती चैत्रपालवी होते. तिच्या सहवासात सारे विसरून जावे, तिला घेऊन निळया समुद्राकाठी फिरायला जाऊन शांतपणे

सुखदु:खाला निरोप द्यावा. मात्र प्रत्यक्षात समोर वेगळेच वाढून ठेवले असते. हे स्वप्नरंजन बाजूला सारून लोकल पकडून घाम गाळायला जाणे जास्त आवश्यक असते.

ही प्रियसखीची प्रतिमा कवीच्या मनात सतत घिरटया घालीत असते. या साऱ्या आठवणींना संसाराचेचे संदर्भ जोडले आहेत. इथे कुठे विरहाचा, ताटातुटीचा संदर्भ येत नाही. यालाही कारण त्यांची विवाहोत्तर प्रेमकविता लिहिण्याची पध्दती. 'प्रेमात' निसर्गालाही तेवढेच स्थान असते. इथे मात्र सतत तिची वाट बघत असल्यामुळे कवीला निसर्गाशी तादाम्य पावणे सुध्दा कठीण जाते. तसे म्हटले तर प्रेमिकांसाठी 'पावसाळा' हा सृजनाचा मंत्र घेऊन येतो. या संदर्भाला विरहाची सुध्दा किनार जोडली असते, पण इथे जेव्हा पाऊस येतो, तेव्हा कवीला व्याकूळ करते ते,

'आता ह्या वाटेवरून
दोन पोरांना धरून
ती कशी जाईल.'

म्हणून सतत जाणवते ते, ज्यांची जगण्याची लढाई चालू आहे, त्यांच्यासाठी पावसाळा हा नवा दु:खाला आरंभ असतो. इथे कवी इथे प्रियकराच्या व्यथा–वेदना प्रकट करीत नाही तर फुटपाथवरच्या चिंता व्यक्त होतात. दोन पोरांना सांभाळत येणारी पत्नी डोळयासमोर येते, ते सुध्दा या उन्मत गडगडात. म्हणून सुर्वेची कविता निसर्गाचा मुक्तपणे आस्वाद घेण्यास धजत नाही.

अश्रू वाटून घेणे हे तिचे मुख्य काम आहे. केवळ तू उदास असून चालणार नाही. म्हणून कवी 'जेव्हा गलबलून जातो तेव्हा' तिच्या पवित्र कुशीचा त्याला आधार वाटतो. तिचे केस त्याला विरंगुळा ठरतात. तिची केसातून फिरणारी बोटे एकपरीने त्याला आश्वासन असते. दिवसभराची थकलेली असूनही ही त्याच्यासाठी चैत्रपालवी होते, हे प्रेम विश्वास टिकवून ठेवणे हे सुध्दा जिकरीचे काम असते, तिने डोळयात जहर साठवून पाहू नये, ही त्याची एकच आकांक्षा असते. म्हणून तो म्हणतो –

'आयुष्य घृणेत सरणार नाही, हवीच तर घृणाही ठेव
ज्या खडकावर घुसळलीस मान त्या माणसावर विश्वास ठेव'

कारण बरेचदा कोसळणाऱ्या विजेप्रमाणे तिलाही आपला वैताग व्यक्त करायचा असतो, परंतु ती बोलायचे थांबते, मोकळेपणाने बोलणे हा तिचा स्वभाव नाही. परंतु काही न बोलता संसाराच्या रथयात्रेत फक्त ओझे उचलण्याची जबाबदारी तिने पत्करली आहे. तिची चिंता ही त्याची चिरवेदना असते. म्हणून तो प्रेयसीला सांगतो –

इथे नारायण सुर्वेची कविता प्रेमभावनेचा उच्चांक गाठते. वेगळयाच पातळीवरून तिथे स्वरूप सुर्वे उघड करतात. समाजाच्या एकांतिक प्रवृत्तीला असे विचार धक्कादायकही असू शकतात, नव्हे तसेच असतात.

नारायण सुर्वेच्या कवितेतील लढाई ही जगण्याचीच आहे. 'नवी संस्कृती' आणण्याचे व्रत प्रियकराने घेतले आहे. तेव्हातरी आपला सूर्य येईल अशी त्याची जिद्द आहे. यात तिचेही सहकार्य तेवढेच असते. म्हणून येणाऱ्या विजयाचे स्वागत करण्यासाठी ते तिला तयार राहायला सांगतात.

अशी ही प्रेयसीच्या सोबत चालणारी वाट कवी आनंदाने चालत असतो. साऱ्या सुखदु:खाची ओंजळ तिच्या हातात रिकामी करीत असतो. ती घरात पाऊल टाकले तेव्हाच ती या साऱ्या काळोख्या रात्री आपल्या गात्राने फुलविणार म्हणून मूकपणे आश्वासन देते आणि याच आश्वासनाची पूर्ती करण्यासाठी कवी धडपडत असतो. येणारी पहाट या दोघांचीच नाही, तर साऱ्या संसारांची असते.

थांब, माफ करा, तोवर तुला मला, सत्य, धीर, पावसाळा, विश्वास ठेव इत्यादी कवितांव्दारे त्यांची प्रेमभावना व्यक्त झाली. समाजाच्या नव्या कणखर आणि दणकट जाणीवा घेऊन ही कविता अवतरते. इथे जी लढाई सुरू असते, त्या लढाईत कवी हा स्वत:ही सहभागी असतो आणि साक्षीदारही आहे. ही लढाई संपली तरी नवे प्रश्न शिल्लक राहतात. अशीच अतिशय दु:खात, दारिद्र्यात कुढलेल्या मनाची ही कविता आहे, मात्र तिला प्रेमाची साथ असल्यामुळे ती आशावादी ठरते. जे दारिद्रय हजारो लोकांच्या साक्षीने पुढे उभे राहाते, ते दारिद्रय त्यांच्या कवितेतून कुठेच हद्दपार झालेले दिसत नाही. या साऱ्या दारिद्रयात दोन क्षण सुखाचे घालविता येतील अशी एकच व्यक्ती असते, ती म्हणजे त्याची प्रेयसी, तिच्याजवळ साऱ्या सुखाची ठेव जपलेली असते. म्हणून ही कविता सत्य साकार करते. अशाप्रकारे नारायण सुर्वे यांच्या कवितेतून प्रीती भावना व्यक्त होते.

## निष्कर्ष :

१) नारायण सुर्वे यांची प्रेम कविता ही वासनासक्त, भोगलोलूप प्रेमकविता अशा स्वरूपाच्या कवितेहून त्यांची प्रेमकविता अगदी वेगळी आहे.

२) नारायण सुर्वे यांची प्रेमकविता ही सहचरिणी व आधार देणारी प्रेरक शक्ती ठरते.

३) नारायण सुर्वे यांची प्रेमकविता विवाहोत्तर प्रेम साकार करते.

४) नारायण सुर्वे यांच्या प्रेमकवितेतून रतीच्या आनंदामागे एक जबाबदारीची जाणीव करून देणारी ठरते.

## संदर्भग्रंथ सूची :

१) ऐसा गा मी ब्रम्हा, नारायण सुर्वे, अभिनव प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती १९६२

२) जाहिरनामा, नारायण सुर्वे, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती १९७५

३) माझे विद्यापीठ, नारायण सुर्वे, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

४) सर्व सुर्वे, संपादक, वसंत शिरवाळकर, डिम्पल पब्लिकेशन, ठाणे., प्रथम आवृत्ती

❖❖❖

# समतावादी तांड्याची अपेक्षा

**डॉ. विजय जाधव**
राजस्थान महाविद्यालय, वाशीम, महाराष्ट्र, (India)
संपर्क :- ९८८१५२७६६०

## प्रस्तावना :

अनंत अशा अंतराळात अगणित तारे अस्तित्वात असल्याची खगोलशास्त्रीय माहिती अभ्यासकांसाठी उपलब्ध आहे.शोध लागलेल्या ग्रहांपैकी पृथ्वीसुद्धा एक आहे.एक विशेष आणि आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे, उर्वरित कुठल्याच ग्रहावर वातावरण आढळून आलेलं नाही; शिवाय कुठंच जलसाठे, सजीव सृष्टी वा मनुष्यजीवन अस्तित्वात नाही…ते सगळंकाही आहे केवळ पृथ्वीवर. खरंतर पृथ्वीच्या गुणमूल्यांकनासाठी शब्दही अपुरेच ठरतात.

पृथ्वीच्या निर्मितीनंतर लगेचच सजीव सृष्टीही निर्माण झाली असं नाही. सगळ्या क्रिया हळूहळू घडत गेल्या. जलाशयं, वनस्पती आणि निरनिराळे असंख्य सजीवही निर्माण होत गेले.त्यात सगळ्यांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे मनुष्य निर्माण झाला, पण तो आजच्यासारखा नव्हता.त्याची देहाकृतीही सुंदर म्हणता येईल अशी नव्हती. शतकामागून शतकं येत गेली.हळूहळू सगळं काही उत्क्रांत होत गेलं.हजारो वर्षे तर इतर ठिकाणच्या माणसांची बाकीच्या ठिकाणी असलेल्या माणसांना माहितीही नव्हती. हा फार मोठा इतिहास आहे, शिवाय त्या अतिव्यापक विषयाशी हातमिळवणी करण्याची इथं गरजही नाही. इथं विदेशी भाषा, संस्कृती आणि वातावरणाचाही आढावा घेण्याचीही गरज नाही. इथं केवळ स्वदेशाविषयी, त्यातही बंजारा जमातीचाच प्रमुख मुद्दा आहे.

नैसर्गिक घटकांवर वेगवेगळ्या प्रकारे आपल्या बुद्धिबळाच्या सामर्थ्यावर माणसानं प्रक्रिया करून अप्रतिम सौंदर्य निर्माण केलं. मूळ घटक शोधून त्यानं आश्चर्यकारक असे नवनवे शोध लावले. माणसानं बुद्धीच्या जोरावर आपली उंची वाढवत नेली आणि तो निसर्गाचा स्पर्धक बनला,हीच त्याची मोठी चूक म्हणावी लागेल.

निसर्ग हाच सर्वशक्तिमान असून परिवर्तनशीलता हा त्याचा स्वभाव आहे. निसर्गनियमानुसार सतत प्रत्येक घटक हा बदलत राहतो.सजीवसृष्टी निर्माण करूनच निसर्ग थांबला नाही,तर त्यानं प्रत्येकाच्या पोषण आणि संरक्षणाची व्यवस्था केली.प्रत्येकाला गरजेपुरती ऊर्जा आणि बुद्धी दिली. प्रत्येकाला स्वातंत्र्याबरोबरच त्या स्वातंत्र्याचं रक्षण करण्याचं स्वातंत्र्य दिलं.एका बाजूला समस्या आणि दुसऱ्या बाजुला उपायही उपलब्ध करून दिले.आणि गरजेप्रमाणे शोध घ्यायची जबाबदारी ज्याच्या त्याच्यावर सोपविली. पण वाईट गोष्ट ही की आपल्या अकलेचा वापर करायला लागल्यापासून माणसानं सौंदर्यात मोलाची भर तर घातलीच,पण त्याच्या अधिक ओढा हा विकृतीकडं झुकला.त्यानं पशुपक्षी आणि माणसांवरही नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न केले.विश्वासघात,खोटेपणा अन् कपटकारस्थान करून इतरांवर कुरघोड्या करायला लागला.इतरांच्या हक्कांवर अतिक्रमणं आणि हल्ले करायला लागला. हिंसेबरोबरच मोठ्या प्रमाणात निसर्गविरोधी विघातक तत्त्वांचा अवलंब करायला लागला.त्यानंच त्याची विविध रूपं प्रस्थापित केली.कुठं तो बुद्धिवादी, सौंदर्यसंपन्न,नीतिमान आहे-तर कुठं तो हिंसक,क्रूर आणि अतिशय कुरुपही आहे.म्हणजे,माणुसपणाला लागलेला तो कलंकही आहे.

निसर्गानं जातधर्म, ईश्वर, दैव,स्वर्ग-नर्क असे अनेकानेक तथाकथित प्रकार निर्माण केले नाहीत.हे असले प्रकार जन्माला घालणारा जन्मदाता हा मनुष्यच आहे.ह्या प्रकारांमुळे माणूसच माणसांपासून तोडला गेला.त्याच्या जीवनात यातना, दुःखं आणि मोठमोठी संकटं आली.एवढंच नव्हे,तर नैसर्गिक मूल्यंही संकटात पडली.

भारतीय व्यवस्था ही मुळातच निसर्गद्रोही आणि ती कमालीची विषमताप्रचुर आहे.त्या व्यवस्थेतल्या अतिविषारी घटकांच्या देशाच्या सर्वांगीण विकासावर चांगलाच विपरीत परिणाम झालेला आहे.इथल्या टोकाच्या विषमतेनं देश दुबळा आणि विकलांग केला. काही लोक शैक्षणिक,व्यावसायिक,आर्थिक आणि इतर सर्व प्रकारच्या विकासप्रक्रियेत विलक्षण भरारी घेऊ शकले,तर सर्वाधिक संख्येतले,म्हणजे वर्णव्यवस्थेत खालच्या पायऱ्यांवर ढकललेले देशोधडीला लागले. गुलामीच्या वेगवेगळ्या श्रेण्या सक्रिय असल्यामुळे कनिष्ठ म्हणून हिणवल्या गेलेल्यांना खऱ्या जीवनाचा स्पर्शच होऊ शकलेला नाही. केवळ सामाजिकच नव्हे,तर प्रत्येक प्रकारच्या स्वातंत्र्य आणि खऱ्या प्रतिष्ठेपासून त्यांना जाणीवपूर्वक

वंचित ठेवण्यात आलं.त्या जन्मपीडित लोकांवरचे अन्याय-अत्याचार कमी कमी न होता ते दिवसेंदिवस गुणाकाराच्या मार्गानं वाढतच आहेत.म्हणजे जातीधर्म,ईश्वर ह्या मानवनिर्मित प्रकारांनी अतोनात नुकसान केलेलं आहे.

पण वर्णव्यवस्थेचा थेट संबंध तांड्याशी आलेला नाही. तांडा हा जातीधर्म, ईश्वर, अस्पृश्यता, श्रेष्ठ-कनिष्ठत्व अशा गोष्टींपासून सुदृढच होता.कारण तांड्याची बंजारा संस्कृती ही स्वतंत्र आहे.तो हिंदू धर्माचा घटक नाही.ह्या विशाल देशातली बंजारा ही स्वतंत्र संस्कृती आणि स्वतंत्र ओळख आहे.तांडा हा वर्णातीत असून तो निधर्मी आहे.त्याचं प्राचीन काळापासून निसर्गाशी अतूट असं नातं आहे आणि ईश्वर त्याच्यासाठी महत्त्वहीन असून तो निसर्गपूजक आहे.तो विभिन्न कलेत पारंगत असून उत्सवप्रिय आहे.त्याच्यात काही गट असले तरी त्या सर्वांची बोलली जाणारी भाषा एकच आहे. सर्वजण एकाच परंपरेशी बांधले गेलेले आहेत.

तांड्यातल्या चालीरीती, परंपरा ह्या इतरांपेक्षा पूर्णतः वेगळ्या असूनही कालांतरानं त्यात काही बदल होत गेले.जाती, पोटजाती प्रसवणाऱ्या धर्माशी अन त्यातल्या परंपराशी तांड्याचा संबंध काय? - असाही एक प्रश्न विचारला जाऊ शकतो.बंजारा जमात ही रानावनात,डोंगरकपारीत,राहत आलेली असली तरी तांड्याची निर्मिती बहुतांशी गावसानिध्याशी संबंधित अशीच राहिलेली आहे.व्यावहारिक आणि अनेक प्रकारे त्यांचा संबंध हा इतरांशी येत आलेला आहे.त्यामुळे इतरांच्या परंपरा हळूहळू तांड्यात शिरत गेल्या.त्या परंपरा मुळातच अनैसर्गिकतेशी संबंध आलेला असल्यामुळे त्या तांड्याचं भलं करू शकणारच नव्हत्या.पेटलेल्या वनव्याच्या झळा ह्या दूरवरच्या लोकांनाही इजा पोहोचवितात,तसा हा प्रकार आहे. म्हणजे, अप्रत्यक्षरीत्या वर्णव्यवस्थेच्या विषम वातावरणामुळे तांडाही दूषित व्हायला लागलेला होताच. पूर्वी बंजारा संस्कृतीशी तीळमात्रही संबंध नसलेल्या विघातक परंपरा ह्या तांड्याला उध्वस्त कराण्याचंच काम करताना दिसतात. जादूटोणा, देवीदेवता, हुंडापद्धती, कर्मकांड अशी लांबलचक यादी देता येईल, जी बाहेरून आलेली आहे.

संपूर्ण जगात भारत हा एक असा देश आहे की, जिथं देवाधर्माच्या नावाखाली माणसांची घोर विटंबना करण्यात आलेली आहे. असा हा एकमेव देश सातत्यानं हादरे पचवीत ह्या पृथ्वीतलावर उभा आहे. इथं हजारो जाती आणि त्याहीपेक्षा मोठ्या संख्येतल्या पोटजातींमुळे माणसं ही परस्परांपासून दुरावली गेलेली आहेत. त्यांच्यातल्या प्रेमभावनांची सकस बीजं ही परस्परांमध्ये रुजू दिलेली नाहीत.त्यांच्यातला भेदभाव हा भीषण स्वरूपाचा होता आणि तो आजही अस्तित्वहीन झालेला नाही.माणसंच माणसांना कट्टर शत्रूंच्या भूमिकेत बघतात. माणसंच माणसांवर अत्याचार करतात आणि माणसंच माणसांना घाबरवितात आणि घाबरतातसुद्धा.पटकथा लिहिणारे निसर्गानं आपल्या उदरात घेऊन अदृश्य केले ; पण पटकथा,व्यक्तिरेखा आणि पारंपरिक कलावंत,दिग्दर्शक येतच राहतात.माणूस म्हणून माणसाच्या जगण्याला लागलेला हा मोठा कलंक आहे. त्याला निसर्गाची मान्यता नाही,तरीही माणूस त्याची हेकेखोरी त्यागायला तयार नाही. सवर्ण आणि अवर्णियांचही सौंदर्य बाधित झालेलं आहे ही जाण लोकांमध्ये आपलं अस्तित्व निर्माण करू शकेल का ?

भारतात इतरही काही धर्म आहेत, पण त्यांची व्याप्ती लक्ष वेधून घेणारी नसल्यामुळे कुठं त्यांविषयी चर्चेचे सूर उमटत नाहीत.हे धर्म वेगळेपणा मांडणारे असून त्यांच्यात हिंदू म्हणवल्या जाणाऱ्या धर्माइतका कडवटपणा नाही. शेवटी,धर्म हा कुठलाही असला तरी साचेबंदच असतो. तो आपली पूर्वजागा बद्दलण्याला मुभा देत नसतो. त्याचं त्याचं आपलं स्वतःचं अपरिवर्तनशील असं तत्त्व असते.

भारतात अनैसर्गिक आणि विघातक तत्त्वं धर्म म्हणून शिरजोर झालेली होती, तरीसुद्धा भारतातच संपूर्ण विश्वासाठी उपकारक ठरावी अशी घटना घडलेली आहे... ती म्हणजे बुद्धाचा जन्म. त्यालाही काही लोक द्वेषापोटी, खोडसाळपणे आणि अज्ञानातून धर्म म्हणतात.त्याचंही हिंदूकरण करण्याचा प्रयत्न करतात. बहुताधिकांना धर्म आणि धम्म यांमधला मोठा फरकच कळत नाही. हा धम्म त्याच्या गुणवैशिष्ट्यांमुळे जगभर जाऊन पोहोचला. तो विषमतेवर आधारलेला चौकटबद्ध धर्म नसून तो समतेवर आधारलेला धम्म आहे. तो स्वतः परिवर्तनशील असून समग्र माणसांचं उजेडाशी नातं जोडणारा नैसर्गिक आणि विज्ञानप्रचुर असा विचार आहे. एकूणच मानवाला माणूस म्हणून त्याची प्रतिष्ठा बहाल करून त्याला उच्च श्रेणीचं जीवनमूल्य शिकवणारं एक अत्युच्च तत्त्वज्ञान आहे. त्यात देव, दैव, कर्मकांड, अवैज्ञानिकता, जाती,पोटजाती आणि माणसांचं मूल्यहनन करणारी कुठलीच फाजील तत्त्वं नाहीत. धम्म हा पूर्णतः मानवी स्वातंत्र्य आणि त्याच्या उन्नतीचा पुरस्कर्ता आहे. तो काळानुसार बदलण्याला मुभा देतो. तो मानवाच्या उत्थानासाठी वचनबद्ध आहे. माणसामाणसांतले भेदभाव त्याला अमान्य आहेत. प्रज्ञा, शील, करुणा आणि मैत्रीचं महत्व विशद करणारा

तो एक सर्वश्रेष्ठ विचार आहे. तो कुणाला प्रलोभनाला च्या जाळ्यात ओढुन गुंतवीत नाही. ज्याला धम्म पटेल तो त्या मार्गाचा अवलंब करू शकतो, इतकं त्यात स्वातंत्र्य आहे.

मात्र बुद्धभूमीतच धम्माचं स्वरूप विसंगत अवस्थेत आढळते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धम्मात परिवर्तनविरोधी लोकांनी टाकलेली घाण बाहेर काढून चिकित्सकपणे 'बुद्ध आणि त्याचा धम्म' हा ग्रंथ निर्माण केला. त्यानंतरच नागपूरला धम्मदीक्षेचा कार्यक्रम घडवून आणला. पण नवदीक्षित समाज हा आधीच्या हिंदूधर्मात वाढलेला असल्यानं त्यावर जुन्याच विचारांचा पगडा होता. त्यातून त्याला लवकर बाहेर पडता आलं नाही. धम्म नीटपणे समजून घेता न आल्यानं तो समाज पूर्णतः धम्ममय होऊ शकला नाही. म्हणून पूर्वीच्या धर्मातल्या पुष्कळशा विघातक बाबी त्याच्या आचरणात आढळून येतात. आधी त्याला जात होती, पोटजाती होत्या. संबंधित मर्यादाही होत्या. तो समाज आजही पूर्णपणे धम्ममार्गापर्यंत पोहोचला नसला, तरीही बऱ्याच अंशी त्यात सुधारणाही होत आहे.पुष्कळसे लोक जाती-पोटजातींची मढी जाळतानाही दिसताहेत. ही प्रक्रिया थांबलेली नाही. तो समाज हिंदू धर्मात होता तसा आता निश्चितच राहिलेला नाही.

बंजारा जमातीचा विचार केला तर म्हणता येईल की, ही जमात मुळातच धर्मातीत आहे. स्त्री-पुरुष असमानता बंजारा संस्कृतीला केव्हाच मान्य झालेली नाही. ह्या बंजारा जमातीनं आपली संस्कृती इथवर जपत आणलेली आहे.पण त्यातही पोटजातसदृश्य काही गोष्टी शिरलेल्या आहेत.कदाचित बाह्यधर्मीयांचा प्रभाव वा गरज म्हणून झालं असेल.पण तरीही त्यात अस्पृश्यता नावाचा विषारी किडा शिरलेला नव्हता.निसर्गावर निष्ठा असलेली बंजारा संस्कृती ही धम्मविचारांना जवळ करणारी आहे. कदाचित बुद्धधर्म्मीयांचा प्राचीन काळी बंजारा संस्कृतीवर प्रभाव पडलेला असावा.पण हा संशोधनाचा विषय आहे.

संस्कार आणि संसर्ग अशा दोन्ही गोष्टी संपर्कातल्या माणसांना प्रभावित करत असतात. तद्वतच तांडा इतरांपेक्षा पूर्णतः वेगळा असला तरीही कुठल्या न कुठल्या कारणानं त्याचा इतरांशी संबंध येतोच. त्यामुळे कालांतरानं मूळ प्रवृत्ती,मूळ धारणा ह्या मूळ स्वरूपात टिकून राहत नसतात. बंजारा समाजाचा एक स्वतंत्र इतिहास असा आहे की, तो सतत भटकंती करणारा होता, तो निधर्मी, जातीविहीन असला तरी निसर्गपूजक होता. तो पूर्वीच्या काळापासून गट करून राहायचा.तो कुठला कुठला माल कुठल्या कुठल्या ठिकाणी पोचविण्याचं काम करायचा. या प्रकाराला 'लदेणी' म्हटलं जायचं.उत्तरोत्तर त्याच्यात बदल होत गेला आणि मग तो तांडा करून स्थिरावायला लागला.त्यापूर्वीही बंजारा समाजात विविध प्रकारचे गण होते. त्यालाच पोटजाती म्हणता येतील. खऱ्या अर्थानं बंजारा जातीविहीन असल्यामुळे पोटजात हा रुढ शब्द होऊ शकत नाही. केवळ फरक स्पष्ट व्हावा म्हणूनच त्याचा प्रयोग केला. तो संशोधनाचा स्वतंत्र विषय असल्याने त्यावर बोलणे योग्य ठरणार नाही. जमाती ह्या प्रकारात मोडणारा हा समाज आहे. तांड्यानं आजवर आपली संस्कृती जपलेली आहे. संस्कृतीला जपता जपता तांड्याला मदत करणारे लोक हे तांड्यामध्येच असायचे. त्यांना आत्माराम कनीराम राठोड यांनी 'तांडासेवक' म्हटलेलं आहे. ह्या संस्कृतीप्रिय समाजात कुठलाही उत्सव हा आपल्या पारंपारिक गीत आणि नृत्याशिवाय साजरा होत नाही. त्यासाठी वाद्यं वाजविणाऱ्यांची साथ हवी असते. त्याला 'ढालीया' म्हणायचे.तो डफ वाजवायचा.

तीज, होळी वा लग्नसमारंभ असेल... ह्या अशा प्रकारच्या सगळ्या उत्सवांमध्ये डफ वाजवून तो समाजाला उत्साहित वा मदत करायचा. तो तांड्यातला अतिशय विश्वासू घटक असल्यामुळे सोयरिकी जुळवण्याची कामंही करायचा. त्याच्याच भरवशावर सोयरिकी व्हायच्या. तोच मुलगा नि मुलगी बघून त्यांविषयी माहिती पुरवायचा. स्वतः मुलामुलींनी परस्परांना बघण्याचा समाजात प्रघात नव्हता. नवरी, नवरदेव हे परस्परांना लग्नावेळीच बघू शकत असायचे.लग्नकार्य असेल, तांड्यांमध्ये कुठला निरोप पोहोचविण्याचं काम असेल, सोयरिकीसाठी, लोकांना बोलावणं आणि सुख-दुःखांच्या वार्ता पोहोचविणं अशा गोष्टी ढालिया करायचा.

सकाळ,संध्याकाळ अशा दोन्ही वेळेला तो तांड्यात घरोघरी भाकरतुकडा मागत हिंडायचा. इतर प्रसंगी वाजवण्याचा मोबदला म्हणून त्याला पैसे मिळायचे.समाजात लग्नानंतर आणि मुलीला निरोप देण्यापूर्वी लग्नावर झालेल्या खर्चाचा हिशोब केला जायचा.त्यावेळी त्याला धर्म म्हणून दान दिलं जायचं.

दुसरा महत्वाचा घटक होता न्हावी. तोही सोयरिकी जुळवायचा. तो वार्ता पोहोचविण्याचंही काम करायचा. प्रत्येक उत्सवात त्याचा सहभाग असायचा. त्याचा मूळ व्यवसाय तांड्यातल्या माणसांची दाढी - कटिंग करणं हा होता. अलुतेदार - बलुतेदारांप्रमाणे त्याला ज्वारी, डाळीच्या स्वरूपात वर्षातून एकदा मोबदला दिला जायचा. लोक मोठ्या मनाचे असल्यामुळे त्याला मदत करायचे. तो तांड्याची बांधलेला असायचा.

तीसरा 'धाडी' नावाचा एक गट. हा तांड्याच्या मनोरंजनाचं काम करायचा. सारंगी वाजवून गीतं गायली जायची. हे लोक चार सहा महिन्यांतून याच्या त्याच्या घरीदारी आणि वेटाळात सर्व लोकांना एकत्र जमवून कार्यक्रम करायचे.तांड्याच्या करमणुकीचं ते एक माध्यमच असायचा. त्यांची गीतं ही ठरलेली असायची. संस्कृती जतनाबरोबरच चांगल्या गोष्टी शिकणं, सासवासुनांनी परस्परांशी चांगलं वर्तन करावं अशा प्रकारचा संदेशही असायचा. एकूणच मनोरंजनासह समाज प्रबोधन होईल अशी विशेष गीतं त्यांच्याकडं असायची. त्यात मग आचरट विचरट स्वरूपाचे विनोदही असायचे. पण त्याचा मुख्य उद्देश समाजप्रबोधन करणं हाच असायचा. तो गट बलुतेदार नसायचा. कपडे,ज्वारी आणि इतरही प्रकारचं त्यांना धान्य मिळायचं. पैसेही दिले जायचे. त्यांना त्यांच्या कलेचं मूल्य तिथल्या तिथं मिळायचं.

तांड्यात विशेष महत्त्व असलेला चौथा गट होता सनार (सोनार). बंजारा स्त्रिया ह्या भरपूर अलंकारांनी मढलेल्या असायच्या. तो त्यांचे सगळ्या प्रकारचे दागिणे बनवून द्यायचा. तो चांदीचे कडे, राजस्थानी स्त्रिया नथ घालतात तशा सोन्याच्या नथीही तो बनवून द्यायचा. त्याच्या व्यवसायाशी जे जे संबंधित असेल, ते ते तो सर्व बनवून द्यायचा. त्याचं बलुतेदारासारखं नसायचं. लगेचच त्याला त्याचा मोबदला दिला जायचा.

बंजारा जमातीत इतरही अनेक प्रकारचे गट असतील, पण इथं सर्वच लक्षात घेऊ शकत नाही.विशेषतः हे चारच गट आमच्या तांड्याकडे महत्त्वाचे मानले जातात.विशेष म्हणजे सर्वांची संस्कृती,भाषा,पेहराव आणि त्यांची आडनावही जवळपास सारखीच. तरीही ते गट काहीसे वेगळे पडलेले.

त्या गटांशी बेटी व्यवहार होत नसायचा. आजही होत नाही.ही गोष्ट बंजारा संस्कृतीला दुषित करणारी आहे.ह्या समाजाचं नातं निसर्गाशी आहे आणि म्हणूनही ही गोष्ट समाजविघातक तशीच ती अनैसर्गिकही आहे.तांड्याच्या संस्कृतीला, एकरूपतेला ती बाधक ठरलेली आहे. त्यामुळे तांड्याला दुबळेपण आलेलं आहे.तांडाशक्तीचं विभाजन झालेला आहे. राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या चांगले दिवस येण्याची गरज आहे.त्यासाठी तांड्यानं ते गट विसर्जित करून बेटीव्यवहार सुरू करायला हवा. आपल्या संस्कृतीची आपल्याच हातून अवहेलना होणार नाही असं वर्तन करावं. हे एक तांडाच नव्हे, तर राष्ट्रहिताच्या दृष्टिनंही उचललेलं महत्त्वाचं पाऊल ठरेल.

आता पूर्वीचा काळ राहिलेला नाही.जगात झपाट्यानं बदल होत आहेत. आता तांडा सर्व लोकांत मिसळायला लागलेला आहे. नवनवी साधनं आणि माध्यमं उपलब्ध होत आहेत. यामुळे त्या चारही गटांची काम संपलेली आहेत. त्यांना मुख्य प्रवाहात घेतलं गेलं तरच त्यांची प्रगती होऊ शकते. आपण इतर धर्मियांतल्या नुसत्या उणिवा काढत न बसता आपल्या अशुद्ध होत चाललेल्या मानसिकतेला शुद्ध आणि बलवान करण्याची गरज आहे.तांड्यातही आता शिक्षण प्रसार होत आहेत, लोक सज्ञानी होत आहेत, त्यांनाही आता तांड्याबाहेरचं जगही कळायला लागलेलं आहे. त्यामुळे तांड्यातांड्यातून लोक पुढाकार घेतील आणि तांडे गटमुक्त झाल्याची घोषणा करतील, अशी आशा बाळगायला हवी.

## निष्कर्ष :-

१) तांडा प्राचीन काळापासून जातमुक्त आहे.

२) तांड्यामध्ये पोटजाती नसतात.

३) तांडा निसर्ग पूजक असल्याने कर्मकांड पूर्वी होत नसायचे.

४) संपूर्ण भारतात तांड्याची संस्कृती,चाली रिती, प्रथा, परंपरा सारखीच आहे.

५) संविधानाचं आधार घेतल्यास तांड्याची प्रगती होवू शकते.

६) अंधश्रद्धामुक्त तांडा होण्यासाठी विज्ञानवादी शिक्षणाची नितांत आवश्यकता आहे.

७) बंजारा समाज मातृसत्ताक पध्दती अवलंब करणारा समाज होता. परंतु आता पुरुषसत्ताक पद्धतीचं अवलंब केल्या जाते.

## संदर्भ ग्रंथ :-

१) डॉ. यशवंत मनोहर : आत्माराम कनिराम राठोड, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, प्र.आ.१ जुलै १९८९

२) राठोड आत्माराम कनिराम : तांडा, अभिजात प्रकाशन, नागपूर, प्र. आ. १९८९

३) राठोड आत्माराम कनिराम : गोरबंजारा लोकजीवन, गोरवट प्रकाशन,मोहा, प्र. आ.१९९४

४) डॉ. केशव फाळके : बनजारा लोकसाहित्य, संकल्प प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९९४

५) प्रा. राठोड मोतीराम : गोरमाटी, अक्षयदीप ऑफसेट प्रकाशन, औरंगाबाद,प्र. आ. १९९८

❖❖❖

# नवकथेचा वेगळा आविष्कार : खानोलकर आणि जी.ए.

**प्रा.डॉ. वीरा पवन मांडवकर**
सहायक प्राध्यापक
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ, महाराष्ट्र (India)
इमेल – veeramandavkar18@gmail.com भ्रमणध्वनी 9403014885

**सारांश :**

दुसऱ्या महायुद्धाने केवळ मनुष्य आणि वित्तहानीच झाली नाही, तर मानवी मूल्यांचाही विध्वंस झाला.याचे दूरगामी परिणाम मानवाला भोगावे लागले. याचा परिणाम अर्थातच साहित्यावर झाला.कथेनेही आपली कात टाकून नवप्रवृत्ती आणि नवे आकृतिबंध स्वीकारले.नवकथेने कथानकाशिवायही नवकथा असू शकते, हे समीक्षकांना दाखवून दिले.नव्या दमाच्या कथाकारांनी आपली कथा विवक्षित व्यक्तीभोवती न फिरविता समुहमनाच्या व्यापक चित्रणातून मानवी मनाची अनाकलनीयता शोधण्यात उपयोगात आणली.1960 नंतरच्या नवकथेच्या विकास व विस्तारकार्यात अनेकांनी हातभार लावला. त्यात चि.त्र्यं. खानोलकरांचे योगदान संस्मरणीय आहे.खानोलकरांची कथा ही मध्यमवर्गियांच्या जीवनातील घटना, प्रपंचाचा काही भाग स्वीकारून अंकुरली, फुलली. विशेषतः मध्यमवर्गियांच्या एकंदर आचारविचारातील अळणीपणा, अलिप्तता, भित्रेपणा, त्यांनी अचूक टिपला. 1960 नंतर त्यांच्या कथेचे रूप अधिक विकसित झाले. व्यक्तीच्या बाह्यविश्वाबरोबर त्याच्या अंर्तमनाचा तिने अधिक वेध घेतला. मराठी लघुकथेच्या क्षेत्रातील नवकथा कालखंडात गंभीर प्रवृत्तीच्या कथा लिहिणारे जी.ए.कुळकर्णी यांचीही कामगिरी लक्षणीय आहे.जी.ए. जीवनाला ग्रासणारी दारूण दुःखे प्रतीकांच्या माध्यमातून विविध रूपात उभी करतात.मध्यमवर्गीय पात्रे,नियतीच्या पुढे हतबलता, तीव्रदुःख, मृत्यूचे दर्शन ही वैशिष्ट्ये खानोलकर आणि जी.ए. या दोन्ही कथाकारांमध्ये दिसतात.

**प्रस्तावना :**

नवकथा ही महायुद्धोत्तर काळातील बदलत्या जीवन जाणिवांच्या परिघातून निर्माण झाली. दुसऱ्या महायुद्धाने केवळ मनुष्य आणि वित्तहानीच झाली नाही, तर मानवी मूल्यांचाही विध्वंस झाला. जीवनावरचा विश्वास डळमळीत झाला. मनुष्याचे हिडीस रूप जगासमोर आले. त्यामुळे मानवी मनातील कोमल भावना, नाजुक बंध, हळवेपणा, संवेदनशीलता सगळंच लयास गेलं. मनुष्य हानी आणि वित्तहानीपेक्षाही अखिल मानवजातीचे हे नुकसान भरूनन येण्यासारखे होते. याचे दूरगामी परिणाम मानवाला भोगावे लागले. याचा परिणाम अर्थातच साहित्यावर झाला. मराठी वास्तववाद, अस्तित्त्ववादाने साहित्यावर प्रभाव टाकायला सुरवात केली. कथेनेही आपली कात टाकून नवप्रवृत्ती आणि नवे आकृतिबंध स्वीकारले. महायुद्धाने विध्वंस पावलेल्या जीवनमूल्यांचे प्रतिबिंब तिच्यात उमटले. जीवनाचे एक वास्तव चित्र साकार झाले. या कालखंडातील कथाकारांनी त्यांना आलेला अनुभव जसाच्या तसा मांडला. पूर्वी कथांमध्ये आढळणारे अंधानुकरण, लोकाराधन किंवा रंजकत्वाचा भाग आढळत नाही. विज्ञानाची भीषणता व मानवी स्वभावातील अमानुषता आपल्या मूळ रूपात नवकथेने मांडली. फ्राईडच्या मानसशास्त्राने पूर्वापार चालत आलेल्या प्रस्थापित संकेतांना जबरदस्त हादरा दिला. मर्ढेकरांच्या नवसमीक्षेने वाचकांना एक नविन दृष्टिकोन दिला.

नवकथेत कथानकाला गौण स्थान प्राप्त झाले. त्यावर नवकथेत कथा नसते, अशी टीका केली. पण नवकथेने कथानकाशिवायही नवकथा असू शकते, हे समीक्षकांना दाखवून दिले. क्षणभर मनाच्या आतल्या गाभाऱ्यात, अंतर्मनात तरळून गेलेली भाववृत्तीही जेथे पुरेशी ठरते अशी नवकथा वाचकांनी कथानकाशिवायही स्वीकारली आणि आपलीशी केली. नवकथेचे प्रवर्तक म्हणून बा.सी. मर्ढेकर, दि.बा. मोकाशी, पु.भा.भावे, अरविंद गोखले, माडगूळकर, गाडगीळ यांचे नाव घेतले जाते.

1958 ते 1960 च्या दरम्यान नवकथेला थोडे शैथिल्य आले. फडके काळातील तंत्रबद्धतेपासून मुक्त होऊन ती मनोविश्लेषणात रमली. तिच्यातील नाविन्य ओसरू लागले. याच काळात कथेच्या क्षेत्रात उद्धव शेळके, सखा कलाल, मनोहर तल्हार, कमल देसाई, विद्याधर

पुंडलिक, विजया राजाध्यक्ष यांची पिढी आत्मविश्वासाने पुढे आली. या नव्या दमाच्या कथाकारांनी आपली कथा विवक्षित व्यक्तीभोवती न फिरविता समुहमनाच्या व्यापक चित्रणातून मानवी मनाची अनाकलनीयता शोधण्यात उपयोगात आणली. 1960 नंतरच्या नवकथेच्या विकास व विस्तारकार्यात अनेकांनी हातभार लावला. त्यात चि.त्र्यं. खानोलकरांचे योगदान संस्मरणीय आहे.

**बीजशब्द :** दुःख, नियती, निराशा, मध्यमवर्ग, नवकथा, अलिप्तता, क्रौर्य, मानवी मन

## चि.त्र्यं. खानोलकरांची कथा :

कवी, नाटककार, कादंबरीकार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खानोलकरांनी कथालेखनही केले. आपल्या अपेक्षाभंग, यातनाग्रस्त जीवनाचे चित्रण त्यांनी 1959 साली प्रसिद्ध केलेल्या 'जोगवा' काव्यसंग्रहातील कवितेत केले, 'रचिली होती रास फुलांची सुटला भणभण वारा, गंध उडाला आणिक विझला, मिणमिणता गाभारा' हे त्यांच्या कवितेतील भाव कथेत प्रतिबिंबित झाले. त्यांचे प्रकाशित कथासंग्रह म्हणजे 'सनई', 'राखीपाखरू', 'चाफा आणि देवाची आई', 'बाप', 'मोगऱ्याची वेणी', 'सैना गाईची कहाणी', 'दुःख', 'नाडीबंद' हे आहेत. सत्यकथा, किर्लोस्कर, बालार्क, वीणा, रंग, शब्दरंजन, साधना, मौज इत्यादि नियतकालिकांत त्यांच्या कथा सातत्याने लोकप्रिय झाल्या. खानोलकरांबद्दल असे म्हटले जाते की, त्यांना कथेचा घाट फार आवडत होता. जे जाणवले ते व्यक्त करण्याची एक दिशा त्यांना नव्याने गवसली होती. कदाचित कवितेपेक्षा कथालेखन केले तर आर्थिक लाभ अधिक होईल असाही त्यांच्या मनाने हिशोब केला असावा.

खानोलकरांची कथा ही मध्यमवर्गियांच्या जीवनातील घटना, प्रपंचाचा काही भाग स्वीकारून अंकुरली, फुलली. विशेषतः मध्यमवर्गियांच्या एकंदर आचारविचारातील अळणीपणा, अलिप्तता, भित्रेपणा, त्यांनी अचूक टिपला. त्याविषयी त्यांना असलेली उबग अनेक कथांतून स्पष्ट होते. 'एक होता राघू', 'सत्य' 'ताजा माणूस' 'राखीपाखरू' अशा अनेक कथांतून अत्यंत समर्पकपणे ते मध्यमवर्गियांच्या जीवनाचे चित्रण करतात. 'सत्य या कथेत पांडू कारकूनच्या निधनानंतर त्याची नियोजित वधू जेव्हा त्याच्या मृत्यूविषयी विचारते, तेव्हा तिच्याशी कोणीही बोलत नाही. पण ती गेल्यावर पंचनामा करून मोकळे होतात. येथे मध्यमवर्गियांच्या अंगकाढूपणाचे दर्शन घडते. 'हाकेचं उत्तर नाही' या कथेत तात्याच्या कुटुंबातील सर्वजण कोसळलेल्या इमारतीखाली गाडले गेल्यानंतर एकाकी, भ्रमिष्टावस्थेत जीवन जगणाऱ्या तात्यांना त्यांच्या ऑफिसमधील कोणीही कर्मचारी चार सांत्वनपर शब्द घेऊन सामोरा जात नाही. तेव्हा मध्यमवर्गियांची अलिप्तता पुन्हा एकदा अधोरेखित होते. 'एक फाटका माणूस' या कथेत मधुकर नावाच्या पांढरपेशा कारकूनी जीवनातून बाहेर पडण्याची धडपड करणाऱ्याचे व या आपल्या समव्यवसायी बांधवाला हसणाऱ्या इतर कारकुनांचे चित्र रेखाटतात, तेव्हा मार्मिक शब्दात लिहितात, 'एखाद्या भगदाडासारखा तो दिसत होता. म्हणजे त्या माणसाच्या फक्त कडाकडाच शिल्लक होत्या. मधला आकार, माणूस कुठे दूर जाऊनगुहेत रडत बसला होता. फक्त माणसाची चौकट शिल्लक होती. त्या चौकटीत कोळ्याच्या जाळ्यासारखे मधुकरचे अंग थरथरत होते.' अशा वर्णनातून ते सामान्य माणसाच्या सामान्यपणाचे चित्रण केलेले आहे. 'नाटक' ही अशीच एका मध्यमवर्गीय, स्वतःच्या मुलीच्या पगारावर स्वाभिमानशून्य जीवन जगणाऱ्या कुटुंबाची कथा आहे.

1950 ते 60 या दशकातील खानोलकरांची कथा बाल्यावस्थेत होती. 1960 नंतर त्यांच्या कथेचे रूप अधिक विकसित झाले. व्यक्तीच्या बाहयविश्वाबरोबर त्याच्या अंर्तमनाचा तिने अधिक वेध घेतला. समाजातील बुवाबाजी, मध्यमवर्गियांची मरगळलेली मनोवस्था, त्यांची क्रियाशुन्यता, वासनेची विविध रूपे, शारिरिक, मानसिक विकृती, मरणाची धास्ती यासारख्या विषयांवर त्यांनी कथालेखन केले असले तरी त्यांच्या काही ठराविक कथाच दमदार आहेत. 'सनई', 'राखी पाखरू', 'फाटक्या शिडाचे पडाव', या कथा अधिक धैर्याने जीवनातील प्रखरतेला सामोऱ्या जाणाऱ्या आहेत. व्यक्तिचित्रण, वातावरणनिर्मिती, कथाबांधणीतील अकृत्रिमता, कथेची सुरूवात व शेवट यांतील सहजता यातून या कथा वास्तवतेशी नाते सांगणाऱ्या आहेत. 'काळोखातील पांढरपेशा खडक', व 'भारवाही' या कथांचाही त्यात समावेश होतो. 1951 ते 75 या कालखंडात खानोलकरांनी लेखन केले असले तरी ते तूरळक प्रमाणात. शिवाय त्यांच्या कथेचा घाटही पारंपरिकच आहे. सुरूवातीचा

कालखंड कोकणामध्ये व्यतीत करून ते मुंबईला आले. कोकणच्या प्रादेशिक जीवनाचा एक ठसा त्याच्या वाङ्मयावर उमटला. बरेचदा त्यांच्या कथेतील पात्रे प्रादेशिकच असतात. तरीही खानोलकरांची कथा प्रादेशिक ठरू शकत नाही.

खानोलकरांनी कोकणातील दारिद्र्य जवळून पाहिले. पुढे मुंबईला आल्यावर पांढरपेशांच्या जीवनातील क्षीण दीन वृत्ती , विसंगती, तोंडपुजेपणा, स्वार्थीपणा ते जसा नेमका हेरतात, तसाच कोकणमधील दारिद्र्य, समृद्ध निसर्गाची विविध रंगरूपे, माणसाची टगेगिरी, दारिद्र्यामुळे स्वभावात निर्माण झालेला आपमतलबीपणा, त्याबरोबरच रांगडा प्रामाणिकपणा, भोळसरपणा ते अचूकपणे टिपतात. कोकण मुंबईच्या स्वभावातील विसंगतीमोठ्या खुबीने कथांतून मांडतात. मानवी जीवनात जो दुःखाचा स्रोत अखंड झिरपत असतो, तो खानोलकरांच्या कथांतून पदोपदी प्रत्ययाला येतो. आहार, भय, मैथुन या माणसाच्या आदिम प्रेरणा. त्या निस्तरण्यासाठी माणूस अखंड धडपडत असतो. त्यातून होणारी कुचंबणा मूलभूत आहे. अतर्क्य नियतीच्या हातातील माणूस हे एक अगतिक खेळणे आहे. जीवन प्रवासात वळणावळणावर त्याचा पराभव होतो. तो पार उन्मळून जातो. जसा 'हाकेचं उत्तर नाही' या कथेतील तात्या सोनार कृर नियतीच्या वरवंट्याखाली भरडला गेलेला एक एकाकी दुःखी जीव आहे. जगात मरणाचे दुःख विदारक असले तरीही प्रत्यक्षात मरणाराला मरणोत्तर भोगावे लागत नाही. ते त्याच्या निकटवर्तियांच्यावाट्याला येते. म्हणून तात्या सोनाराचे दुःख मनाचा ठाव घेते. 'छळवाद', 'हाक', 'परस्त्री', 'डोलारा' अशा त्यांच्या अनेक कथांतून ही कृर नियती आपला प्रभाव दाखवून देते.

'खानोलकरांची कथा ही काव्यात्मकतेच्या प्रभावातून अधिक भावनाव्यंजक होते. कधी ही काव्यात्मता लोकसाहित्याचे अम्लान लेणे होऊन येते तर कधी या काव्यात्मतेतून गूढताही येते. भालचंद्र फडके यांनी खानोलकरांच्या कथावस्तूचा आढावा घेताना म्हटले आहे की, 'वास्तव भयानक असते तरी ते स्वीकारण्यावाचून सुटका नसते. प्रत्येकाचे आयुष्य हाच मुळी पूर्वनियोजित स्वतंत्र तुरुंग आहे.—आणि त्यातच जळत जगावे लागते. ही अपरिहार्यता माणसाला शोकात्म कथारचनेकडे घेऊन जाते.'[1]

## जी.ए. कुळकर्णींची कथा :

मराठी लघुकथेच्या क्षेत्रातील नवकथा कालखंडात गंभीर प्रवृत्तीच्या कथा लिहिणारे जी.ए. कुळकर्णी यांची कामगिरी लक्षणीय आहे. 'रक्तचंदन', 'काजळमाया', 'निळासावळा', 'रमलखुणा', 'सांजशकुन', 'पिंगळावेळ', 'हिरवे रावे', 'पारवा', हे 1959 ते 77 या कालखंडातील त्यांचे एकूण आठ प्रसिद्ध कथासंग्रह. जी.एं.च्या कथांतील वेगळेपणामुळे त्यांना कथेच्या प्रांतात खूप मजल मारता आली. त्यांनी चाकोरीबद्ध कथेचा मार्ग न स्वीकारता आपले वैशिष्ट्यपूर्ण रस्ते स्वतः निर्माण केले. त्यांच्या कथांतील स्थळ, काळ, व्यक्तिनिगडित अनोखे वातावरण, अभिव्यक्ती हे इतरत्र अपवादानेच सापडेल. त्यांची रंगसंगती, शैली, प्रतिकयोजना हे खास त्यांचे प्रांत आहेत. त्यांनी 'पारवा' या कथासंग्रहापासून रूपककथा लिहिण्यास सुरूवात केली. तत्पूर्वी चक्रधर, ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, विष्णुदासनामा यानी महानुभाव व भागवतधर्मीय संतवाङ्मयातून तसेच केशवसुत, गोविंदाग्रज, तांबे, बी, कुसुमाग्रज यांच्या काही कवितांतून रूपकांचा प्रयोग केल्याचे दिसते. पण जी. एंची ओळख रूपककथांद्वारे होते, असे म्हणण्यास हरकत नाही.

जी.ए. जीवनाला ग्रासणारी दारूण दुःखे प्रतीकांच्या माध्यमातून विविध रूपात उभी करतात. 'निळासावळा' कथासंग्रहातील चंद्रावळ, राणी, अवशेष, गुंतवळ, या कथा, 'पारवा' कथासंग्रहातील बळी, काकणे, या कथा, 'हिरवे रावे' या कथासंग्रहातील वहाण, गिधाडे, बाधा या कथा, 'रक्तचंदन' या कथासंग्रहातील सोडवण, पराभव, माघारा, राधी, वस्त्र या कथा, 'काजळमाया' या कथासंग्रहातील दूत, विदूषक, ठिपका, रत्न, कळसूत्र, गुलाम या कथा, 'रमलखुणा' या कथासंग्रहातील सर्प, रक्तमुखी या कथा, 'पिंगळावेळ' मधील ऑर्फियस, यात्री या कथा त्यातील वाङ्मयीन व विलक्षण अर्थसंपृक्त जीवनदर्शक सामर्थ्याने विशेष स्मरणीय आहेत. 'नीती—अनीती, पाप—पुण्य, ज्ञान—अज्ञान, नास्तिक—आस्तिक, चारित्र्यसंपन्नता, भ्रष्टता, विश्वाच्या अफाट पसाऱ्यातील माणसाचे नगण्य स्थान इत्यादि तात्त्विक बाबींची त्यांनी आपल्या कथांत गुंफण केली. कथावस्तू फुलविणाऱ्याला हे विषय तसे उपयुक्त ठरणारे नाहीत. याचा परिणाम कथेची आकर्षकता, वाचनीयता

कमी होण्यातच व्हायचा. पण जी.एं.नी हे आव्हान स्वीकारले. तत्त्वज्ञानाच्या पातळीवरही सातत्याने आपले स्वत्व जोपासले. आशय–अभिव्यक्तीतील जोरकसपणाने कथेला समृद्ध करीत नेले.'[2]जी.एं.ची कथा निसर्गाची विविध रूपे, प्राणीसृष्टी, वनस्पती, अनेक घरातील स्त्रीपुरूष यांनी गजबजलेली आहे. कबुतर, माकड, म्हशी, डोळ्यातून पाणी गाळत प्राण सोडणारी कृष्णी गाय, अशुभाचे प्रतीक म्हणून एखादे घुबड, हडकुळी मांजर, मरगळलेले कुत्रे, मरायला टेकलेले करपटलेले घोडे, गाढव अशी विविध पशूपक्ष्यांची विविधता आहे. त्यांच्या कथेत निसर्गाचे सुंदर रूप पहायला मिळत असले तरी सर्व सुंदरतेची परिणती विरूपतेत होते. केवळ माणूस नाही तर ही संपूर्ण जीवसृष्टी अतर्क्य, कृर नियतीच्या हातचे खेळणे आहे ही भावना त्यांच्या कथा वाचताना सतत होते. स्थळ, काळ, परिस्थिती कथापरत्वे बदलणारी असली तरी ती क्रौर्य, भय, विवेकशून्यता यांनी आक्रसलेली असते. 'कृर माणसांचे किती विविध नमुने जी.एं.नी निर्माण केले आहेत पण बारकाईने पाहिले तर जाणवते की, हे सगळे खलपुरुष ही माणसे नाहीतच, तो निव्वळ निरनिराळे मुखवटे चढवलेला कृरपणाच आहे.'[3]जी.ए. आपल्या कथांतून दुःखाची सहस्त्र रूपे दाखवतात.त्यांच्या काही कथांमधून पौराणिक, ऐतिहासिक कालखंड दाखवताना अद्‌भूतता दिसते. मानवाची अपरिहार्य तगमग, त्याच्या वेदनाग्रस्त शोकांतिका हाच जी.एंच्या कथांचा मुख्य विषय राहिलेला आहे. नयनमनोहर निसर्गही येथे रौद्रभीषण रूप धारण करतो आणि मानवाच्या जीवनात निसर्ग किती उलथापालथ घडवून आणू शकतो हे पदोपदी जाणवते.

जी.एं.च्या बहुतांश कथा ते वास्तव्य करीत असलेल्या महाराष्ट्र व कर्नाटक यांच्या सीमेलगतच्या कमीअधिक लोकसंख्येच्या खेड्यांत घडते. मुंबईचा परिसरही कधी अपवादाने येतो. पण स्थळ कुठलेही असो मानवी दुःखे मात्र तितक्याच प्रकर्षाने कथांमध्ये उतरलेले दिसते. जी.एं.ना जीवनाविषयी एक आकस आहे, असे सारखे वाटत राहते. त्यांची प्रतीके ही कथेतील आशयघनतेशी एकरूप पावतात. ती प्रतीके वजा केल्यास कदाचित त्यांची कथा अळणी ठरेल. एक भयावहता, मने घुसमटून टाकण्याची किमया त्यात व्यापलेली आहे. त्यांची पात्रेही तशीच दुःखाने व्यापलेली, विषण्ण मनाने जगणारी अशी रंगवलेली आहेत. 'प्रदक्षिणा'मधील शांताक्का, 'भोवरे' मधीलरुक्मिणी, 'शेवटचे हिरवे पान'मधील सीताक्का, 'वंश'मधील कुरव्वा, 'अंजन'मधील मल्हारी, 'ठिपका'मधील गारुडी, 'यात्रिक'मधील डॉन, 'सोडवण'मधील फाटक, शालू या पात्रांची तडफड मनाचा थरकाप उडवणारी आहे. 'विशिष्ट मनोवृत्तीची माणसे त्यांच्या कथांत पुनःपुन्हा दिसतात. विशिष्ट अनुभवांचे दर्शन त्यांच्या कथांत पुनःपुन्हा घडते, हे खरे, पण जी.एं.ची कथा ही प्रतीकात्मक कथा आहे हे लक्षात घेतले तर ही जी.एं.ची वैगुण्ये वाटणार नाहीत.'[4]त्याचे मनोविश्लेषण सूक्ष्मतर पातळीवर जाते. त्यांना अवतीभवतीच्या दृश्य अदृश्य दुःखांचा संदर्भ असतो.

जी.ए. आणि खानोलकरांच्या कथांची तुलना केली तर त्या दोघांच्याही कथांमध्ये काही समान दुवे आढळतात. एकतर त्यांच्या कथा मध्यमवर्गीय पात्रांभोवती फिरत राहतात. त्यांची पात्रे नियतीच्या पुढे हतबल असतात. आपल्या विशिष्ट आवाक्यापलिकडे ती मजल मारू शकत नाहीत. त्यांची जगण्याची विशिष्ट दिशा ठरलेली आहे. त्यानुसार जगतानाच त्यांच्यातल्या वाईट प्रवृत्ती कशा दाबून ठेवलेल्या आहेत, पण संधी मिळताच त्या वाईट प्रवृत्ती कशा जोर धरून वर येतात, याचाही प्रत्यय येतो. मृत्यूचे या दोनही लेखकांना आकर्षण आहे. त्यांच्या कथांमधून सतत वेगवेगळ्या स्वरूपात मृत्यूचे दर्शन घडते. वास्तव जीवनातही त्यांचे मृत्यूविषयीचे आकर्षण लपून राहिलेले नाही. त्यांच्या कथांमधून दुःख इतक्या तीव्र स्वरूपात वाचकांसमोर येते, की कथेच्या शेवटी एक निराशा मनाला झाकोळून टाकते. पण त्यातुनही एक वेगळा अनुभव वाचकाला येतो. आणि प्रत्येक कथा वाचकाला खिळवून ठेवते. नवकथांच्या माध्यान्हात जरी या दोन्ही कथाकारांनी आपली कामगिरी दाखवलेली असली तरी, त्यांच्या कथांनी मराठी कथाविश्वात एक वेगळे वळण आणले हेही तितकेच खरे.

## निष्कर्ष :

1. नवकथा ही महायुद्धोत्तर काळातील बदलत्या जीवन जाणिवांच्या परिघातून निर्माण झाली.
2. नवकथेने कथानकाशिवायही नवकथा असू शकते, हे समीक्षकांना दाखवून दिले.

3. नव्या दमाच्या कथाकारांनी आपली कथा विवक्षित व्यक्तीभोवती न फिरविता समुहमनाच्या व्यापक चित्रणातून मानवी मनाची अनाकलनीयता शोधण्यात उपयोगात आणली.
4. खानोलकरांची कथा ही मध्यमवर्गियांच्या जीवनातील घटना, प्रपंचाचा काही भाग स्वीकारून अंकुरली, फुलली.
5. मराठी लघुकथेच्या क्षेत्रातील नवकथा कालखंडात गंभीर प्रवृत्तीच्या कथा लिहिणारे जी.ए. कुळकर्णी यांची कामगिरी लक्षणीय आहे.
6. मानवाची अपरिहार्य तगमग, त्याच्या वेदनाग्रस्त शोकांतिका हाच जी.एंच्या कथांचा मुख्य विषय राहिलेला आहेत.

## संदर्भ :


1. फडके, डॉ. भालचंद्र, 'कथाकार खानोलकर – निवेदन– वि. भा. देशपांडे, नूतन पुणे, प्रथमावृत्ती 1979, पृ. 39
2. चवरे, डॉ. रा.गो., नवकथेचा माध्यान्ह, 'मराठी कथा : प्रवृत्ती आणि प्रवाह', प्रथमावृत्ती, मराठी जनसाहित्य परिषद, अमरावती, 1995, पृ. 93
3. गाडगीळ, गंगाधर, 'आजकालचे साहित्यिक, उत्कर्ष प्रकाशन , पुणे , प्रथमावृत्ती 1980, पृ. 35
4. कुळकर्णी, डॉ.द.भि., 'सत्यकथा', डिसेंबर, 1967, पृ. 56


❖❖❖

# कवी इंद्रजित भालेराव यांच्या काव्यातील स्त्री

प्रा. रवींद्र डाखोरे
मराठी विभाग प्रमुख
गो.सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
चांदूर बाजार, जि. अमरावती, महाराष्ट्र, (India)
भ्रमणध्वनी ९४२१०००५५०

## सारांश

कवी इंद्रजित भालेराव यांची कविता स्त्री ही परंपरागत मानसिकतेच्या जोखडातून बाहेर पडत असल्याचा प्रवास दर्शविणारी आहे. जवळपास तीन दशकातील या काव्यप्रवासातून ग्रामीण स्त्रीची घुसमट, तिच्या जीवनातील संघर्ष, तिच्या मनातील घालमेल रेखाटत कवी इंद्रजित भालेराव यांनी काळाबरोबर बदलत गेलेली ग्रामीण स्त्री साकार केली आहे. ग्रामीण समाजरचनेत तिच्या सांस्कृतिक, सामाजिक बंधनाचा आढावा घेत ही कविता पुढे तिची विचारसरणी कशी बदलत आहे याचे चित्रण करते. ग्रामीण स्त्री जशी परावलंबी आहे तशीचती आत्मनिर्भरही आहे याची जाणीव ही कविता करून देते. कवीने आपल्या काव्यातून ग्रामीण स्त्री रेखाटताना ग्रामीण संस्कृतीचा आढावा घेतलेला दिसतो. या संस्कृतीतील विकृतीमुळे ग्रामीण स्त्री कशी भरडल्या जाते याचे विवेचन करणारी ही कविता ग्रामीण स्त्रियांचा जीवन प्रवास अधोरेखित करते.

## विषय विवेचन

कवी इंद्रजित भालेराव यांच्या काव्यप्रवासात ग्रामीण स्त्री जीवनाचे विविध रूपं दिसून येतात. कवीचे जीवन हे ग्रामीण भागात गेले आहे. त्यातील रूढी, प्रथा, परंपरा, लोककला, लोकगीते, ओवी या सर्वांचा प्रभाव त्यांच्या जीवनावर पर्यायाने त्यांच्या काव्यावर झालेला दिसून येतो. ग्रामीण जीवनाचा आढावा घेताना त्यांनी रेखाटलेली स्त्री ग्रामीण स्त्रीचे जीवन, तिचे अंतरंग व्यक्त करते. काळानुरूप गाव बदलत आहे त्यातील नाते संबंध बदलत आहे अशा अवस्थेत सर्वाधिक घालमेल ही स्त्रीची होते.कवी इंद्रजित भालेराव यांच्या जवळपास तीन दशकातील काव्यातून स्त्रीचे बदलत जाणारे स्वरूप समोर येते. त्यांची कविता ग्रामीण सामाजिक, सांस्कृतिक जीवनातील स्त्री कशी जगते, तिच्या मनातील घालमेल या सर्वांचा आढावा घेत समोर जाते. काळाबरोबर गाव बदलत गेले. आधुनिकीकरण, शहरीकरण यांचे वारे गावात शिरले. एकत्र कुटुंब पद्धतीची जागा विभक्त कुटुंब पद्धतीने घेतली आणि नात्यात दुरावा यायला लागला. स्त्री हे परक्या घरचे धन या मानसिकतेतील ग्रामीण रचना आणि त्यातून सासरी गेलेली मुलगी कशी भरडल्या जाते या चित्रणातून कवीने स्त्रीची अगतिकता चित्रित केली आहे.

माझं तुटलं माहेर
सखखे भाऊ पक्के वैरी
थाटल्यात आंबराया
माझी नाही एक कैरी[१]

अशा शब्दांतून ग्रामीण स्त्रीची व्यथा कवी व्यक्त करतात. कवीच्या काव्यात स्त्रियांद्वारे ग्रामीण प्रथा, परंपरांचा परामर्श विपूल प्रमाणात घेतलेला दिसतो. कवी इंद्रजित भालेराव यांचे काव्य मराठवाड्याच्या लोकसाहित्याचे उत्कृष्ट संकलन आहे आणि ते लोकसाहित्याच्या अभ्यासकाला उत्तम संदर्भ म्हणून महत्वपूर्ण ठरू शकते. कवीच्या काव्यातील स्त्री ही परंपरागत मनोवृत्ती जोपासणारी, कौटुंबिक जबाबदारी पेलत, घुसमटीत जगणारी दिसते. कुळंबीणीची कहाणी ही दीर्घ कविता १९९८ मध्ये प्रकाशित झाली. कवीच्या पीकपाणी या पहिल्या काव्यसंग्रहात शेवटी एक दीर्घ कविता आहे. त्यातूनच प्रेरणा घेत ही दीर्घ कविता निर्माण झाली आहे. कवी मनाच्या संवेदनशील माणसाला आपल्या ग्रामजीवनाचा विस्तृत आलेख मांडण्यासाठी हा काव्यप्रकार उत्तम ठरतो. कवी इंद्रजित भालेराव यांनी यातून एका स्त्रीची व्यथा मांडलेली आहे. ही स्त्री व्यथा प्रातिनिधीक स्वरूपाची असून सर्व ग्राम स्त्रीचे मनोगत ते आहे. पुरूषप्रधान संस्कृतीत स्त्रीची होणारी घुसमट, तिची होणारी अवहेलना अशा सर्व बाबी रेखाटताना गावातील मानसिकता, लोकसंकेत, रूढी, परंपरा या सर्वांतून कवीने ग्रामसंस्कृती व त्यातील स्त्री असा विषय मांडलेला दिसतो.'एक पोक्त ग्रामीण स्त्री, आपल्या सुनेला खास मराठवाडी बोलीतून ओवीरूपात आपल्या

जिंदगीची कहानी सांगत आहे तीच ती कुळंबीणीची कहाणी साहित्यात सुख – दु:ख तीच असली तरी ती सारी कथन करण्यात एक आगळा ओडवा असतो, जिव्हाळा,आर्तता असते. त्यात कुठे नटवेपण, सुशोभन असत नाही. अशा कवींना प्रासादिकता वश असते. जिव्हारीचे हितगूज, ओल – कढ आपोआप शब्द फुलांनी उमलून येतात. भालेरावांच्या या कहानीत हा प्रत्यय ठायीठायी येतो''[२]या दीर्घकाव्यातून येणारी कहानी ही व्यथा वेदनेची आहे. स्त्रीच्या सोशिकतेची आहे. पारंपरिक लोकगीतात असलेल्या जात्यावरील ओवीतून स्त्रिया आपल्या भावनेला वाट मोकळी करून देतात. त्याचप्रमाणे आपल्या मनातील शब्दांना सुनेला सांगून भावभावनांचे विरेचन यात केले आहे. एक सासू आपल्या जीवनाची व्यथा सुनेला सांगते आणि त्यातून तिच्या जीवनाची वाताहत समोर येते. तिचा जन्म झाला तेव्हा कोणालाच आनंद झाला नव्हता, मुलीचा जन्म हा तेही पाचव्यांदा कुणालाच आनंद देणारा नव्हता. आजही मुलीला नकोशी म्हणत टाकून दिले जाते किंवा मारून टाकले जाते. या पुरूषी मानसिकतेत स्त्रीसुद्धा अडकलेली आहे. एक स्त्री असून तिलाही मुलीचा जन्म झाल्याचा आनंद होत नाही.

म्हया जल्माचा आनंद
नही कोणालाच झाला
एक पहार उशिरा
सूर्य आभाळात आला[३]

कवीच्या कवितेत ग्रामीण स्त्रीचा परामर्श हा तिच्या घुसमटीच्या स्वरूपात जास्त दिसतो. आपल्या परंपरागत समाजरचनेत स्त्री ही शारीरिक,मानसिक गुलामीत जगताना दिसते. तिला स्वमत किंवा मतानुसार जगणे माहीतच नसते. परंपरेचे,प्रथेचे जोखड तिच्यावर नेहती असलेले दिसते. अशा अवस्थेतील स्त्री कवीच्या लेखणीतून अवतरते. कवीचे जीवन खेड्यात गेलेले आहे आणि या जीवनप्रणालीतील स्त्रियांचे जीवन, त्यांची चाकोरीबद्ध जीवन प्रणाली, त्यातील घुसमट त्यांनी बघितली आहे, अनुभवली आहे. स्त्रीमनाचा आक्रोश त्यांच्या शब्दांतून व्यक्त होतो.

आपल्याचं घरातील स्त्रियांचे दु:ख, त्यांची अगतिकता त्यांनी पाहली होती.घरातील वादाचा, कलहाचे वर्णन करताना त्यांच्या मनावर होत असलेला परिणाम यातून दिसून येतो. तसेच अशा काव्यातून यातून ग्राम मानसिकता दिसून येते, पुरूषी मानसिकतेच्या घुसमटीत राहणारी स्त्री यातून दिसून येते. गाव सोडून नाचणारी निघाली तेव्हा तिचे घुंगरू आठवण म्हणून ठेवले हे बघून वहिणी घर सोडून निघून गेली. जो पर्यंत घुंगरू फेकणार नाही तो पर्यंत वापस येणार नाही ही वहिणीची अट होती. एका परस्त्रीसाठी संसार उद्ध्वस्त करायला निघालेला पुरूष आणि त्याच्या अशा वागणुकीमुळे घरातून जाणारी अबला स्त्री रेखाटून कवीने पुरूषी मानसिकतेमुळे निर्माण होत असलेल्या व्यथा वेदनेला साकार केले आहे. अंघोळीच्या पाण्यावरून कावळा उडाला म्हणून आजीला मारणारा आजोबा अशा विविध आठवणीतून कवीने तत्कालीन परिस्थितीतील ग्राम मानसिकता साकार केली आहे. पारंपरिक रितीरीवाजातील अडकलेली स्त्री, त्यातून तिची होत असलेली घुसमट चित्रीत करत कवीने ग्रामीण जीवनातील संस्कृतीचे वास्तव रूप साकार केले आहे. ग्रामीण भागातील विचारसरणीच्या बदिस्त वातावरणात स्त्री बांधल्या गेली आणि म्हणूनच आंघोळीच्या पाण्यावरून कावळा उडत गेला म्हणून आजीला मारणारा म्हातारा जेव्हा कवितेत येतो तेव्हा परंपरागत विचाारसरणीत जगणे किती अवघड आहे हे लक्षात येते.

अशा ग्रामीण मानसिकता रेखाटून त्यांनी परंपरागत गावातील पुरूषी मानसिकता दाखवत स्त्रीवर होत असलेल्या अत्याचाराला वाचा फोडली आहे. कवीच्या कवितेत येणारी स्त्री ही अगतिक, असहाय जास्त प्रमाणात दिसते. जे बघितलं तेच कवीने मांडले आहे. ग्रामीण भागातील बंदिस्त स्त्रीच्या जीवनाचा आढावाच कवी घेत आहे असे वाटते.त्यांच्या कवितेत येणारी स्त्री ही संघर्षच करताना दिसते. कधी आपल्या गरिबीसोबत तर कधी घरातीलच मानसिकतेसोबत, अशा कष्टकरी स्त्रीचे चित्रण कवीच्या कवितेत येते. त्यांच्या कवितेत गरिबीत न खचता आपल्या संसाराचा गाडा ओढण्यासाठी अपार कष्ट करत राहणाऱ्या स्त्रीचे वर्णन दिसते.

काट्याकुट्यातून ढेकळाधस्कटातून
ती फिरत असते रानोमाळ
फक्त चुलच नसते पेटवायची
तिला पेटवायचा असतो जिनगाणीचा जाळ[५]

स्त्रियांच्या कष्टी जीवनाचे, मनातल्य मनात कुढत राहणाऱ्या जीवनाची व्यथा यात दिसते. कवीने लहानपणीपासून जे स्त्री जीवन बघितले त्यामध्ये पुरूषी अहंकाराने, पुरूष प्रधान समाज व्यवस्थेने भरडल्या गेलेल्या स्त्रीचे आहे. त्याची जाणीव त्यांच्या मनात आहे व ती शब्दरूपाने बाहेर आलेली दिसते. आईची महती अनेक कवीने गायली आहे. ग्रामीण भागातील माय अनेक कवींच्या काव्याचा विषय झालेला दिसतो. इंद्रजित भालेराव यांनीही

मायची महती आपल्या काव्यातून व्यक्त केली आहे. आईचे महात्म्य हे शब्दांपलीकडचे आहे. आई फक्त देणे माहीत असलेली वात्सल्यमूर्ती असते. अशा आईचे कष्ट, तिचे मायाळू रूप कवीने अनुभवले व तेच शब्दांतून मांडले आहे.

कवीच्या काव्यात आलेली ग्रामीण स्त्री कालानुरूप कशी बदलत आले याचा आढावा ही कविता घेते. त्यांची कविता ग्रामीण स्त्री जीवनाचे विस्तृत अवलोकन करते. त्यांच्या काव्यात स्त्रियांच्या संदर्भात येणारे अनुभव वास्तव आहे. परंपरागत विचारसरणीचा पगडा असलेल्या पुरूषी मानसिकतेच्या समाजरचनेतून हळूहळू स्त्री बाहेर येत असल्याची चाहूल ही कविता करून देते. कवीने ग्रामीण स्त्रीचा सर्वांगीण आढावा घेत तिच्या मनाचा वेध घेतला आहे.

## निष्कर्ष

१. कवी इंद्रजित भालेराव यांच्या काव्यातील स्त्री ही परंपरागत विचारसरणीतील आहे परंतु काळाबरोबर ती बदलत असल्याची जाणीव ही कविता करून देते.

२. स्वयंपूर्णता हा गुणधर्म असलेली स्त्री या काव्यात दिसते. तिच्यात कोणत्याही प्रसंगात उभे राहण्याची ताकत दिसते. कवीच्या कवितेतील स्त्री ही प्रसंगानुरूप वागण्यास सक्षम असलेली आहे. काळाबरोबर होत असलेला बदल स्वीकारत ती बदलत असल्याचे जाणवते.

३. कवी इंद्रजित भालेराव यांच्या काव्यातील स्त्री परंपरागत लोककला, बोलीतील शब्द, वाक्प्रचार, म्हणी, लोकसंकेत, रूढी, परंपरा घेऊन येते. लोकसाहित्याची ओळख या स्त्री चित्रणातून होते.

## संदर्भ

१. भालेराव इंद्रजित,पीकपाणी, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, आवृत्ती चौथी, २००१, पान २७
२. भालेराव इंद्रजित, कुळंबिणीची कहाणी, प्रतिभास प्रकाशन,परभणी आवृत्ती प्रथम, १९९६, (मलपृष्ठ)
३. भालेराव इंद्रजित, कुळंबिणीची कहाणी, प्रतिभास प्रकाशन, परभणी, आवृत्ती प्रथम, १९९६, पान ५४
४. गावाकडं, इंद्रजित भालेराव,मनोविकास प्रकाशन पुणे,आवृत्ती दुसरी २०१४, पान १०

## संदर्भ ग्रंथ

१. ग्रामीण साहित्य:चिंतन आणि चर्चा, डॉ. वासुदेव मुलाटे, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती दुसरी, २०१०
२. कोतापल्ले नागनाथ, इंद्रजित भालेराव यांची कविता, मारोती घुगे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, २००९

❖❖❖

# निरंजन माहूर
# यवतमाळ जिल्ह्यातील एक दुर्लक्षित पर्यटन तीर्थक्षेत्र

प्रा. एन. व्ही. नरूले
भूगोल विभाग प्रमुख
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ, महाराष्ट्र (India)
Mail Id – narulenilkantha3@gmail.com संपर्क क्र. ९९२३९०९२९६

## सारांश –

यवतमाळ जिल्हा कृषीप्रधान म्हणून ओळखला जातो. हा जिल्हा कापूस शेतीसाठी महाराष्ट्रात प्रसिध्द आहे. संपूर्ण जिल्हयात पारंपारिक तसेच आधुनिक पध्दतीने शेती केली जाते. गहू, ज्वारी, कापूस, सोयाबीन, तुरी, शेंगदाने, कांदे, भाजीपाला, ई. प्रकारचे पिके घेतली जाते. शेती बरोबर शेतीवर आधारीत विविध प्रकारची कारखानदारी कमी प्रमाणात विकसित झाली आहे. याच बरोबर पर्यटन क्षेत्रात चांगल्या व नविन स्थळांचा विकास होत आहे. त्यात निरंजन माहूर पर्यटन क्षेत्र म्हणून विकसित होण्याच्या दृष्टीने हा विषय घेतला आहे.

या शोधनिबंधात निरंजन माहूर यवतमाळ जिल्हयातील एक दुर्लक्षित पर्यटन तिर्थक्षेत्र म्हणून विकासाच्या समस्या व उपाययोजना यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. सदरच्या शोधनिबंधासाठी आवश्यक असणारी आकडेवारी दत्तापूर ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय, निरंजन माहूर मंदिर देवस्थान संस्था दत्तापूर, यांचे निरीक्षण करुन संकलित करण्यात आली आहे. तसेच या परिसरातील श्री. चिंतामणी मंदिर देवस्थान संस्था कळंब, श्री. हनुमंत मंदिर रिठ (पार्डी) कोठा, श्री. खटेश्वर महाराज संस्था खटेश्वर, पर्यटन तिर्थक्षेत्रांची सुध्दा माहिती संकलीत केली आहे. आधुनिक युगात मानवी मनाला संस्कार करणाऱ्या विचारांची गरज आहे, ही गरज पूर्ण होवू शकते. महाराष्ट्रातील थोर संतानी सांगितलेल्या मार्गाचा अवलंब केला तरच त्यासाठी त्यांनी लिहलेले अभंग, ओव्या, भजन, किर्तन, प्रवचन, ग्रंथवाचन, पारायण व भगवंताचे नामस्मरण केल्याने सामान्य माणसांच्या मनात भक्तीभाव निर्माण होण्यास मदत होते.

बीजसंज्ञा – तिर्थक्षेत्र, नामस्मरण, पर्यटन, पर्यटन विकास

## प्रस्तावना –

पर्यटन व्यवसाय हा एक जागतिक स्तरावरील महत्वाचा आर्थिक व्यवसाय म्हणून उदयास आला आहे. पर्यटन व्यवसायाव्दारे आज मोठया प्रमाणावर परकिय चलन उपलब्ध होत आहे. तसेच मोठया प्रमाणावर रोजगार निर्मिती होत आहे. भारतात पर्यटन व्यवसायाच्या विकासाची मोठी संभाव्यता आहे, पंरतु आजही भारतातील अनेक पर्यटन क्षेत्रे विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर आहे.

महाराष्ट्रातील यवतमाळ जिल्हयातील अनेक पर्यटन क्षेत्रे पर्यटन व्यवसायाच्या विकासाच्या दृष्टिने उत्तम संभाव्यता असलेले आहे. यवतमाळ जिल्हयामध्ये अनेक प्रकारची पर्यटन क्षेत्रे आहेत. पंरतु ही अजूनही दूर्लक्षित आहेत. अशाच दूर्लक्षित पर्यटन स्थळापैकी एक म्हणजे कळंब तालुक्यातील निरंजन माहूर होय.

निरंजन माहूर एक प्राचीन, धार्मिक इतिहास लाभलेले गाव असून कळंब ते जोडमोहा या आंतर तालूका मार्गावर कळंब पासून ६ किमी. तर यवतमाळ पासून ३० किमी. अंतरावर आहे. महाराष्ट्रातील ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेल्या दत्तपंथी तिर्थक्षेत्रापैकी निरंजन माहूर हे एक प्राचीन धर्मक्षेत्र आहे म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात तसेच तेलंगणा व छत्तिसगड राज्यातील सिमावर्ती प्रदेशात ओळख आहे.

प्रस्तुत शोधनिबंधाव्दारे निरंजन माहूर या दूर्लक्षित परंतु महत्वाच्या पर्यटन स्थळांचा अभ्यास करणे तसेच निरंजन माहूर परीसरातील अन्य पर्यटन तिर्थक्षेत्रांचा अभ्यास करणे हा प्रमुख उद्देश आहे.

## उद्दिष्टे –

प्रस्तुत शोध निबंधासाठी यवतमाळ जिल्हयातील कळंब तालुक्यातील निरंजन माहूर व परीसरातील पर्यटन स्थळांचा अभ्यास खालील उदिष्टांना अनुसरुन केलेला आहे.

१) दत्तपूर गावातील निरंजन माहूर या दुर्लक्षित पर्यटन स्थळाचा अभ्यास करणे.
२) दत्तपूर गावातील निरंजन माहूर येथिल संभाव्य पर्यटन विकासाचा अभ्यास करणे.
३) दत्तपूर गावातील निरंजन माहूर व परिसरातील पर्यटन स्थळांच्या समस्यांचा शोध घेणे.
४) दत्तपूर गावातील निरंजन माहूर व परिसरातील पर्यटन स्थळांच्या विकासासाठी उपाय सुचविणे.

कळंब तालुक्यातील दत्तपूर (निरंजन माहूर)




## अभ्यासक्षेत्र:—

यवतमाळ जिल्हयातील कळंब तालुक्यातील दत्तपूर/निरंजन माहूर हे एक धार्मिक ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेले गाव आहे. निरंजन माहूर हे यवतमाळ—कळंब—जोडमोहा मार्गावरील कळंब पासून ६ किमी. अंतरावर तसेच यवतमाळ—जोडमोहा या ठिकाणापासून ३२ किमी. अंतरावर आहे. दत्तपूर/निरंजन माहूरचे एकूण क्षेत्रफळ १२८४.६२ चौमी. असून २०° २०' २३ '' उत्तर अक्षवृत्त व ७८° १७' २२ '' पूर्व रेखावृत्तावर आहे. निरंजन माहूरच्या उत्तरेला कळंब हे तालुक्याचे गाव असून दक्षिणेला जोडमोहा हे गाव व घांटजी तालुका आहे. २०११ च्या जनगणनेनुसार दत्तपूर/निरंजन माहूरची एकूण लोकसंख्या ५०६ इतकी होती, सध्या ती ७५९ च्या जवळपास आहे. निरंजन माहूर हे कळंब तालुक्यातील धार्मिक तिर्थक्षेत्र म्हणून प्रसिध्द आहे.

## माहिती स्त्रोत:—

प्रस्तुत शोधनिबंध प्राथमिक आणि व्दितीयक स्वरुपाच्या माहितीवर आधारलेला आहे. गावातील लोकांशी प्रत्यक्षात भेट घेवून काही माहिती प्राप्त झाली आहे. शिवाय ग्रामपंचायत दत्तपूर/निरंजन माहूर, यवतमाळ गॅझेटियर, स्थानिक पातळीवरील प्रकाशित छोटया पुस्तिका तसेच वर्तमान पत्रातून प्रकाशित माहितींचा आधार घेतला आहे.

## विषयविवेचन:—

यवतमाळ जिल्हयात कळंब तालुक्याच्या उत्तर मध्य भागात काही गावे धार्मिक दृष्टया महत्वाचे आहे. त्यात श्री. चिंतामणी मंदिर देवस्थान संस्था, कळंब, श्री. निरंजन माहूर संस्था, दत्तापूर, श्री. हनुमंत मंदिर रिठ (पार्डी) कोठा, श्री. खटेश्वर महाराज संस्था, खटेश्वर यांचा समावेश होतो. श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब पासून अवघ्या ५ कि. मी. अंतरावर दत्तापूर या गावी असलेले श्री क्षेत्र निरंजन माहूर श्री दत्त सदगुरुचे एक ठिकाण आहे. चारही बाजूने डोंगर रांगानी वेढलेले, जवळच एक तलाव असून तेथिल दृश्य मनोहारी स्वरुपाचे दिसून येते. अशी आख्यायिका आहे की श्री दत्त सदगुरु आपल्या प्रवासात या ठिकाणी वास्तव्याला होते. त्यामुळेच या ठिकाणाला निरंजन माहूर म्हणून प्रसिध्दी मिळाली. यवतमाळ जिल्हयातून तसेच आदिलाबाद, नांदेड, चंद्रपूर, नागपूर, वर्धा या शेजारी जिल्हयातूनही मोठया प्रमाणावर दर्शनासाठी भक्त येतात. दरवर्षी दत्त जयंतीला छोटीशी यात्रा भरते ती दोन ते तिन दिवस चालते, दर पोर्णिमेला दर्शनासाठी भक्त येतात भजन, किर्तन, करतात, दुस—या दिवशी प्रसाद स्वरुपात अन्नदान करतात. यासाठीच इथे वेगवेगळया महंतांचे मठ स्थापन करण्यात आलेले आहेत.

## निरंजन माहूर परिसरातील भक्ती स्थळे:—

### १) श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब:—

श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब हे यवतमाळ पासून पूर्व दिशेला २२.५ कि.मी. अंतरावर वर्धेपासून पश्चिमेकडे ४५ कि.मी. अंतरावर असून यवतमाळ ते नागपूर रोडवर असल्यामुळे सतत बसेस सुरु असतात. तसेच टॅक्सी, खाजगी बसेस, मोटारगाडी चालतात. श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब हे परीसरातील सर्वात मोठे गाव असून तालुक्याचे ठिकाण आहे. त्यामुळे परीसरातील कोठा, वेणी, पार्डी, हिवरादरणे, दोनोडा, मानकापूर, कामठवाडा, डोंगरखर्डा, जोडमोहा, मेटिखेडा, कात्री, तिरझडा, पिंपळगाव, धोत्रा, उमरी, सावरगाव, चिंचोली ई. गावांना शाळा, कॉलेज, बॅक, आठवडी बाजार, पोलिस स्टेशन, पोस्ट ऑफिस, दवाखाने, पंचायत समिती, तहसिल कार्यालय, आय.टी.आय., एस. टी. बस यासाठी जोडले गेले आहे. या सर्व गावांवर श्री. चिंतामणी च्या श्रध्दास्थानांचा फार मोठा प्रभाव आहे. गावाच्या पूर्वे कडून जवळपास ११ कि.मी. अंतरावरुन वर्धा नदी वाहते, आणि वर्धेची उपनदी चक्रावती ही उत्तर वाहिणी असून तिच्या काठावर कळंब गाव वसलेले आहे. त्यामुळे सोयाबीन, कापूस, तुर, ज्वारी, भाजीपाला, व संत्रा पिकाचे क्षेत्र जास्त आहे, म्हणजेच शेतीप्रधान प्रदेश असल्यामुळे उन्हाळयात देखिल या परिसरातील हवामान थोडे सौम्य स्वरुपाचे दिसून येते.

चक्रावतीच्या तीरावर श्री. गृत्समद ॠषींच्या पावन स्पर्शाने व धार्मिक कार्यातून श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब गांव यवतमाळ जिल्हयाबरोबरच संपूर्ण विदर्भ व महाराष्ट्रातील जिल्हयापर्यंत परिचीत आहे. प्राचिन मंदिराच्या वारसापैकी एक श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब आहे. श्री. चिंतामणी देवस्थान ट्रस्ट अनेक वर्षापासून स्थापन असून ट्रस्टींच्या माध्यमातून विकसीत केले आहे. कळंब मध्ये श्री. चिंतामणीचे मंदिर हे फार प्राचिन असून ते जमिनीच्या खाली ३३ फूट खोल आहे. भारतातील २१ गणपतीपैकी एक श्री. चिंतामणीचे मंदिर असून गणपतीचे एकमेव दक्षिणमुखी मंदिर आहे. येथे प्रसिध्द गणेशकुंड देखील आहे, दर बारा वर्षानी गंगा अवतरते अशी आख्यायिका आहे. यवतमाळ जिल्हयात तसेच कळंब तालुक्यात शाळा, दुकाने, ट्रॅव्हल्स कंपनी, श्री. चिंतामणीच्या नावाने चालविली जातात. दर चर्तुथीला भाविकांच्या दर्शनासाठी रांगाच्या रांगा लागतात, त्याचप्रमाणे दरवर्षी फेब्रुवारी महिण्यात गणेश जंयतीला श्री. चिंतामणी जन्मोत्सव साजरा करण्यात येतो. या जन्मोत्सवा निमित्त होमहवन, पूजा, धार्मिक कार्यक्रम, प्रवचन, किर्तन, काला, शोभायात्रा, दहिहांडी व महाप्रसादाच्या कार्यक्रमाचे आयोजन मोठया प्रमाणात केले जाते. हा उत्सव जवळपास पंधरा ते विस दिवस चालतो, एकप्रकारे यात्रेचे स्वरुप प्राप्त होते, दुरदुर गावांवरुन, जिल्हयातून भक्तगण, लोक दर्शनासाठी येतात. या यात्रेच्या निमित्ताने श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब येथे २५ ते ३० हजारापेक्षाही जास्त लोक सामिल होतात. याशिवाय वर्षभर धार्मिक संस्काराचे कार्यक्रम होतच असतात, ट्रस्टच्या वतीने भक्तनिवासाचे बांधकाम सुरु केलले आहे.

### २) श्री खटेश्वर महाराज देवस्थान:—

श्री क्षेत्र चिंतामणी कळंब पासून दक्षिणेकडे साधारणपणे २२ कि. मी. व जोडमोहा या गावांपासून २ कि.मी. अंतरावर श्री खटेश्वर महाराज देवस्थान आहे. हे ठिकाणही डोंगर रांगानी वेढलेले, जवळच एक तलाव असून तेथिल दृश्य नयनरम्य स्वरुपाचे दिसून येते. इथे कार्तिक पोर्णिमेला मोठी यात्रा भरते, दूरदूरवरुन भाविक भक्त दर्शनासाठी येतात, स्वंयपाक करुन अन्नदान करतात.

### ३) श्री हनुमान मंदिर (रिठाचा मारोती) पार्डी (कोठा):—

श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब पासून उत्तरेकडे बाभूळगांवला जातांना साधारणपणे ८ कि. मी. अंतरावर श्री. हनुमान मंदिर (रिठाचा मारोती) देवस्थान आहे. हे एक जागृत देवस्थान असून या मंदिराची स्थापना ३० वर्षापूर्वी श्री. धोटे महाराजांनी केली. इथेही भाविक भक्त दर्शनासाठी व वनौषधी घेण्यासाठी दूरदूरवरुन येतात. कोजागिरी पोर्णिमेला दूरदूरवरुन भाविक भक्त रात्रभर मुककामी राहून औषधीयुक्त दुधाचा आस्वाद घेतात.

## निरंजन माहूर परिसरातील उपलब्ध सुविधा —

वाहतुक — १) रस्ते वाहतुक —

श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब हे नागपूर—तुळजापूर राज्यमार्ग क्रमांक २३६ वर वसलेले आहे. नागपूर ते यवतमाळ व यवतमाळ ते नागपूर अर्ध्या — अर्ध्या तासाला एस. टी. बसेस चालतात. श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब वरुन रस्ते मार्गाने महाराष्ट्रात कुठेही जाता येते.

२) रेल्वे —

मुंबई — नागपूर या लोहमार्गावर धामणगांव स्टेशन असून धामणगांव ते श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब अंतर ४० कि.मी. आहे. तसेच मुंबई — नागपूर या लोहमार्गावर वर्धा स्टेशन असून वर्धा ते श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब अंतर ४५ कि.मी. आहे.

निवास व्यवस्था —

निरंजन माहूर व  श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब येथे येणा—या भाविकांसाठी निवासाची व्यवस्था सध्या कमी प्रमाणात आहे. परंतु श्री. क्षेत्र चिंतामणी देवस्थान ट्रस्ट च्या वतीने भव्य असे भक्त निवासाचे बांधकाम पुर्णत्वास येण्याच्या मार्गावर आहे. उदा. शिर्डी, शेगांव, नांदेड या ठिकाणी येणा—या भाविकांना राहण्याची व भोजनाची चांगली व्यवस्था असल्याने पर्यटक व भाविक मोठया संख्येने वर्षभर राहतात. पुढील एका वर्षात श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब येथेही येणा—या भाविकांना राहण्याची व भोजनाची चांगली व्यवस्था प्राप्त होईल.

## निरंजन माहूर पर्यटन केंद्र म्हणून विकासासाठी करावयाचे उपाय:—

चिंतामुक्ती केंद्र सुरु करावे —

निरंजन माहूर येथे वर्षभर हजारो भाविक दर्शनासाठी येतात, वास्तव्याला राहतात, तेंव्हा शेगावच्या धर्तीवर आनंदसागर सारखे एखादे परंतु छोटया स्वरुपाचे ध्यानकेंद्र, बगिचा, छोटया मुलांसाठी प्लेपार्क ई. अनेक गोष्टीने सुसज्य असे चिंतामुक्ती केंद्र सुरु करावे. यामुळे पर्यटनाला चालना मिळेल व उत्पन्न वाढून पर्यटन केंद्र विकसित होण्यास मदतच होईल.

बोटिंग सुरु करावी —

श्री क्षेत्र चिंतामणी कळंब पासून अवघ्या ६ कि.मी. अंतरावर दत्तापूर या गावी असलेले श्री क्षेत्र निरंजन माहूर श्री दत्त सदगुरुचे एक ठिकाण आहे. चारही बाजूने डोंगर रांगानी वेढलेले, जवळच एक तलाव असून तेथिल दृश्य मनोहारी स्वरुपाचे दिसून येते. त्याला दततापूर चा तलाव असे म्हणतात. इथे एक बंधारा बांधलेला आहे, येथिल साठलेल्या पाण्यावर बोटिंगची सोय करुन शासनाची परवानगी घेऊन अनुभवी ठेकेदारांकडून बोटिंगसाठी व्यवस्था केल्यास येणारे पर्यटक यांना बोटिंगचा अनुभव नक्कीच चांगला राहील. यामुळे परिसरातील शालेय विद्यार्थी यांचे सहलींचे प्रमाण वाढेल. यामुळे पर्यटनाला चालना मिळेल व उत्पन्न वाढून पर्यटन केंद्र विकसित होण्यास मदत होईल.

रेल्वे मार्ग लवकर निर्माण व्हावा —

निरंजन माहूर व श्री क्षेत्र चिंतामणी कळंब वरुन सध्यातरी रस्ते मार्गाने महाराष्ट्रात कुठेही प्रवास करता येतो. परंतु रेल्वे मार्गाचा विकास न झाल्यामुळे पर्यटन केंद्र म्हणून मोठया प्रमाणावर विकसित झालेले नाही. त्याचसाठी सेवाग्राम(वर्धा)—कळंब—यवतमाळ—दिग्रस—पुसद—उमरखेड—नांदेड हा नियोजित रेल्वे प्रकल्प लवकरात लवकर सुरु झाल्यास वाहतुकीची कोंडी कमी होईल. कमी अंतराचा व वेळेचा एक मार्ग तयार होऊन त्याचा लाभ श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब या पर्यटन क्षेत्रास होऊ शकतो.

भक्त निवास लवकर निर्माण करावे —

निरंजन माहूर व श्री क्षेत्र चिंतामणी कळंबला येणा—या लांबच्या भक्तांसाठी, त्यांना वास्तव्यासाठी भक्तनिवास आवश्यक आहे. त्याचे निर्माण होऊ घातलेले आहे, ते लवकरात लवकर भक्तांसाठी राहण्यास चालू करावे.यामुळे पर्यटनाला चालना मिळेल व उत्पन्न वाढून पर्यटन केंद्र विकसित होण्यास मदतच होईल.

चक्रावती नदीचे सौंदर्यीकरण –

श्री क्षेत्र चिंतामणी कळंब गावातून मधोमध चक्रावती नदी ही उत्तरवाहीनी बनून वाहते. या नदीला नेहमी स्वच्छ ठेऊन तीची खोली कायम ठेवण्याचा प्रयत्न झाला पाहिजे, म्हणजेच पाण्याची पातळी टिकून राहिल. तसेच नदीच्या दोन्ही तिरावर वृक्ष लावून सौंदर्यीकरण करुन सुशोभिकरण करण्यावर भर दिल्यास पर्यटनाला चालना मिळेल व उत्पन्न वाढून पर्यटन केंद्र विकसीत होण्यास मदतच होईल.

## निष्कर्ष –

१) निरंजन माहूर पर्यटन केंद्र म्हणून विकसीत केल्यास कळंब तालुक्यातील व यवतमाळ जिल्हयातील एक चांगले तिर्थक्षेत्र व पर्यटन क्षेत्र म्हणून विकास होण्यास वरील उपाययोजना अस्तीत्वात आणल्या जाव्यात.

२) निरंजन माहूर पर्यटन केंद्र म्हणून विकसीत केल्यास पर्यटन व्यवसायातून गांव व परीसरातील नागरीकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. उदा. हॉटेल, वाहतूक व्यवसाय.

३) पर्यटक व भाविकांसाठी चांगल्या प्रकारचे भक्त निवास व भोजन व्यवस्था करण्यात यावी.

४) भक्तांसाठी स्नानगृह व शौचालय व्यवस्था करण्यात यावी.

५) निरंजन माहूर येंथिल तलावाचे सुशोभिकरण करावे. लाईटची व्यवस्था करण्यात यावी.

६) शुध्द व स्वच्छ पाणी पुरवठयाची व्यवस्था करावी.

७) विविध ठिकाणांची माहिती देणारे बोर्ड तयार करावे. त्यातून भाविकांना व पर्यटकांना चांगली माहिती मिळेल.

८) यात्रेच्या वेळी ठिकठिकाणी स्वच्छतेचे बोर्ड लावावे जेणेकरुन मंदिर परीसर स्वच्छ व सुंदर राहील.

९) अधिक चांगल्या योजनांसाठी शासकीय पातळीवर पाठपुरावा करण्यात यावा.

## संदर्भ ग्रंथ –

१. प्रा. सांवत व्ही. एम. –(२०११) कुंडल सांगली जिल्हयातील एक दुर्लक्षित पर्यटन स्थळ, मभूप संशोधन पत्रिका खंड २८, अंक–१ पृष्ठ ४९ते५२.
२. ग्रामपंचायत दत्तपूर/निरंजन माहूर अहवाल.
३. यवतमाळ गॅझेटियर,
४. श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब, नगरपंचायत अहवाल.
५. दैनिक सकाळ–यवतमाळ २१एप्रिल २०२१.

❖❖❖

# अण्णा भाऊ साठे यांची कथा

प्रा.डॉ. मिलिंद कांबळे
विद्या विकास महाविद्यालय
समुद्रपूर, जि. वर्धा, महाराष्ट्र (India)
Email: milindkamble777@gmail.com मो. नं. ९७६५७३८८३२

## प्रस्तावना :—

महाराष्ट्राच्या वाङ्मयीन, सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रात अण्णा भाऊ साठे यांचे नाव आज स्थीर झाले आहे. जणूकाही आज अण्णाभाऊ तळागळातल्या, विशेषतः मातंग समाजासाठी प्रेणा बनली आहे. काळ झपाटयानं बदलत आहे. मानवी मुल्यसुध्दा झापाटल्यासारखी बदलत आहेत. अश्या या काळात अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य माणसाला जगण्याचे आत्मभान आणून देत आहे. असे म्हणले तर वावगे ठरणार नाही. कथा, कविता, कादंबरी, नाटक आणि प्रवासवर्णन इत्यादी साहित्य प्रकार त्यांनी लिहिले, हे लिहित असतांना त्यांना अनेक दिव्यातून अनेक संघर्षातून जावे लागले याची प्रचिती आपल्याला त्यांचे संमग्र साहित्य आणि जीवन चरित्र वाचतांना कळेल गावकुसाबाहेर राहुन कुठलीच वाङ्मयीन परंपरा नसतांना, कुठलेच शिक्षण नसतांना, कुठलीच संस्कृती नसतांना आणि कुठलाच वारसा नसतांना त्यांनी अफाट जीवनाचावेध आणि माणसाच्या दु:खाचा शोध घेणारे साहित्य लिहिले हे आज कोणालाही नाकारता येणार नाही. एक काळ असा होता अण्णाभाऊ साठे सांच्या साहित्याकडे प्रस्थापित जातीयवादी समीक्षकानी कानाडोळा केला होता. पण त्यांच्यासाहित्याचा वाचक वर्ग या महाराष्ट्रात प्रचंड होता. त्यांनीच अण्णा भाऊच्या साहित्याला मान्यता मिळवून दिली. म्हणून अण्णा भाऊचं साहित्य महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जाऊन पोहचलं हे त्रिवार सत्य आहे. अण्णाभाऊ साठे यांचा श्रेष्ठ कथाकार म्हणून आणि कथा साहित्याचा खालील प्रमाणे विचार करणार आहोत.

१९४९ साली अण्णा भाऊ साठे यांनी पहिली कथा लिहिली. आयुष्याच्या शेवटपर्यंत त्यांनी कथालेखन केल. १९५७ साली खुळंवाडी हा त्यांचा पहिला कथासंग्रह प्रकाशित झाला. अण्णा भाऊच्या नावावर वीस कथासंग्रह आहेत. खुळवाडी, बरबाद्या कंजारी, कृष्णा काठच्या कथा, आबी, भानामती, लाडी, फरारी, गजआड, चिरामनगरीची भुतं, गुऱ्हाळ, जिवंत काडतूस, ठासलेल्या बंदुका, नवती, निखारा, भुताचामळा, रानवेली,राम—रावण युध्द, भोमक्या आणि इतर कथा, वणव्याची काडी, सातारी काडतूस. या वीस कथासंग्रहातून अण्णाभाऊंनी मानवी जीवनातील साऱ्याच प्रश्नांना वाचा फोडली म्हणून त्यांच्या कथा माणूस केंद्री वाटतात. अण्णाभाऊ साठेंच्या कथे संदर्भात आचार्य अत्रे लिहितात की, '' अण्णा भाऊ साठे यांच्या कथांचे एकावाक्यात वर्णन करावयाचे झाल्यास असे सांगतात येईल की, त्या जगण्यासाठी लढणाऱ्या माणसांच्या कथा आहेत. आपल्या कथांमध्ये निरनिराळी माणसे त्यांनी रंगाविली आहेत., पण सर्वाच्या रक्तांतून एकच लढाऊ ईर्षा वाहत आहे. त्या सर्वाना मानाने जगायचे आहे. अंगात असेल नसेल तेवढे बळ एकवटून त्यांना आक्रमक वृत्तीशी सामना द्यायचा आहे आणि त्यात त्यांना जिंकायचे ही आहे. हा त्यांचा गुण डोळयात प्रथम भरतो. ती कच खाणारी, हार मानणारी माणसे नाहीत. वार झेलायला त्यांची छाती नेहमीच ताठयाने उभारलेली आहे. धडक द्यायला मस्तक नेहमीच पुढे झुगारलेले आहे. त्यांच्या कथामध्ये इथून तिथून एकच झुंजार मराठबाणा आवेशाने स्फुरतांना दिसून येतो. अण्णाभाऊच्या कथेतल्या माणसांचा पिंड हा असा कणखर आणि टणक आहे. जीवनाच्या सामान्य धडपडीत देखील मराठयांचे हे क्षात्रतेज लोपलेले दिसत नाही. त्या पराक्रमी कथा अण्णा भाऊंनी तितक्याच तेजस्वी भोषेत रंगविल्या आहेत''

अण्णाभाऊंनी विपुल प्रमाणात कथा लिहिल्या १९४९ ते १९६९ असा त्यांचा वीस वर्षाचा कथा कालखंड आपल्याला दिसतो इतकं अप्रतिम त्यांनी कथालेखन त्यांनी केलं पण त्या काळातील समीक्षकांनी, अभ्यासकांनी त्यांच्या कथेकडे जाणीव पूर्वक दुर्लक्ष केले. असं म्हणता येईल. त्यांच्या कथेसंदर्भात आणि कथेकडे समीक्षकांनी कसा कानाडोळा केला या बद्दल बाबुरावगुरवव म्हणतात,'' आजच्या मराठी लघुकथेच्या वैशिष्टयपूर्ण तेशी अण्णा भाऊची कथा फटकून उभी राहिली. तरीही लोकमानसात रुजून मराठी वाङ्मयामध्ये तिने आपले स्थान पक्के केलेले दिसते. प्रचलित लघुकथा वाङ्मयाहून अण्णा भाऊंची कथालेखन रीतवेगळी आहे. त्यांच्या साहित्य लेखनामध्ये फडकेप्रणीत किंवा नवकथा लेखक अनुचरित कला मूलयादी बाबींची किंवा तंत्र कौशलयाची अपेक्षा करता येणार नाही. अशी अण्णा भाऊंची पिंड प्रकृतीच होती. त्यांची कथा ही गोष्ट दीर्घकथा, कहाणी आहेत का लहान कादंबरी

आहे. या प्रश्नांचे उत्तर देणे फार अवघड आहे. साकलयाने विचार करुन उत्तर दयावयाचे झाल्यास ही कथा वरील सर्व काही आहे. वरील सर्व साच्यात ती बसणारी आहे. अण्णाभाऊंची कथा विषयवैविद्याने, आशयसंपन्नतेने, अनुभव समृध्दतेने आणि संघर्ष शीलतेने रसरसून उमटलेली आहे. पाणी नसणाऱ्या वैराण वाळवंटात कातळ खडकावर स्वसंरक्षणाचे टणक सामर्थ्य घेउन टरारुन फुललेल्या निवडुंग बनाने आपले रसाळ फळ दाखवून वेड लावावे, काछे, बोचरी, कूस मान्य करुनही सामान्य वाचकाने मोहीत होऊन त्याकडे आकर्षित व्हावे आणि समीक्षकांने मात्र विज्ञान महाविद्यालयातील बागेतील अथवा बंगल्यासमोरिल बागेतील माळयाप्रमाणे आपली टीकेची कात्री घेऊन या निवडुंगबनाची छाटणी कोठून सुरु करावी अशा विवंचनेत पडावे, सौदर्यसंग्रहणाचे समीक्षकाचे बळच निकामे व्हावे अशी काहीशी विचीत्र अवस्था अण्णा भाऊंच्या कथेकडे वर्तमान मराठी समीक्षेच्या फुटपटटया घेऊन गेल्यास झााल्यावाचून राहणार नाही'' साहित्यिक म्हणून त्यांच्यावर झालेला अन्याय, त्यांची उपेक्षा या बद्दल सुप्रसिध्द साहितिक प्रा.रा.ग जाधव सांगतात, '' स्वातंत्र्योत्तर काळात मराठी कथा कादंबरी नव्या चैतन्याने, नव्या रुपसमृध्दीने, नव्या प्रेरणांनी रुपास आली. ग्रामीण प्रादेशिक जगाचे निजीवनाचे उपेक्षित अंतरंग व बहिरंग त्यातून साकार झाले. नागर जीवनाच्या तळाशी ठाव घेण्याचा प्रयत्न त्यातून करण्यात आला हे नवे मराठी कथा साहित्य ज्या कलावंतांनी रुपास आणले, अण्णाभाऊ यांचा वाटा निश्चितच मोठा आहे. तथापि मोठया वाटेकऱ्यांना त्यांचे श्रेय मोठया मनाने देण्याचे कर्तव्य समाज नेहमीच पार पाडतो, असे नाही.''

अण्णाभाऊ साठे यांच्या कथा वाचतांना कादंबऱ्यातून येऊन गेलेली पात्रे, घटना– प्रसंग जसेच्या तसेच कथामध्ये आलेली आहेत. एकुणच अण्णा भाऊंच्या कथांचा विचार करत असतांना त्या पाचघटकात विभागल्या जातील त्यात कलात्मक कथा, प्रेमाच्या कथा, दलित वेदना मांडणाल्या कथा, आत्मचरित्माक कथा, तसेच गुनहेगारी जीवन दर्शन मांडणाऱ्या कथा रा.ग. जाधव अण्णा भाऊ सांठे यांच्या कथेविषयी आणि त्यांच्या संदर्भात म्हणतात की, ''ज्यांच्या विषयी आपण लिहितो, त्यातील सर्व सुष्ट दुष्ट कोमल–कठोर, भल्या बुऱ्या माणसांना आपली मानने मानणाऱ्या अण्णाभाऊ बद्दल मला नेहमीच विलक्षण कुतूहल वाटत आले आहे. प्रतिमा, जीवनाचे सत्य, कल्पकता, सहानुभूती यांचे एक सरळ गणित सहजपणे मांडणारा हा लेखक मला एक आगळया ऋजुतेचा धनी वाटतो, त्यांचे साहित्य व व्यक्तिमत्व आपल्या सरलतेने मन मोहून घेते. त्यांच्या साहित्यांत आचार्य यांना बंडखोरी दिसली व भाऊ साहेब खांडेकरांना ऐतिहासिक साहस रम्यता आढळली. पण ती बंडखोरी व साहसरम्यतायातही एकप्रकारचा साधा सरळपणा आहे. वैचाारिक बांधिलकीचा कृत्रिम पीळ, वक्रता, अलंकरण किंवा वाड्मयीन संकेतांचा साज त्यांच्या कथा साहित्यात नाही जे आहे ते एक प्रकारचे प्राकृतिक ऋजुतेचे, नैसर्गिक सहजतेचे, स्वाभाविक गतिमानाचे सरळ दर्शन, यामुळेच अण्णाभाऊच्या साहित्यांचे एक कायमचे आव्हान माझ्या पुढे असते. आपण का लिहितो, याचे प्रयोजन माणुसकीच्या सर्वस्पर्शी सहानुभूतीत असल्याचा निखाळ साधा दावा मांडणारा हा थोर लेखक मला मनस्वी आकर्षक वाटतो'' तसेच अण्णाभाऊ साठे यांच्या कथे संदर्भात डॉ. प्रकाश कुंभार लिहितात की, '' अण्णा भाऊ च्या कथा लेखनावर कम्यनिस्ट विचार सरणीचा अधिक प्रभाव होता असे मानले जाते प्रा. पानतावने म्हणतात, अण्णाभाऊ कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते होते. पण या विचारसरणीचा उपयोग त्यांच्या प्रचारी लोकांनाठयात केला हे लक्षात आले पाहिजे अर्थानिष्ठ मार्क्सवादाची प्रेरणा कथा कांदबरी वर नाही हे फकिरा, खुळंवाडी मधील कथा वाचतांना जाणवते'' तसेच पुढे प्रा. डॉ. कुंभार अण्णाभाऊंच्या कथे संदर्भा म्हणतात, '' अण्णाभाऊंनी आपल्या कथांतून माणुसकीचा महामंत्र दिला तो अत्यंत महत्त्वाचा आहे. मी माझ्या माणसांचे दु:ख जगाला सांगेल मी अन्यायाविरुध्द छातीचा कोट करुन उभा राहीन. मी मोडेन पण वाकणार नाही. मी जळेल तरीही उरेन हा महामंत्र त्यांच्या एका साहित्यांचे नव्हे, तर एकूण त्यांच्या वाड्मयाचे सामर्थ्य दुवावणारा आहे. अण्णा भाऊंच्या अनुभवाची जातच विलक्षण आहे. दलित जीवन निराळे आहे व ते सांगण्यासारखे आहे. अशी भुमीका त्यांनी घेतल्याने लेखनाला कलात्मक दर्जा प्राप्त होतो. म्हणजेच अण्णाभाऊंनी दलित जीवन हा साहित्यांचा विषय होऊ शकतो हे दाखवून दिल्यानेही त्यांची ऐतिहासिक दृष्ट्र्या अत्यंत मोलाची कामगिरी ठरते. एकुणच अण्णा भाऊंच्या कथा विषयातील विविधता आणि विविधतेही आढळणारी आशयसंपन्नता आणि दुर्दम्य आशीवाद व संघर्ष ही त्यांच्या कथेची प्राणभूत तत्त्वे ठरलेली दिसून येतात.''

## सारांश :–

मराठी साहित्य विश्वास अण्णा भाऊ साठे यांचे नाव महत्त्वपूर्ण आहे हे आपल्याला मान्यच करावे लागेल अण्णाभाऊंनी मराठी कथेचे पांढरपेशी पण पार बदलून टाकले. त्याच बरोबर कथेचा आशय व विषयाच्या कक्षा रुंदावल्या, मराठी कथेत अक्षर कथा ठरल्या. मराठी कथा विश्वाला न दिसणारं उगडं, नागडं समाज जीवन त्यांनी

कथेच्या माध्यमातून मांडण्याचं काम केलं. तसेच उपेक्षितांच्या अंतरंगाला शतरंजी पैलू पाडणारा अण्णाभाऊ साठे सारख्या प्रतिभावान लेखक मराठी साहित्याने बघितला नव्हता कारण साहित्याने त्याला जन्मच दिला नव्हता. तो अण्णा भाउंच्या रुपाने मराठी साहित्यात आला हे आपल्याला नाकारता येणार नाही. त्यांच्या रुपाने मराठी साहित्याला नवी कथा दिली.

## संदर्भग्रंथ :—

१) बाबुराव गुरव, अण्णाभाऊ साठे समाजविचार आणि साहित्य विवेचन, लोक वाड्मयग्रह, मुंबई पहिली आ. १९९१
२) एस.एस.भोसले., प्रतिनिधिक कथा, अण्णा भाऊ साठे, लोकवाड्मयग्रह मुंबई, पहिली आ. १९७८.
३) आसाराम गायकवाड, लोकशाहीर तथा लोकलेखक अण्णा भाऊ साठे संदर्भ ग्रंथ, झेप प्रकाशन नाशिक,पहिली आ. १९९६
४) लोकशाही, अण्णा भाऊ साठे : निवडक वाङ्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.
५) रणधीळ शिंदे, अण्णा भाऊ साठे साहित्य समीक्षा, श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर पहिली आ. २०११
६) विजयकुमार जोखे, अण्णा भाऊ साठे चरित्र आणि कार्य, नाग—नालंदा प्रकाशन सांगली, पहिली आ. २०१५
७) वंदना बडगुजर, अण्णा भाऊ साठे साहित्य व समीक्षा, प्रशांत प्रकाशन,जळगांव, पहिली आ.२०१५
८) मिलिंद कांबळे, अण्णा भाऊ साठे साहित्य आणि समीक्षा, निर्मल प्रकाशन, नांदेड, पहिली आ.२०११

❖❖❖

# ग्रामीण साहित्य व लोकसाहित्य – अनुबंध

प्रा.डॉ. शरद वाघोळे
मराठी विभाग प्रमुख
यशवंतराव चव्हाण कला, वाणिज्य महाविद्यायालय, मंगरूळ पीर
ता. मंगरूळ पीर, जि. वाशिम, महाराष्ट्र (India)
भ्रमणध्वणी –९४२१७४५३३५

## सारांश

ग्रामीण साहित्य आणि लोकसाहित्य हे दोन्ही प्रकार एकजीव आहेत. दोन्ही वेगवेगळे करता येत नाही. ग्रामीण साहित्य जेव्हा ग्रामीण माणसाला रेखाटते तेव्हा त्या माणसाच्या भोवतीची संस्कृती,बोली, प्रथा, परंपरा यांचा समावेश करणे गरजेचे असते कारण त्यातूनच त्या माणसाची सामाजिक, सांसकृतिक जडणघडण समोर येते. साहित्यिक या बाबी रेखाटत असताना नकळत त्या भागातील लोकसाहित्य मांडत असतो. काळाच्या ओघात पारंपरिक जीवन बदलत आहे, खेडे गदलत आहे. नागरीकरण, आधुनिकीकरण यामुळे ग्रामीण जीवनातील परंपरागत बाबी लुप्त होत आहे. या सर्वांना जतन करण्याचे कार्य ग्रामीण साहित्याने केले आहे. ग्रामीण साहित्य हे लोकसाहित्याच्या अभ्यासकांना उपयुक्त संदर्भ ठरू शकते.

## विषय विवेचन

लोकपरंपरने चालत आलेले व एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत जाणास प्रकार म्हणजे लोकसाहित्य होय. लोकसाहित्य चांगला – वाईट बदल आत्मसात करून पुढे जात असते. लोक रूढी, प्रथा, परंपरा, विचार, श्रद्धा यांचा मौखिक प्रवाह म्हणजे लोकसाहित्य होय. लोक हा शब्द समुदाय वाचक आहे, लोकसाहित्यात लोकसंस्कृतीचा, लोकजीवनाचा परिपूर्ण विचार केलेला आहे. लोकसाहित्य हा शब्द शाब्द आणि शाब्देत्तर अशा सर्व लोककलांकरिता वापरल्या जातो. वाङ्मयाच्या दृष्टीने विचार केल्यास लोककथा, लोकगीत, म्हणी, उखाणे, वाक्प्रचार इत्यादी मौखिक परंपरेने चालत आलेल्या बाबींचा समावेश होईल. या सर्व परंपरागत प्रकारात लोकमानसाचे प्रतिबींब पडलेले असते. लोकमानसात असलेल्या विचारांना, कल्पनेला शब्दरूप किंवा कलारूप लोकांकडून दिल्या जाते. अशा लोकांची निर्मिती नृत्य, गेय, हस्तकला, शिल्पकार्य अशा विविध स्वरूपात दिसून येते. ही लोकपरंपरा वर्तमान नागर आणि ग्रामीण अशा दोन्ही समुदायांचा विचार केल्यास परंपरागत जीवनशैलीशी एकरूप असलेला ग्राम समुदाय या लोकपरंपरेशी अधिक निगडित आहे, असे दिसून येते. नागर परिसर हा आधुनिकतेकडे वळलेला तसेच पाश्च्यात्य विचारसरणी, परंपरा अंगिकृत करण्याकडे कल असलेला समुदाय असल्यामुळे परंपरागत लोकविचारसरणीपासून दुरावत असल्याचे चित्र आज दिसून येते. ग्रामीण भागाचा तुलनेने विचार करता आपली परंपरागतता जोपासताना दिसतो. काळानुरूप त्यात बदल होणे स्वाभाविक आहे, तरी लोकश्रद्धा, रूढी, परंपरा यांचे लोकमानसावरील वर्चस्व अजूनही कायम आहे. लोकसाहित्यामधील लोक हा मुख्यत: कृषीकर्माशी निगडित आहे. त्याचे जीवन हे निसर्गाशी एकरूप झालेले, शेती हा त्यांचा आत्मा. ग्रामीण जीवनातील माणूस शेतीमुळेच सुखी आणि शेतीमुळेच दु:खी असे चित्र ग्रामीण भागात दिसते. 'लोकसाहित्यामध्ये लोकजीवनाची नानाविध रूपे प्रकटत असली तरी त्यातून अधिकतर कृषीसंस्कृतीचे अविष्कार घडत राहतात आणि ते बोलीभाषा, कलाकौशल्ये, रीतीरिवाज यांच्यातून दृष्टिपतास येतात. निरक्षरता, कृषिकर्माशी निकटत्व, मौखिक परंपरेचे जतन, पारंपरिकता, सामुहिकता या घटकांचा विचार ध्यानात घेता असे दिसते की, मग लोकसाहित्य आणि ग्रामीण साहित्य यांच्यामध्ये निश्चित एक अनुबंध स्वाभाविक आहे.'[१] ग्रामीण साहित्यकृतीतून येणाऱ्या ग्रामविश्वातील बाबी या लोकमानसाच्या मौखिक परंपरेला आलेले शब्दरूप होय. ग्रामीण साहित्याचा सांस्कृतिक दृष्टिकोनातून अभ्यास करावयाचा असेल तर तो अभ्यास लोकसाहित्याचे स्वरूप व संकल्पना समजावून घेऊनच करावा लागेल कारण जनाचा सामुहिक अविष्कार लोकसाहित्यातून होतो तर ग्राम साहित्यातूनसुद्धा ग्राम लोकांचेच जीवनांग समोर येत असते. ग्रामीण साहित्यातून येणारा माणूस हा त्याच्या सांस्कृतिक, सामाजिक जीवनासह अवतरित होतो, त्याच्या सांस्कृतिक जीवनातील श्रद्धा, रूढी, विधी यातून त्याची धारणा, कल्पना वाचकांसमोर येत असते, तर त्याच्या सामाजिक परिस्थितीचा त्याच्या जीवनावर होत असलेला परिणाम लिखाणातून पुढे येतो. या लोकश्रद्धा, विधी, रूढी

किंवा सामाजिक संकेत हे लोकपरंपरेने आलेले असतात आणि ग्रामीण लेखक या सर्वांचा वापर केल्याशिवाय ग्रामविश्व उभे करू शकत नाही, कारण शेवटी माणूस उभा करणे म्हणजे त्याच्या सांस्कृतिक, सामाजिक जीवनाचा परामर्श घेणे अपरिहार्य आहे. माणूस हा समाजशील प्राणी असून परंपरेने चालत आलेल्या रूढी, विधी, श्रद्धा, विचार, परंपरा याने त्या लोकमानसाला, जीवनाला आकार दिला असतो. या सर्वांचा परामर्श जेव्हा ग्रामीण साहित्य घेते तेव्हा ते लोकपरंपरेचा परामर्श घेत असते. लोकसाहित्य हे लोकजीवनाचा आरसा होय, लोकजीवनातील सुख—दुःखे ही लोकगीतातून किंवा ओव्यांतून व्यक्त होत असतात तसेच लोककथासारख्या प्रकारात एखादा अनुभव समोर येतो. हे सर्व प्रकार मौखिक स्वरूपात येते, आणि अशीच भावना लिखित ग्रामीण साहित्यातून अवतीर्ण होत असते. अशा बाबींचा विचार करता ग्रामीण साहित्याचे मौखिक रूप म्हणून लोक वाङ्‌मयाकडे बघावे लागते. ग्रामीण साहित्यात लोकसाहित्य विपुल प्रमाणात अवतिर्ण होत असते कारण जीवन व लोकसाहित्य हे अभिन्न अंग आहे. म्हणून ग्रामीण साहित्यातील माणूस येताना त्याची संस्कृती पर्यायाने लोकसाहित्य घेऊन येतो. ग्रामीण कविता, कथा, कादंबरी, नाटक यातून लोकसाहित्याचे विविध संदर्भ येतात व ते लोकसाहित्य संकलन म्हणून उपयुक्त आहे. काळाबरोबर आधुनिकीकरण, शहरीकरण वाढले त्याबरोबर जुनं लुप्त होण्याच्या मार्गावर आहे. अशा जुन्या विचारांना, कलांना, लोकवाङ्‌मयाला ग्रामीण साहित्याने आपल्यात अंतर्भूत करून त्यांचे जतन केले आहे असे म्हणणे योग्य ठरेल. 'साहित्यात व्यक्त होणाऱ्या कोणत्याही अनुभवाला एकापेक्षा अधिक पदर आणि पातळ्या असतात. तो अनुभव तसा आपण पाहतो, तसा तो आपणाला भावेल. त्याला काव्यात्मकता असू शकते. व्यावहारिक उपयुक्तता असू षकते. संवेदनात्मक स्वरूपाचे अंग त्याला असू षकते व त्याला केवळ बाह्य स्वरूपाचे सुबक सौश्ठवी स्वरूपही असू षकते. एकाच अनुभवाला अनेक अंगे असतात. ती परस्परात कालवलेली असतात. ही सारे अंगे त्या अनुभवाच्या आकृतिबंधासह षब्दात पकडणे महत्वाचे असते'[२] कवितेचा विचार करता कवयित्री बहिणाबाई चौधरी, कवी आनंद यादव, कवी विठ्ठल वाघ, कवी इंद्रजित भालेराव अशा कवींच्या काव्यात येत असलेले लोकरूप लोकसाहित्याच्या अभ्यासकांच्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरू शकते. ग्रामीण कवींनी ग्रामीण जीवनाचे विविध रूपं रेखाटताना ग्रामीण संस्कृतीचे वेगवेगळे संदर्भ मांडलेले दिसते. यातून ग्रामीण जीवनाचे अंतरंगं कळत जाते. ग्रामीण कविता ही ग्रामीण परंपरागत मानसिकता व्यक्त करताना अनेक रूढी, परंपरा, प्रथा यांचा संदर्भ व्यक्त करत पुढे जाते. ग्रामीण कवींनी लोकसाहित्याचे विविध संदर्भ काव्य आशयाच्या संदर्भात वापरले परंतु नकळत लुप्त होत असलेल्या अनेक लोकप्रथा, समजुती, बोलीतील शब्द संकलित करून लोकसाहित्य अभ्यासकांसाठी संदर्भ जतन केले आहे असे म्हणता येईल. रा.गो.चवरे, रमेश इंगळे,उद्धव शेळके सदानंद देशमुखसारख्या ग्रामीण कादंबरीकारांच्या लेखणीतून लोकसहित्याचे अनेक संदर्भ समोर येतात. ग्रामीण जीवनाचा परामर्श घेताना ग्रामीण जीवनाचे व्यापक चित्रण करताना लोकसंस्कृतीचे विविध पदर येणे अपरिहार्य आहे. यातून लोकमानसाचा प्रत्यय येतो. कथेमध्ये सुद्धा राजन गवस, बाबाराव मुसळे, रायभान दवंगेसारख्या कथाकारांनी बदलते खेडे साकार करत ग्रामीण संस्कृतीचे वर्णन केलेले दिसते. लोकसाहित्य व  ग्रामीण साहित्य हे वेगळे न करता येणारे समिकरण आहे.ग्रामीण साहित्यात येणारा माणूस हा त्याची संस्कृती घेऊन येतो- ही संस्कृती रेखाटतान साहित्यिक त्या भागातील लोकसाहित्य रेखाटत असतो. यातूनच ग्रामीण जीवनाचे विविध पदर समोर येत जाते व लोकसाहित्य व ग्रामीण जीवन यांची सांगड वाङ्‌मयातून पुढे येते.

## निष्कर्ष

१. ग्रामीण साहित्य समजावून घ्यायचे असेल तर तेथील लोकमानसमाहीत असणे गरजेचे असते त्याशिवाय ग्रामीण मानस परिपूर्णपणे कळणार नाही. ग्रामीण साहित्य लोकजीवनाची ओळख करून देताना ग्रामीण संस्कृतीची ओळख होत जाते. म्हणून ग्रामीण साहित्य ज्या परिसरातील आहे त्याभागाचे लोकसाहित्य यातून अभ्यासता येते.
२. लोकसाहित्य हे ग्रामीण जीवनातून समोर येते. बोली, लोक परंपरा,  प्रथा या सर्वांचा परामर्ष ग्रामीण साहित्य घेते पर्यायाने लोकसाहित्य संकलनाचे कार्य ग्रामीण साहित्य करते असे म्हणता येईल.
३. परंपरागत जीवनातील अनेक बाबी लुप्त होत आहे, अशा बाबींना ग्रामीण साहित्याने संकलित केले, जतन केले. लोकसाहित्याचा अभ्यास करताना त्या भागातील ग्रामीण साहित्यचा अभ्यास महत्वपूर्ण ठरू शकतो.

## संदर्भ

१.पाटील मोहन, ग्रामीण साहित्य आणि संस्कृती, स्वरूप प्रकाशन, आवृत्ती दुसरी २००८, पृष्ठ २९
२.ग्रामीण साहित्य एक चिंतन, द.ता भोसले, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, आवृत्ती पहिली १९८८ पान १४६

## संदर्भ ग्रंथ

१. लोकसाहित्य अभ्यास क्षेत्र, डॉ. गंगाधर मोरजे,दास्ताने रामचंद्र आणि कंपनी पुणे.
२. लोकसाहित्याचे अंत:प्रवाह, प्रभाकर मांडे,गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद.
३.ग्रामीण साहित्य आणि संस्कृती, लेखक – मोहन पाटील, स्वरूप प्रकाशन.
४.स्त्री जीवन, साने गुरूजी, रिया पब्लिकेशन, कोल्हापूर
५.लोकरंग, प्रा. चंद्रकुमार नलगे, प्रा. गंगाधर पानतावणे, रिया पब्लिकेशन, कोल्हापूर
६.गाव गाडा, त्रिंबक अत्रे,समन्वय प्रकाशन,कोल्हापूर
७.आदिवासी लोक, संपादक रमणिका गुप्ता, बालवाणी प्रकाशन, दिल्ली

❖❖❖

## Form IV
**(See Rule 8)**

**Statement about ownership and other particular about the Journal**

## Research Journal of India

| | | |
|---|---|---|
| 1. Place of Publication | - | Dr. Bhau Mandavkar Research Centre (DBMRC), Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401 |
| 2. Periodicity | - | Annual |
| 3. Printer's Name | - | Seva Prakashan, Vijay Colony, Amravati 444606 (M.S.) |
| 4. Publisher's Name | - | Dr. Mrs. Veera Mandavkar |
| Nationality | - | Indian |
| Address | - | Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401 |
| 5. Editor's Name | - | Dr. Pavan Mandavkar |
| Nationality | - | Indian |
| Address | - | Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal |

We, Dr. Pavan Mandavkar & Dr. Mrs. Veera Mandavkar hereby declare that the particulars given above are true to the best of our knowledge and belief.



Dr. Y.M. Donde Sarwajanik Shaikshanik Trust's (1974)

**INDIRA MAHAVIDYALAYA**





KALAMB, DIST. YAVATMAL, MAHARASHTRA 445401

☎ 07201-226147, 226129 (Fax)

Web.: www.indiramahavidylaya.com

www.researchjournal.net.in

Email: imvkalamb@yahoo.co.in

indiram414@sgbau.ac.in

For Research centre: researchjournalofindia@gmail.com

marathipradhyapak@gmail.com

Permanently Affiliated to SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI

RECOGNIZED BY UGC UNDER 2 F & 12 B

NAAC RE-ACCREDITED WITH 'B+' GRADE



| | | | |
|---|---|---|---|
| Annual Subscription | - | Individual / Institutional | ₹ 500/- |
| Account Details : Bank | - | Bank of Maharashtra | |
| Branch | - | Azad Maidan Road, Yavatmal | |
| IFSC code | - | MAHB0000047 | |
| MICR code | - | 445014001 | |
| A/c No. | - | 60175373000 | |
| A/C Name | - | Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre | |



**(All rights are reserved with the Publisher & Editorial Board. The opinion expressed are of the authors & the association advisory board, editorial board as well as the peer committee does not hold any responsibility for any of the views expressed. Judiciary matter in Kalamb Court only.)**



p -ISSN 2349-9370

9 772349 937002

e -ISSN 2582-4848

9 772582 484004